CMYK

सोलापूर
तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

लातूर | शनिवार, १४ मार्च २०२६ | वर्ष ४ थे अंक ६ | पाने १२ | किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. dainiktarunbharat.com epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



नि ध्येयसिद्धीसाठी कितीही आपत्ती आल्या, कोणतेही कष्ट स्वीकारावे लागले, कोणत्याही प्रकारची संकटे झेलावी लागली तरी ध्येयप्राप्तीसाठी कार्यकर्ता ते सर्व आनंदाने सहन करतो. त्याने स्वेच्छेने बंधने स्वीकारलेली असतात. कार्यसिद्धीला पोषक तेच करीन व घातक असलेले काहीही करणार नाही ही मर्यादा त्याने स्वत:च विचारपूर्वक स्वीकारलेली असते.

**एकनाथ रानडे**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह, संस्थापक विवेकानंद शिला स्मारक व विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी

# बेकायदेशीर धर्मांतर करणे गुन्हा

- **महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक विधानसभेत सादर**
- **बळजबरीने धर्मांतर केल्यास सात वर्षांपर्यंत कारावास**
- **आमिष, फसवणूक किंवा दबावाने धर्मांतर केल्यास कठोर शिक्षा**






◆ **मुंबई, १३ मार्च**
राज्यात जबरदस्तीने, आमिष दाखवून किंवा फसवणुकीद्वारे होणाऱ्या बेकायदेशीर धर्मांतराच्या घटनांना आळा घालण्यासाठी तयार करण्यात आलेले महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक शुक्रवारी विधानसभेत सादर करण्यात आले. या विधेयकानुसार बेकायदेशीर धर्मांतर घडवून आणणाऱ्या व्यक्तीस सात वर्षांपर्यंत कारावास आणि पाच लाख रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा होऊ शकते. तसेच धर्मांतर सक्तीने किंवा अनुचित मार्गाने झालेले नाही, हे सिद्ध करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्ती किंवा धर्मांतराचे आयोजन करणाऱ्या संस्थेवर असणार आहे. हे विधेयक मंजूर झाल्यास बेकायदेशीर धर्मांतराविरोधात कायदा करणारे महाराष्ट्र हे देशातील १० वे राज्य ठरणार आहे.

गेल्या काही वर्षांत प्रेमसंबंध, आमिष किंवा फसवणुकीच्या माध्यमातून धर्मांतर झाल्याच्या तक्रारी वाढल्या असल्याचे राज्य सरकारचे म्हणणे आहे. धर्मांतराचे नियमन करण्यासाठी राज्यात आतापर्यंत स्वतंत्र कायदा नव्हता. त्यामुळे कठोर कायदा करण्याची मागणी विविध संघटनांकडून होत होती. या पृष्ठभूमीवर राज्य मंत्रिमंडळाने गेल्या आठवड्यात या विधेयकाच्या मसुद्याला मंजुरी दिली होती.

चिंचवडचे आमदार शंकर जगताप यांनी विधानसभेत हे विधेयक सादर केले. बळजबरीने किंवा अनिच्छेने घडवून आणल्या जाणाऱ्या धर्मांतराच्या घटनांमुळे कायदा आणि सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण होत असून सामाजिक सलोखा बिघडण्याची शक्यता असल्याचे त्यांनी सांगितले.

**कायदेशीर धर्मांतरासाठी ६० दिवस आधी सूचना**

कोणत्याही व्यक्तीला धर्मांतर करायचे असल्यास त्या व्यक्तीने आणि धर्मांतराचा समारंभ आयोजित करणाऱ्या व्यक्ती किंवा संस्थेने सक्षम प्राधिकाऱ्याकडे किमान ६० दिवस आधी सूचना देणे आवश्यक राहील. या सूचनेवर आक्षेप मागवले जातील. आक्षेप आल्यास पोलिसांमार्फत चौकशी करण्याचा अधिकार प्राधिकाऱ्याकडे असेल तसेच धर्मांतर झाल्यानंतर २१ दिवसांच्या आत संबंधित व्यक्तीने धर्मांतराचा तपशील सादर करून घोषणापत्र देणे आवश्यक असेल. तसे न केल्यास धर्मांतर रद्द करण्याचा अधिकारही प्राधिकाऱ्यांना असणार आहे. ◂(तभा वृत्तसेवा)

### दुसऱ्या गुन्ह्यात १० वर्षांपर्यंत शिक्षा


विधेयकात कठोर शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. एखाद्या व्यक्तीने स्वतः किंवा इतरांच्या संगनमताने बेकायदेशीर धर्मांतर घडवून आणल्यास सात वर्षांपर्यंत कारावास आणि पाच लाख रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो. तसेच महिला, अल्पवयीन, मानसिकदृष्ट्या दुर्बल व्यक्ती किंवा अनुसूचित जाती-जमातीतील व्यक्तींचे धर्मांतर केल्यासही हीच शिक्षा लागू राहील. एकदा दोषी ठरलेल्या व्यक्ती किंवा संस्थेने पुन्हा असा गुन्हा केल्यास १० वर्षांपर्यंत तुरुंगवास आणि १० लाख रुपयांपर्यंत दंडाची तरतूद करण्यात आली आहे. या कायद्यानुसार बेकायदेशीर धर्मांतराच्या उद्देशाने केलेला विवाह न्यायालय रद्द करू शकते. अशा विवाहातून जन्मलेल्या बालकाला आईचा धर्म लागू होईल, अशीही तरतूद करण्यात आली आहे. ■

### धर्मप्रसाराचा हक्क, पण जबरदस्तीने धर्मांतर नाही

भारताच्या संविधानाने नागरिकांना धर्मस्वातंत्र्याचा हक्क दिला असला, तरी तो निरंकुश नसल्याचे विधेयकात स्पष्ट करण्यात आले आहे. धर्मप्रसाराचा अधिकार असला तरी दुसऱ्या व्यक्तीचे जबरदस्तीने धर्मांतर करण्याचा अधिकार त्यात समाविष्ट होत नाही तसेच विवाहासाठी किंवा नातेसंबंध प्रस्थापित करण्यासाठी फसवणुकीने धर्मांतर घडवून आणणेदेखील गुन्हा मानला जाणार आहे. धर्मांतरित व्यक्ती किंवा तिचे आई-वडील, भाऊ-बहीण अथवा रक्ताचे नातेवाईक अशा प्रकरणांबाबत पोलिसांकडे तक्रार दाखल करू शकतील आणि अशी तक्रार नोंदविणे पोलिसांवर बंधनकारक राहील. ■

# होर्मुझमधून भारतीय जहाजांना सुरक्षित मार्ग

### इराणचा निर्णय; भारत आमचा मित्र असल्याचे विधान




◆ **नवी दिल्ली, १३ मार्च**
जागतिक जहाज वाहतुकीचा अत्यंत महत्त्वाचा मार्ग असलेल्या होर्मुझ सामुद्रीधुनीतून भारताला सुरक्षित मार्ग मिळू शकेल, असे संकेत इराणचे भारतातील राजदूत मोहम्मद फथाली यांनी दिले. पर्शियन आखातातील वाढता तणाव आणि सागरी तसेच ऊर्जा सुरक्षेबाबतच्या चिंतावर हा एक तोडगा निघाला असून, भारताच्या कूटनीतीचा हा मोठा विजय मानला जात आहे.

या सामरिक जलमार्गाद्वारे भारताचा प्रवेश सुनिश्चित करणाऱ्या घडामोडी लवकरच घडून येऊ शकतात, असे संकेत फथाली यांनी पत्रकारांशी बोलताना दिले. भारत आमचा मित्र आहे. ही बाब लवकरच घडणार आहे, असे फथाली यांनी भारताला होर्मुझच्या सामुद्रधुनीतून सुरक्षित मार्ग मिळेल का, या प्रश्नाला उत्तर देताना सांगितले. या अरुंद भागात सुरू असलेल्या संघर्षामुळे पर्शियन आखाताला जागतिक बाजारपेठांशी जोडणाऱ्या अरुंद जलमार्गातून होणाऱ्या जहाज वाहतुकीवर बारकाईने लक्ष ठेवले जात असताना ही महत्त्वपूर्ण घडामोड घडली आहे. होर्मुझच्या सामुद्रीधुनीतून सुरक्षितपणे मार्गक्रमण करणे शक्य होईल का, असा थेट प्रश्न विचारला असता, सकारात्मक घडामोडींची अपेक्षा असल्याचे राजदूतांनी सूचित केले. ◂(वृत्तसंस्था)

### भारत विविध क्षेत्रांत मदत करेल

आमचा असा विश्वास आहे की, इराण आणि भारत हे मित्र आहेत. आमचे हितसंबंध समान आहेत, आमची श्रद्धा समान आहे. भारताने कठीण काळात नेहमीच इराणला सहकार्य केले आहे. भारतातील राजदूत म्हणून मी इतकेच सांगू शकतो की, युद्धानंतर भारत आम्हाला विविध क्षेत्रांत मदत करेल, असा विश्वास फथाली यांनी व्यक्त केला. ■

## महत्त्वाचे

### मोज्तबा गंभीर जखमी

**वॉशिंग्टन** : अमेरिका-इस्रायलने युद्ध सुरू झाल्यापासून इराणवर संयुक्तपणे पंधरा हजारहून अधिक ठिकाणी हल्ले केले. दिवसाला हजार हल्ले केले जात आहे, गुरुवारी झालेल्या हल्ल्यात इराणचे नवे सर्वोच्च नेते मोज्तबा खामेनेई गंभीर जखमी झाले असून, त्यांच्यासह अनेक नेते भूमिगत असल्याची माहिती अमेरिकेचे संरक्षण सचिव पीट हेगसेथ यांनी पत्रपरिषदेत दिली. मोज्तबा खामेनेईची प्रकृती गंभीर असून त्यांचा ठावठिकाणा कुणालाही माहिती नाही. त्यांचे शरीर विद्रूप झाले असल्याचे हेगसेथ म्हणाले. इराणच्या शस्त्रनिर्मिती कारखाने लवकरच नष्ट केले जातील. त्यांची लढण्याची क्षमता कमकुवत झाली आहे आणि त्यांच्यापुढे आता शरणागती पत्करल्याशिवाय दुसरा मार्ग नाही. अमेरिकेने इराणी शाळेवरील हल्ल्याची चौकशी पूर्ण करण्यासाठी यूएस सेंट्रल कमांडच्या बाहेरील एका अधिकाऱ्याची नियुक्ती केली आहे. हल्ल्यासाठी दोषी असलेल्यांवर नक्कीच कारवाई केली जाईल. काही दिवसातच युद्धाचा निकाल लागेल आणि इराणमध्ये लोकशाही मार्गाने सत्तानिर्मितीचा मार्ग मोकळा होईल असेही त्यांनी सांगितले. ■

### राज्यातील चेकपोस्ट बंद होणार : मंत्री सरनाईक

**मुंबई** : चेकपोस्ट संदर्भात वारंवार येणाऱ्या तक्रारींची मुख्यमंत्री महोदयांनी गंभीर दखल घेत राज्यातील सर्व चेकपोस्ट बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार राज्य शासनानेही हा निर्णय पूर्णपणे अंमलात आणण्याचा निर्धार केला असून राज्यातील चेकपोस्ट बंद करण्यात येतील, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. काही ठिकाणी करारातील अटींचे पालन होत नसल्याचे निदर्शनास आल्याने त्याबाबत चौकशी करण्यात येत आहे. चौकशीत ठेकेदार किंवा संबंधित अधिकारी दोषी आढळल्यास त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करण्यात येईल, असेही मंत्री सरनाईक यांनी सांगितले. याबाबत कायदे तज्ज्ञांचे अभिप्रायही घेण्यात आले असून विद्यमान करारातील तरतुदीनुसार पुढील निर्णय घेण्यात येईल. शासनामार्फत चेक पोस्ट बंद करण्याबाबत व त्यासंदर्भात योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

# शेअर बाजारात 'ब्लॅक फ्रायडे'

## सलग तिसऱ्या दिवशी गुंतवणूकदारांना मोठा फटका

◆ **मुंबई, १३ मार्च**
जागतिक बाजारातील नकारात्मक संकेत, परकीय गुंतवणूकदारांची सततची विक्री आणि पश्चिम आशियातील संघर्षामुळे कच्च्या तेलाच्या वाढत्या किमती यांचा मोठा फटका भारतीय शेअर बाजाराला बसला. शुक्रवारी सलग तिसऱ्या दिवशी बाजारात मोठी घसरण पाहायला मिळाली. मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक 'सेन्सेक्स' १,४७०.५० अंकांनी कोसळून ७४,५६३.९२ वर बंद झाला, तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा 'निफ्टी' ४८८.०५ अंकांनी घसरून २३,१५१.१० वर स्थिरावला.

या आठवड्यात बाजारात झालेली घसरण गुंतवणूकदारांसाठी अत्यंत चिंताजनक ठरली. निफ्टीने या आठवड्यात ५.३ टक्क्यांची घसरण नोंदवली, जी जून २०२२ नंतरची सर्वात मोठी साप्ताहिक घसरण आहे. तर सेन्सेक्स ५.५ टक्क्यांनी घसरला असून मे २०२० नंतरचा हा सर्वात खराब आठवडा ठरला.

### बाजारातील पडझडीची ७ प्रमुख कारणे

१. कच्च्या तेलाच्या किमतीत भडका
२. जागतिक बाजारातील अस्थिरता
३. परकीय गुंतवणूकदारांची विक्री
४. रुपयाची ऐतिहासिक घसरण
५. अमेरिकन फेडरल रिझर्व्हचे धोरण
६. ऑटो आणि बँकिंग शेअर्समध्ये विक्रीचा मारा
७. इंडिया विक्समध्ये वाढ

**क्षेत्रीय कामगिरी**

शुक्रवारी बाजार बंद होताना लार्सन अँड टुब्रो, टाटा स्टील, एसबीआय आणि मारुती यांसारख्या मोठ्या कंपन्यांच्या शेअर्समध्ये ७ टक्क्यांपर्यंत घसरण झाली. मात्र, तीव्र उन्हाळ्यामुळे कोळशाची मागणी वाढण्याच्या शक्यतेने 'कोल इंडिया'च्या शेअर्समध्ये ६ टक्क्यांची वाढ झाली. तसेच हिंदुस्थान युनिलिव्हर आणि भारती एअरटेलचे शेअर्सही वाढीसह बंद झाले. ◂(तभा वृत्तसेवा)



पंतप्रधान नरेंद्र मोदी शुक्रवारी आसामच्या दौऱ्यावर होते. गुवाहाटी येथे झालेल्या कार्यक्रमात त्यांच्या हस्ते विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी झाली. यावेळी उपस्थित राज्यपाल लक्ष्मण आचार्य, मुख्यमंत्री हिमंता बिस्व सरमा व मान्यवर

# मराठी न शिकविणाऱ्या शाळांची मान्यता रद्द होणार

### सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये विषय सक्तीचा ● नियम मोडल्यास कडक कारवाई

◆ **मुंबई, १३ मार्च**
राज्यातील सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी भाषा शिकवणे बंधनकारक असून मराठी विषय न शिकवणाऱ्या शाळांवर कडक कारवाई करण्यात येणार आहे. अशा शाळांची चौकशी करून त्यांना एक संधी दिली जाईल. मात्र त्यानंतरही नियमांचे पालन न केल्यास संबंधित संस्थेची मान्यता रद्द करण्यात येईल, अशी माहिती शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी विधानसभेत दिली.

या संदर्भात सदस्य हारुन खान यांनी प्रश्न उपस्थित केला होता. त्यांनी सांगितले की, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतरही काही शाळांमध्ये मराठी विषयाची सक्ती केली जात नाही. अनेक नामांकित आंतरराष्ट्रीय शाळांमध्ये मराठी विषय ऐच्छिक ठेवला जात असल्याच्या तक्रारी येत आहेत. त्यामुळे सर्व शिक्षण मंडळांच्या शाळांमध्ये मराठी विषयाची सक्तीची अंमलबजावणी होत आहे की नाही, याची खात्री करण्यासाठी शासनाने विशेष तपासणी मोहीम राबवावी, अशी मागणी त्यांनी केली. यावर उत्तर देताना मंत्री दादाजी भुसे म्हणाले की, राज्यात पहिली ते दहावीपर्यंतच्या सर्व शिक्षण मंडळांच्या शाळांमध्ये मराठी विषय सक्तीचा आहे. ◂(तभा वृत्तसेवा)

# दहावीची नाही पेपरफूट, ही तर विद्यार्थ्यांची लूट!

### चंद्रपूरमधील १८ वर्षीय तरुणाला अटक

◆ **पुणे, १३ मार्च**
दहावीचा गणिताचा पेपर फुटल्याचा चर्चेने संपूर्ण राज्यात खळबळ उडाली होती. मात्र पुणे पोलिसांनी अवघ्या काही दिवसांत या प्रकरणाचा छडा लावून पेपरफुटीचा हा दावा फोल ठरवला आहे. परीक्षार्थींची दिशाभूल करून आणि पेपरचे आमिष दाखवून पैसे उकळणारा हा एक डिजिटल बनाव असल्याचे समोर आले असून पोलिसांनी तांत्रिक कौशल्याच्या जोरावर चंद्रपूरमधील १८ वर्षीय तरुणाला अटक केली आहे.

दहावीच्या परीक्षेदरम्यान गणिताचे दोन्ही पेपर एका टेलिग्राम ग्रुपवर परीक्षा होण्यापूर्वीच उपलब्ध झाल्याची तक्रार पोलिसांना प्राप्त झाली होती. या तक्रारीनुसार, ९ मार्चचा पेपर चक्क ६ मार्चलाच ग्रुपवर पोस्ट करण्यात आला होता. या प्रकरणी पुणे बोर्डाचे सहायक अधीक्षक चंद्रकांत वैजनाथ जेवळीकर यांनी शिवाजीनगर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली होती. तपासादरम्यान पोलिसांना आरोपीने प्रश्नपत्रिकेच्या बदल्यात पैसे मिळवण्यासाठी वापरलेला एक क्यूआर कोड मिळाला. हा कोड स्कॅन केला असता संबंधित तरुणाचे नाव समजले. पोलिसांनी फोन पे कंपनी आणि टेलिग्रामकडून तांत्रिक माहिती मिळवली. त्यादरम्यान पोलिस अंमलदार तेजस चोपडे, गणेश जाधवर यांनी तांत्रिक तपास करून आरोपी चंद्रपूर येथील असल्याचे निष्पन्न केले. शिवाजीनगर पोलिसांनी तत्काळ एक पथक चंद्रपूरला रवाना केले आणि १८ वर्षीय तरुणाला ताब्यात घेतले. आरोपीने टेलिग्रामवर एक ग्रुप तयार करून त्यामध्ये प्रश्नपत्रिका आधीच मिळवून देण्याचा दावा केला होता. परीक्षेच्या एक दिवस आधी टेलिग्रामवर पासवर्डने संरक्षित पीडीएफ फाईल अपलोड करण्यात येत असे. त्यानंतर संबंधित ग्रुपमध्ये संदेश टाकून ६०० रुपयांत प्रश्नपत्रिका मिळतील, असे आमिष दाखवून विद्यार्थ्यांकडून पैसे मागितले जात होते. परिमंडळ एकचे पोलिस उपायुक्त कृषिकेश रावले, वरिष्ठ पोलिस निरीक्षक गिरीशकुमार दिघावकर यांच्या मार्गदर्शनाखाली, अंमलदार तेजस चोपडे, गणेश जाधवर आणि गणपत वालकोळी, अर्जुन कुडाळकर यांच्या पथकाने ही कारवाई केली. ◂(तभा वृत्तसेवा)

> संबंधित प्रकरणात चंद्रपूर जिल्ह्यातील एका तरुणाला अटक करण्यात आली आहे. तांत्रिक पद्धतीने त्याने ही फसवणूक केली आहे. या प्रकरणी त्याची आणखी चौकशी सुरू आहे.
> - **कृषिकेश रावले**, पोलिस उपायुक्त, परिमंडळ एक

# राज्यावर गारपीट, उन्हाळी पावसाचे सावट



**मुंबई** : विदर्भापासून दक्षिण मध्य महाराष्ट्रापर्यंत वाऱ्याची द्रोणीय स्थिती (ट्रफ) निर्माण झाल्यामुळे पुढील चार दिवस विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, मध्य महाराष्ट्राच्या दक्षिणेकडील जिल्ह्यांत मेघगर्जना आणि सोसाट्याच्या वाऱ्यासह उन्हाळी पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, विदर्भापासून दक्षिण मध्य महाराष्ट्रापर्यंत वाऱ्याची द्रोणीय स्थिती निर्माण झाली आहे. द्रोणीय स्थितीमुळे एकाच वेळी अरबी समुद्रावरून आणि बंगालच्या उपसागरावरून बाष्पयुक्त वारे राज्याच्या दिशेने येत आहेत. त्यामुळे ताशी ३० ते ४० किलो मीटर वेगाने वारे वाहून, मेघगर्जनेसह उन्हाळी पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. दरम्यान, कृषी विभागाने १७ ते २० मार्च दरम्यान राज्यातील काही भागांमध्ये दुपारनंतर मेघगर्जनेसह पाऊस, वादळी वारे आणि गारपीठ होण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. वादळी वारे, पाऊस आणि संभाव्य गारपिटीपासून पिकांचे नुकसान टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी खबरदारी घ्यावी, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

### ॲट्रॉसिटी कायद्यांतर्गत चौकशीनंतरच गुन्हा : मंत्री शिरसाट



**मुंबई** : पूर्वी 'ॲट्रोसिटी'चा गैरवापर केला जात असे. म्हणून आपण या कायद्यात बदल केले. आता 'ॲट्रोसिटी'अंतर्गत 'एफआयआर' दाखल झाल्यावरही समितीतर्फे चौकशी होते, गुन्हा सिद्ध झाला तरच अटक करण्यात येते अन्यथा 'एफआयआर' रद्द होतो. कुणावरही विनाकारण अन्याय होऊ नये, हा यामागील उद्देश आहे, अशी माहिती राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी आज विधान परिषदेत एका प्रश्नाला उत्तर देताना दिली.

# मासिक पाळीत पगारी रजा अनिवार्य केल्यास करिअरवर परिणाम

## महिलांना कमकुवत समजू नका: सर्वोच्च न्यायालयाचे निरीक्षण



◆ **नवी दिल्ली, १३ मार्च**
मासिक पाळीशी संबंधित शारीरिक त्रासाचा विचार करून महिला कर्मचाऱ्यांना पगारी रजा देण्याची मागणी करणारी याचिका ऐकण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला आहे. शुक्रवारी झालेल्या सुनावणीत न्यायालयाने अत्यंत महत्त्वाची निरीक्षणे नोंदवली. पगारी रजा घेणे अनिवार्य केल्यास महिलांच्या व्यावसायिक जीवनावर विपरित परिणाम होईल, असे न्यायालयाने म्हटले आहे.

सरन्यायाधीश सूर्यकांत आणि जस्टिस जॉयमाल्या बागची यांच्या न्यायासनासमोर ही सुनावणी पार पडली. यावेळी न्या. सूर्य कांत म्हणाले, महिलांना इतके कमकुवत समजू नका. तुमची मागणी ऐकायला जरी योग्य वाटत असली, तरी ती अंतिमत: महिलांचे नुकसानच करणारी ठरेल. जर पगारी रजा अनिवार्य केली, तर कंपन्या महिलांना नोकरी देण्याबाबत विचार करतील. अशा याचिकांमुळे महिलांच्या कार्यक्षमतेवर नकारात्मक परिणाम होतो आणि कामाच्या ठिकाणी त्यांच्या प्रगतीमध्ये अडथळे निर्माण होतात, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. शैलेंद्र मणी त्रिपाठी यांनी दाखल केलेल्या याचिकेवर न्यायालय सुनावणी करत होते.

सरन्यायाधीश पुढे म्हणाले, याचिकाकर्त्यांच्या वकिलाने त्यांच्या मागणीचे दूरगामी परिणाम समजून घेतले पाहिजेत. महिलांसाठी सकारात्मक कृती घटनात्मकदृष्ट्या वैध आहे. परंतु, त्यांनी नोकरीच्या क्षेत्रातील व्यावहारिक वास्तवांचाही विचार केला पाहिजे, असे न्यायमूर्ती बागची म्हणाले. ◂(वृत्तसंस्था)

### त्यांना कुणीही कामावर ठेवणार नाही

सरन्यायाधीश म्हणाले, ''याचिकाकर्त्याला कामाच्या ठिकाणी महिलांची मानसिकता समजलेली नाही. महिलांना येणाऱ्या समस्या लक्षात घेऊन खासगी कंपन्यांनी स्वेच्छेने रजा दिली आहे, असा युक्तिवाद वकिलाने केला. स्वेच्छेने रजा दिल्याबद्दल सरन्यायाधीशांनी खासगी कंपन्यांचे कौतुक केले. न्यायासनाने टिप्पणी केली की, ज्या क्षणी तुम्ही कायदा आणता, अनिवार्य अट घालता, तेव्हा तुम्हाला माहिती नसते की, तुम्ही त्यांच्या करिअरचे किती नुकसान करणार आहात. कारण त्यांना कुणाही कामावर ठेवणार नाही.'' ■

### सरकारने याचिकाकर्त्यांच्या मागणीवर विचार करावा

युक्तिवाद ऐकल्यानंतर, न्यायासनाने सर्व संस्थांमध्ये महिलांसाठी पगारी मासिक पाळीच्या सुटीची मागणी करणारी याचिका निकाली काढली. तसेच न्यायालयाने केंद्र सरकारला सर्व हितचिंतकांशी सल्लामसलत केल्यानंतर मासिक पाळीच्या सुट्यांबाबत धोरण तयार करण्यासाठी याचिकाकर्त्यांच्या अर्जावर विचार करावा, असे सांगितले. ■

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### महानगरपालिकेच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज यांना अभिवादन

**सोलापूर, दि. १३ मार्च-**

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुण्यतिथी दिनानिमित्त जुना पुना नाका येथील छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्यास व कौन्सिल हॉल येथील महापौर यांच्या कार्यालयात छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सभागृहनेते नरेंद्र काळे, नगरसेवक गणेश वानकर, नगरसेवक विजय चिप्पा, नगरसेवक विनोद भोसले, नगरसेवक सार्थक बडवे, नगरसेवक सतिश सिरसिल्ला, नगरसेवक सत्यजीत वाघमोडे, नगरसेविका विजया खरात, नगरसेविका श्रद्धा पवार, नगरसेविका मृण्मयी गवळी, नगरसेविका सोनाली गायकवाड, नगरसेविका कल्पना कदम नगरसेविका निर्मला जंगम, नगरसेविका श्वेता खरात, नगरसेविका मृण्मयी गवळी, नगरसेविका अलका भवर, नगरसेविका सारिका खजूर्गी, नागेश खरात, किरण पवार, वसू यलदंडी, सिद्धाराम खजूरगी, अविनाश दासरी उपस्थित होते.



### लायन्स क्लबतर्फे महिला दिन साजरा

**सोलापूर दि. १३ मार्च-**

लायन्स इंटरनॅशनल अंतर्गत डिस्ट्रिक्ट ३२३४ डी - १ लायन्स क्लब सिटीच्या वतीने जागतिक कामगार महिला जागतिक महिला दिन संपन्न झाला. राजुसा शालगर, सिद्धेश्वर गारमेंटचे चन्नबसू माळगे, गुरु शालगर उपस्थित होते. लायन्स क्लबचे सोलापूर सिटीचे अध्यक्ष लायन मोहन भूमकर यांनी महिला दिनाबद्दल विशेष माहिती देऊन त्यांच्या महिला कामगाराचा जागतिक महिला दिन औचित्य साधून भेट वस्तू देउन सत्कार करण्यात आला. आभार चन्नबसू माळगे यांनी केले.



### महापालिकेच्या वतीने माजी उपपंतप्रधान यशवंतराव चव्हाण यांना अभिवादन

**सोलापूर, दि. १३ मार्च-**

महानगरपालिकेच्या वतीने भारताचे माजी उपपंतप्रधान यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथी दिनानिमित्त कौन्सिल हॉल येथील महापौर यांच्या कार्यालयामध्ये यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी स्थायी समिती सभापती रंजिता चाकोते, नगरसेवक विनोद भोसले, नगरसेवक सतीश सिरसीला, नगरसेवक विजय चिप्पा, नगरसेविका कल्पना कदम, मंजिरी किल्लेदार, सारिका खजुरगी, सोनाली गायकवाड, दीपिका यलदंडी, मृण्मयी गवळी, कविता गज्जम, वासू येलदंडी, कामगार कल्याण अधिकारी अजितकुमार खानसोळे उपस्थित होते.



### महिला दिनानिमित्त आरोग्य शिबीर संपन्न

**सोलापूर, दि. १३ मार्च-**

लायन्स इंटरनॅशनल अर्तगंत लायन्स क्लब ऑफ सोलापूर सिटी व विणकर बाग प्रभात मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने महिला दिनानिमित्त आरोग्य शिबीर आणि सत्कार सोहळा संपन्न झाला. याचे उद्घाटन नगरसेवक प्रवीण दर्गोपाटील, लायन रिजन चेअरमन ॲड. श्रीनिवास कटकुर, डॉ. प्रकाश घाटोळे, योग तज्ञ अवसेकर, ॲड.आर. जी. मेत्रस, लायन अध्यक्ष मोहन भूमकर, झोन चेअरमन लायन सोमशेखर भोगडे आदींच्या उपस्थितीत झाले. विणकर बाग साखर पेठ येथे आरोग्य शिबिरात शुगर तपासणी व बीपी तपासणी करण्यात आली. यावेळी सभासदांना टी-शर्ट देण्यात आले. कार्यक्रमास वनराज बंडी, विजयकुमार दासरी, शरदचंद्र दासरी, नागेश कन्ना, बाबू चव्हाण, सुरेश श्रीगिरी, अशोक हबीब, शंकर कनकी उपस्थित होते.

# ड्रीम फाऊंडेशनतर्फे राष्ट्रीय जलसाक्षरता दिंडी उद्यापासून

## सोलापूर ते श्रीशैलपर्यंत करणार पाण्याबाबत जनजागृती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ मार्च-**

ड्रीम फाऊंडेशनतर्फे श्री सिध्देश्वर मंदिर ते श्री कपिलसिध्द मल्लिकार्जुन मंदिर श्रीशैलपर्यंत राष्ट्रीय जलसाक्षरता दिंडीचे आयोजन दि. १५ ते २० मार्च दरम्यान करण्यात आले आहे,अशी माहिती संयोजक काशिनाथ भतगुणकी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

जागतिक जल व हवामान दिनाच्या औचित्याने ड्रीम फाऊंडेशन, बसव संगम शेतकरी गट, राजमाता जिजाऊ महिला शेतकरी उत्पादक कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने या जलसाक्षरता दिंडीचे आयोजन करण्यात आले आहे. ग्रामदैवत शिवयोगी श्री सिध्देश्वर महाराज मंदिर सोलापूर ते श्री कपिलसिध्द मल्लिकार्जुन महाराज मंदिर, श्रीशैलम दरम्यान ही दिंडी काढण्यात येणार आहे. १२ व्या शतकामध्ये हजारो लोकांना एकत्र घेवून शिवयोगी सिध्दारामेश्वर महाराजांनी तलाव खोदून श्रमदानातून मोठे तलाव निर्माण करुन लोकांना पाण्याची सोय करण्यात आली. सध्या जगभर पाण्याचे संकट निर्माण झाले असून लोकांमध्ये जलजागृती करण्यासाठी ड्रीम फाऊंडेशन मागील १३ वर्ष राष्ट्रीय जलसाक्षरता संमेलन आयोजित करते. या माध्यमातून विविध शाळा महाविद्यालय व




सामाजिक संस्था यांच्या सहकार्याने जलजागृतीतून जनजागृती करणे हा उद्देश असून यंदा सोलापूर ते श्रीशैल असा जनजागृती दिंडी निघणार आहे.

दिंडीचे उद्घाटन रविवार दि.१५ मार्च रोजी सकाळी १० वाजता श्री सिध्देश्वर देवस्थान पंचकमिटीचे चेअरमन धर्मराज काडादी यांच्या हस्ते होणार असून यावेळी जलजागृती पोस्टर अनावरण, जलजागृती पत्रक प्रकाशन होणार आहे. या दिंडीचे नेतृत्व गुरुशांत भतगुणकी, गजराबाई भतगुणकी, शिवराज पाटील, परमेश्वर मतगुणकी, संगिता भतगुणकी, लक्ष्मीकांत पाटील, विठ्ठल सोडगी यांच्यासह महात्मा बसवेश्वर तरुण मंडळ, पाटील वस्ती गौडगांव बु., ड्रीम फाऊंडेशन, कुडल, बसवसंगम शेतकरी गट, संगमवस्ती येथील ६० हून अधिक जलनायक करणार आहेत.

गुरुवार दि. १९ मार्च रोजी श्रीशैल येथे जलजागृती संदेश नाटिका व जलसाक्षरता कार्यशाळा आणि सन्मान सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये होणार आहे. सध्या संपूर्ण भारतभर सोलापुरी हुरडा गाजत आहे. १२ व्या शतकात ग्रामदैवत श्री सिध्देश्वर महाराजांनी श्रीशैलम मल्लिकार्जुन महाराज यांना खाऊ घातला होता. त्याचे आदर्श डोळ्यांसमोर घेवून २१ व्या शतकात सोलापूरचा हुरडा देशभर प्रसिध्द करुन सोलापूरातील शेतकऱ्यांना आर्थिक सक्षम करण्यासाठी ड्रीम फाऊंडेशन व बसवसंगम शेतकरी गट प्रयत्नशील आहे. सोलापुरी हुरड्याचा श्रीशैल येथील कपिलसिध्द मल्लिकार्जुन यांच्या यात्रेत सहभागी भाविकांना वाटप करण्यात येणार आहे, असेही काशिनाथ भतगुणकी यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस सुरेश वाघमोडे उपस्थित होते.

## मॅफेड्रीन जप्त, एकाला अटक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ मार्च-**

करमाळा पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाने शहरात मॅफेड्रीन हा अंमली पदार्थ जवळ बाळगत असलेल्या इसमास ताब्यात घेवून ४४ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला. शाहरुख ताजोद्दीन तांबोळी (वय-३२, रा. मौलाली नगर, ता.करमाळा) असे अटक करण्यात आलेल्या इसमाचे नाव आहे.

एक इसम मॅफेड्रीन हा अंमली पदार्थ जवळ बाळगून जिन मैदान येथे थांबल्याची माहिती करमाळा पोलिस ठाण्यातील पोलिस नाईक वैभव ठेंगल यांना मिळाली होती. त्यानुसार त्यांनी पथकासह तिकडे धाव घेतला असता मैदानाचे बाहेरील बंद असलेल्या गाळ्याच्या समोरील पायऱ्यांवर एक इसम खाली बसलेला दिसला. त्याची अंगझडती घेतली असता त्याच्या शर्टच्या खिशामध्ये प्लॅस्टिकच्या पिशवीमध्ये पांढऱ्या रंगाची पावडर मिळून आली.

मॅफेड्रीन हा अंमली पदार्थ हर्षा काळे (रा.सालसे, ता.करमाळा) याच्याकडून विकत घेतल्याचे त्याने सांगितले. त्यानुसार हर्षा काळेचा शोध घेतला मिळून आला नाही. पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलिस अधीक्षक प्रितम यावलकर, अप्पर पोलिस अधीक्षक अंजना कृष्णा यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि रणजीत माने, सपोनि मनोज अभंग, पोहेकॉ अजित उबाळे, आप्पासाहेब लोहार, पोना मनिष पवार, वैभव ठेंगल, पोकॉ अर्जुन गोसावी, हनुमंत भराटे, रविराज गटकुळ, अमोल रंदील, गणेश खोटे, अमोल पवार यांनी ही कामगिरी बजाविली.

## सरकारी कामात अडथळा प्रकरणी निर्दोष मुक्तता

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १३ मार्च-**

कार्यरत असलेले कृषि सहाय्यक व सेवानिवृत्त कृषि पर्यवेक्षक बुरगुटे यांची सरकारी कामात अडथळा केल्याप्रकरणी निर्दोष मुक्तता करण्यात आली.

आरोपी सुदर्शन गणपत बुरगुटे, वय ३०, कृषि सहाय्यक, कृषि विभाग महाराष्ट्र राज्य शासन येथे कार्यरत आहेत व त्यांचे वडिल बिभिषण गणपत बुरगुटे वय ६०, सेवानिवृत्त हे कृषि पर्यवेक्षक म्हणून कार्यरत होते. दोघेही रा. उपळे (दु), ता. बार्शी यांची मे. अतिरिक्त सत्र न्यायाधिश, बार्शी यांनी फिर्यादीच्या सरकारी कामात अडथळा आणला व मारहाण केली या आरोपातून निर्दोष मुक्तता केली.यातील फिर्यादी नरसु नाना मते, वय ५८, रा. झाडी, ता. बार्शी हे ता. ५ सप्टेंबर २०१५ रोजी महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ खात्यामध्ये उपळे (दु) शाखेत सेक्शन ऑफिसमध्ये असिस्टंट लाईनमन म्हणून काम करीत होते. राज्य विद्युत मंडळाचे वरिष्ठ अधिकारी जाधव साहेब यांनी हिंगणी तलाव येथे पाण्यासाठी राखीव कोटा केला आहे व तेथे असलेल्या शेतीपंपाचा विद्युत पुरवठा खंडीत करण्याचे आदेश दिले. त्यावेळी आरोपीच्या खाजगी विहीरीवरील पंपावरील विद्युत पुरवठा खंडीत केला. त्याबाबत फिर्यादीला ता.५ मार्च २०२५ रोजी सकाळी १० वा. उपळे (दु) स्टॅन्डवरती दोन्ही आरोपीनी जाब विचारला व विद्युत पुरवठा खंडीत का केला? कनेक्शन जोडून दे, असे म्हणून आरोपीने हाताने व लाथाने फिर्यादीस मारहाण केली म्हणून फिर्यादीने फिर्याद दाखल केली होती. सदर खटल्याची सुनावणी अतिरीक्त सत्र न्यायाधिश बार्शी येथे होऊन आरोपीतर्फे ॲड. भारत कट्टे यांनी युक्तिवाद केला की, महाराष्ट्र शासनाने हिंगणी तलावाबाबत केलेला आदेश सादर केला नाही, तसेच वरिष्ठ अधिकारी जाधव साहेब यांचा जबाब नोंद केला नाही, मारहाण केलेबाबत डॉ. काळोखे यांची साक्ष नोंद केली नाही. तसेच मारहाण केली त्या ठिकाणाचे प्रत्यक्ष साक्षीदारांचे जबाब मे. कोर्टात नोंद केले नाहीत, फिर्यादी हा सरकारी ड्युटीवर होता याबाबत कागदोपत्री पुरावा हजर केला नाही. सदरचा युक्तिवाद ग्राह्य धरुन मे. कोर्टाने दोन्ही आरोपींची निर्दोष मुक्तता केली. यात आरोपीतर्फे ॲड. भारत कट्टे, ॲड. गणेश जगताप (बार्शी), ॲड. राही पवार (सोलापूर) यांनी काम पाहिले.

## विशेष पोलिस महानिरीक्षकांनी वार्षिक तपासणी करत साधला संवाद

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १३ मार्च-**

विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापुर परिक्षेत्र, सुनील फुलारी यांनी पोलीस अधीक्षक कार्यालय, पोलीस ठाण्यास भेट देऊन वार्षिक तपासणी करत अधिकारी अंमलदार यांच्याशी संवाद साधत मार्गदर्शन केले.

सुनिल फुलारी, विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापुर हे दि. १० मार्च पासून सोलापूर ग्रामीण जिल्हयाच्या वार्षिक तपासणी दौऱ्यावर असून उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, मंगळवेढा, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, अकलुज विभाग तसेच पंढरपूर ग्रामीण, मंगळवेढा व टेंभूर्णी पोलीस ठाणेची तपासणी घेतली.

दि. १२ मार्च रोजी सुनिल फुलारी, विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र कोल्हापूर यांनी पोलीस अधीक्षक, कार्यायास, सर्व शाखांना भेट देवून तपासणी केली. या दरम्यान पोलीस



अधीक्षक कार्यालयातील शाखा प्रभारी अधिकारी यांच्याशी संवाद साधून शाखेच्या कामकाजाचा आढावा घेतला. तसेच कार्यपद्धती अधिक प्रभावी व गतिमान करण्याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी सुनिल फुलारी विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापुर परिक्षेत्र, कोल्हापुर, अपर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर, अंजना कृष्णा, सहायक पोलीस अधीक्षक, करमाळा विभाग, संतोष वाळके, उपविभागीय पोलीस अधिकारी, अकलूज तसेच राहूल आत्राम उपस्थित होते.

## अथर्व जाधव खून खटला : बाळू काळेंना उच्च न्यायालयात जामीन मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ मार्च-**

अवैध व्यवसायातील पैशाच्या हिशोबाच्या वादातून अथर्व जाधव याचा खून केल्याप्रकरणी अटकेत असलेले बाळु उर्फ औदूंबर प्रकाश काळे, रा. विजापूर रोड, सोलापूर यांच्या जामीन अर्जाची सुनावणी मुंबई उच्च न्यायालयच्या कोल्हापूर सर्किट बेंचचे न्यायमुर्ती श्री. सचिन देशमुख यांच्यासमोर होऊन न्यायमुर्तीनी आरोपी बाळु उर्फ औदुंबर काळे ची जामिनावर मुक्तता करण्याचे आदेश दिले.

या प्रकरणी हकीकत अशी की, अवैध व्यवसायाच्या आर्थिक हिशोबावरुन आरोपी व त्यांचे भागीदार यांच्यामध्ये वाद उपस्थित झालेला होता. सदरचा वादामुळे आरोपी बाळु काळे हे त्यांचे भागीदारांवरती चिडुन होते. दि. ४ ऑक्टोंबर २४ रोजी सायं. ५ वाजता बाळु काळे व त्यांचे साथीदारांनी कट केला व वाहनांमधून हत्यार घेऊन इंडियन मॉडेल इंटरनॅशनल स्कूलचे पाठीमागील मोकळया मैदानातील ऑफिसमध्ये येऊन हिशोबाच्या कागदाची मागणी केली व ऑफिसमधील सर्व साहित्य व हिशोबाच्या नोंद वहया ताब्यात घेऊन साहित्याची तोडफोड केली व ऑफिसमधील कामगारांना मारहाण करण्यास सुरुवात केली व सदर मारहाणीत कामगार अथर्व जाधव यास बांबु ,कुऱ्हाड, कोयता व तलवार अशा शस्त्राने मारहाण करुन त्यास जखमी केले व तो उपचारादरम्यान अश्विनी सहकारी रुग्णालय येथे मरण पावला, असे सरकार पक्षाचे म्हणणे होते. यातील आरोपी बाळु उर्फ औदूंबर प्रकाश काळे याचा जामीन अर्ज सोलापूर सत्र न्यायालयाने फेटाळून लावला होता. त्यानंतर आरोपी बाळू काळे यांनी कोल्हापूर उच्च न्यायालयात ॲड. जयदीप माने यांच्यामार्फत जामीन अर्ज दाखल केला होता. जामीन अर्जाची सुनावणी कोल्हापूर उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सचिन देशमुख यांच्यासमोर झाली. सुनावणी वेळी आरोपीचे वकील ॲड. जयदीप माने यांनी आपल्या युक्तिवादामध्ये आरोपीला सदर खटल्यामध्ये खोटेपणाने गुंतवलेले आहे, अथर्व जाधव याचा मृत्यु हा अपघाती आहे तसे प्रथम नोंदीवरून दिसून येते, असा युक्तिवाद केला. सदरचा युक्तिवाद ग्राह्य धरुन न्यायमूर्तीनी आरोपी बाळु काळे याची जामिनावर मुक्तता करण्याचे आदेश दिले. या प्रकरणी आरोपीतर्फे ॲड. जयदीप माने यांनी तर सरकारतर्फे ॲड. ए. एस. साळगावर यांनी काम पाहिले.

## 'समाधान योजना' शिबिरास बोरामणी गटातील ग्रामस्थांचा प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ मार्च-**

सर्वसामान्य नागरिकांची महसूल विभागाशी संबंधित कामे तातडीने मार्गी लावण्याच्या उद्देशाने बोरामणी येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान योजना शिबीर घेऊन नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या अनेक समस्या मार्गी लावल्या. यावेळी जिल्हा परिषद सदस्य नेताजी खंडागळे यांच्या हस्ते विविध दाखल्यांचे वाटप करण्यात आले.

या शिबिरामध्ये ७/१२ उतारे, फेरफार नोंदी, शेतजमिनीच्या नोंदी, जात प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, संजय गांधी, श्रावण बाळ मंजुरी आदेश, रेशन कार्ड नोंदी, निवडणूकविषयक नोंदी, आरोग्य तपासणी, भूमी अभिलेख विभागाचे प्रॉपर्टी कार्ड, कृषि विभागाच्या वतीने फवारणी पंप, सुधारित सोयाबीन बियाणे वाटप, जिवंत सातबारा मोहिमेतील लाभार्थी यांना सातबारा वाटप, पी एम किसान समस्येचे निराकरण, ग्री स्टॅक अंतर्गत फॉर्मर आय डी आदी कामे तत्काळ निकाली काढण्यात आली.

यावेळी तहसीलदार किरण जमदाडे, जिल्हा परिषद सदस्य नेताजी खंडागळे, पं. स. सदस्य विजय राठोड, सोमनाथ पटणे, बोरामणीच्या सरपंच अरुणा साळुंखे, सिद्धाराम हेले, अनिता मळगे, महेश पाटील, नाना भोसले, विविध शासकीय विभागाचे अधिकारी यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.



## मेहता शाळेत कला-इतिहास प्रदर्शनाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ मार्च-**

कै. वि. मो. मेहता माध्यमिक शाळेत विद्यार्थ्यांना भारतीय कला आणि इतिहास समजावा या उद्देशाने कला -इतिहास प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. या प्रदर्शनामध्ये प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंतच्या विविध कला प्रकारांची माहिती, वस्तूरूप आणि चित्ररूप मांडणी करण्यात आली होती.

विद्यार्थ्यांनी अजिंठा-वेरूळ लेण्यातील चित्रकला, प्राचीन शिल्पकला, लोककला, किल्ले तसेच विविध कालखंडातील प्रसिद्ध चित्रकार व त्यांच्या कलाकृतींचे आकर्षक सादरीकरण केले. सोलापूर मधील चार हुतात्मे, ऐतिहासिक वास्तू यांचे चार्ट, मॉडेल्स, कोलाज आणि चित्रांच्या माध्यमातून कला व इतिहास विद्यार्थ्यांनी अतिशय सुंदर पद्धतीने मांडला तसेच या प्रदर्शनाबरोबरच प्रमुख अतिथी नितीन अणवेकर यांच्या संग्रहातील विविध नोटा,तिकीटे, काडीपेटीच्या काड्यांचे कव्हर्स, पोस्टकार्ड, शिवकालीन पत्रे यांचेही प्रदर्शन भरवण्यात आले होते.

प्रदर्शनाचे उद्घाटन सोलापूर मधील प्रसिद्ध इतिहास अभ्यासक नितीन अणवेकर यांच्या हस्ते करण्यात आले. सूत्रसंचालन सहशिक्षिका प्रतिमा स्वामी यांनी केले. प्रास्ताविक श्रुती बागेवाडी यांनी करून दिली. शाळा समिती अध्यक्ष सुरेश मंकणी यांनी प्रमुख पाहुण्यांचा सत्कार केला. कला शिक्षिका मधुरा देशपांडे यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले. यावेळी पर्यवेक्षिका मीनाक्षी भाटवडेकर उपस्थित होते.

# निस्वार्थी सेवेतून बनल्या शेतकऱ्यांचा आधार

▶▶ ग्राम महसूल अधिकारी संजीवनी स्वामी

▶▶ पांगरदरवाडी हे स्वतंत्र महसूली गाव करण्यात यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ मार्च-**

जागतिक महिला दिनानिमित्त तुळजापूर तालुक्यातील सांगवी (काटी) व पांगरदरवाडी या गावांसाठी कार्यरत असलेल्या ग्राम महसूल अधिकारी संजीवनी स्वामी यांचे कार्य विशेष उल्लेखनीय आहे. सरकारी सेवेत प्रामाणिकपणा, पारदर्शकता आणि लोकाभिमुख दृष्टिकोन ठेवत त्यांनी शेतकऱ्यांच्या विविध समस्यांचे निराकरण करण्यासाठी सातत्याने काम केले आहे.

दरम्यान, सांगवी काटी या महसूली गावातून पांगरदरवाडी हे स्वतंत्र महसूली गाव करण्याच्या प्रक्रियेतही स्वामी यांनी महत्त्वाची भूमिका निभावली आहे.



महसूल विभागातील कामकाज अनेकदा कागदपत्रे, नोंदी आणि तांत्रिक प्रक्रियेमुळे गुंतागुंतीचे असते. मात्र श्रीमती स्वामी यांनी शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेत त्यांच्या जमिनीशी संबंधित कामे जलदगतीने पूर्ण करण्यावर भर दिला आहे. शेतकऱ्यांना सातबारा, फेरफार, जमीन नोंदी यांसारख्या महत्त्वाच्या कामांबाबत मार्गदर्शन करून त्यांची कामे वेळेत पूर्ण करून देणे शेतकऱ्यांच्या विविध अडचणी सोडवणे, त्यांच्या जमिनीशी संबंधित प्रश्न तत्परतेने मार्गी लावणे आणि कार्यालयीन कामात पारदर्शकता ठेवणे हे त्यांच्या कामाचे वैशिष्ट्य आहे.

सांगवी काटी या महसूली गावातून पांगरदरवाडी हे स्वतंत्र महसूली गाव करण्याच्या प्रक्रियेतही स्वामी यांनी महत्त्वाची भूमिका निभावली आहे. सातबारा वेगळा करण्याच्या तांत्रिक प्रक्रियेत अनेक कागदपत्रे, नोंदी आणि तपशीलांची अचूक पूर्तता आवश्यक असते. ही प्रक्रिया सुरळीत पार पडावी यासाठी त्यांनी दिवस-रात्र मेहनत घेत तांत्रिकदृष्ट्या काटेकोरपणे काम केले. त्यांच्या या प्रयत्नांमुळे शेतकऱ्यांना जमिनीच्या नोंदींबाबत मोठा दिलासा मिळून पांगरदरवाडी हे महसूली गाव बनवण्यात त्यांनी महत्वाची भूमिका असल्याचे गावकरी सांगतात. जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने समाजासाठी प्रामाणिकपणे आणि निस्वार्थी भावनेने सेवा देणाऱ्या स्वामी या अनेक महिलांसाठी प्रेरणादायी उदाहरण ठरल्या आहेत. त्यांच्या कार्यामुळे महसूल विभागाबद्दल लोकांमध्ये विश्वास आणि सकारात्मकता निर्माण होत असल्याचे नागरिकांकडून सांगितले जाते.

## हद्द मोजमाप करण्याचे साहित्य गेले चोरीला

**सोलापूर, दि. १३ मार्च-**

कुमठा नाका येथून दि. १२ मार्च रोजी अश्फाक अब्दुल रशीद भागानगरी राहणार ३२१ / ३ मुस्लिम पाच्छा सोलापूर यांची हद्द मोजमाप करण्याचा लायका कंपनीचे रिसिव्हर व एक लोखंडी रॉड हे नागेश कोरे यांच्या राहत्या घरासमोरील पत्राच्या शेडमध्ये मोटरसायकलला लावलेले ७० हजार रुपयांचे साहित्य अज्ञात चोरट्याने चोरून नेले आहे. याबाबत अज्ञात चोरट्या विरोधात एमआयडीसी पोलीस ठाण्यात दि. १२ मार्च रोजी गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास उबाळे करत आहेत.

# जिल्ह्यात लाखो घरकुलांचे बांधकाम रखडले

## निधी आणि वाळूचा येतोय अडसर | अनुदानासाठी दीड ते दोन महिन्यांचा विलंब

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ मार्च-**

घरकुलांचे बांधकाम वेळेत पूर्ण करण्याचे आदेश शासन स्तरावरुन दिले जात असले तरी सोलापूर जिल्ह्यात मात्र लाखों घरकुलांचे बांधकाम रखडल्याचे चित्र दिसून येत आहे. निधी आणि वाळूचा अडसर येत आहे. लाभार्थ्यांच्या खात्यावर अनुदानाचा हप्ता जमा होण्यास दीड ते दोन महिने विलंब होत असल्याचेही सांगण्यात येते.



सोलापूर जिल्ह्यात सध्या १ लाख ७३ हजार घरकुलांचे बांधकाम सुरु आहे. जिल्ह्यातील ९३ हजार लाभार्थ्यांना पहिला हप्ता, ४५ हजार लाभार्थ्यांना दुसरा हप्ता आणि ३५ हजार लाभार्थ्यांना तिसरा हप्ता मंजूर करण्यात आला आहे. राज्यस्तरावरील कक्षातून अंतिम मान्यता मिळाल्यावरच हप्त्याची रक्कम लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा केली जाते. मोफत वाळू वितरणाची व्यवस्था अद्याप सुरू झाली नाही. घरकुल अनुदान वितरणासाठी शासनाने सुरु केलेली 'स्पर्श' ऑनलाइन प्रणाली लाभार्थ्यांसाठी सुलभ ठरण्याऐवजी अडसर ठरत आहे.

घरकुलाचे बांधकाम झाल्यानंतर त्याचे जिओ-टॅगिंग फोटो आणि हप्त्याची माहिती पंचायत समितीकडून या प्रणालीवर अपलोड केली जाते. या माहितीची मुंबईतील स्वतंत्र कक्षाकडून तपासणी केली जाते आणि अंतिम मंजुरीसाठी दिल्लीतील ग्रामविकास मंत्रालयाच्या कार्यालयाकडे प्रक्रिया जाते. यासंपूर्ण तपासणी प्रक्रियेला जवळपास दोन महिने लागतात.

प्रत्यक्षात ही प्रक्रिया काही दिवसांत पूर्ण होऊ शकते; मात्र विलंबामुळे घरकुलांचे बांधकाम वेळेत पूर्ण होण्यावर परिणाम होत आहे.

### प्रशासनाने दिला दुजोरा

सोलापूर जिल्ह्यातील लाभार्थ्यांना पहिल्या टप्प्यात १५ हजार, दुसऱ्या टप्प्यात ७० हजार आणि तिसऱ्या टप्प्यात ३० हजार रुपये अनुदान देण्यात येते. परंतु ग्रामीण भागातील अनेक लाभार्थ्यांनी दोन महिन्यांपासून हप्ता खात्यावर जमा न झाल्याची तक्रार केली आहे. प्रशासनानेही या विलंबाला दुजोरा दिला आहे.

### पाठपुराव्याची गरज


लाभार्थ्यांची यादी पंचायत समितीकडे सुपूर्द करण्यात आली आहे. मात्र अद्यापही मोफत वाळू आणि निधी उपलब्ध होत नसल्यामुळे बांधकामावर परिणाम होत आहे. लाभार्थ्यांना कमी वेळेत अनुदान मिळावे यासाठी जिल्हा परिषदेने शासनाकडे पाठपुरावा करण्याची गरज आहे, असे कासेगावचे सरपंच यशपाल वाडकर यांनी सांगितले.

### उन्हाच्या झळा



सोलापूर : नेहरूनगर परिसरातील शासकीय मैदानावर सुरू असलेल्या राज्यस्तरीय धनुर्विद्या स्पर्धेत राज्यातून विविध जिल्ह्यातून खेळाडू व त्यांचे पालक आले आहेत. उन्हाच्या झळापासून ते छत्रीचा आसरा घेत ते या स्पर्धेचा आनंद घेत आहेत. (छायाचित्र : केवल तिवारी)

# जिल्हा परिषद, पंचायत समिती खर्च अहवालाची मुदत संपली



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.११ मार्च-**

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत उमेदवारांनी केलेल्या खर्चाचा तपशील सादर करण्यासाठी दिलेली मुदत संपली आहे. ज्या उमेदवारांनी निर्धारित वेळेत खर्चाचा तपशील सादर केलेला नाही, त्यांची माहिती संकलित करुन स्वतंत्र बैठक घेण्यात येणार आहे, असे जिल्हा परिषदेच्या मुख्य वित्त व लेखाधिकारी मीनाक्षी वाकडे-ठोके यांनी सांगितले.

खर्चाचा तपशील सादर करण्यासाठी उमेदवारांना एक महिना त्यानंतर आणखीन १५ दिवसांचा कालावधी देण्यात आला होता. हा कालावधी आता संपुष्टात आला आहे. दि.१० मार्चपर्यंत जमा झालेल्या अहवालांचे एकत्रित संकलन करून त्याची माहिती जिल्हाधिकाऱ्यांसमोर सादर केली जाणार असून त्यानंतर पुढील निर्णय घेतला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचा निकाल ९ फेब्रुवारी २०२६ रोजी जाहीर झाला होता. सर्व उमेदवारांनी १० मार्चपर्यंत निवडणूक खर्च सादर करणे आवश्यक होते. खर्चाची माहिती स्वीकारणे आणि त्याची पडताळणी करण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी मुख्य वित्त व लेखाधिकारी मीनाक्षी वाकडे-ठोके यांच्याकडे सोपवली होती.

सोलापूर जिल्ह्यात जिल्हा परिषदेचे एकूण ६८ गट असून या निवडणुकीत २७१ उमेदवार रिंगणात होते. त्यापैकी ८४ उमेदवारांनी खर्चाचा तपशील सादर केला आहे. तर जिल्ह्यातील ११ तालुक्यांतील पंचायत समित्यांमधील १३६ गणांसाठी झालेल्या निवडणुकीत २११ उमेदवारांनी सहभाग घेतला होता. त्यापैकी १२७ उमेदवारांनी आपला खर्च अहवाल जमा केला आहे, असेही त्यांनी सांगितले. सोलापूर जिल्ह्यातील सुमारे ६५० ग्रामपंचायतींच्या निवडणुका लवकरच होणार आहेत. भविष्यात कोणतीही अडचण निर्माण होऊ नये यासाठी उमेदवारांनी खर्च सादरीकरणाबाबत नियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक असल्याचेही प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले.

# अधिक शुल्क आकारणाऱ्या महाविद्यालयांवर कारवाई

**● ना.चंद्रकांत पाटील यांचा इशारा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ मार्च-**

व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती अर्जाची प्रक्रिया अधिक सुलभ करण्यात आली आहे. मुलींना १०० टक्के आणि मुलांना ५० टक्के शिक्षण शुल्क माफीचा लाभ देण्यात येत आहे. या निर्णयाविरोधी जे महाविद्यालय शुल्क आकारतील त्या महाविद्यालयांवर कारवाई करण्यात येणार आहे, असे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.

शिष्यवृत्ती अर्जातील माहितीची संख्या १३८ वरुन ६६ पर्यंत कमी करण्यात आली आहे. आवश्यक कागदपत्रे १७ वरुन ८ वर आणली आहेत. आता सीईटी डेटा थेट वापरला जाणार असल्याने विद्यार्थ्यांना वारंवार जात प्रमाणपत्र किंवा इतर कागदपत्रे सादर करावी लागणार नाहीत. कॉलेजेस्‌ची आर्थिक स्थिती लक्षात घेऊन पहिल्या हप्त्याचे वितरण लवकर केले जाईल. थकीत देयके वेळेवर अदा करण्यासाठी काही वित्तीय संस्थांशी चर्चा सुरु आहे. सरकार व्याज देईल आणि या संस्था थेट विद्यार्थ्यांचे किंवा कॉलेजचे शुल्क अदा करतील. फॉर्म भरताना होणाऱ्या चुका टाळण्यासाठी राज्यात ४० केंद्रे सुरु केली जात आहेत.

# वाडिया रुग्णालय आंतररुग्ण विभागाच्या इमारतीचा अनावरण सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ मार्च-**

एन.एम.वाडिया चॅरिटेबल रुग्णालयाच्या अंतररुग्ण विभागाच्या नूतन इमारतीचे अनावरण ई. सत्य फानी कुमार क्षेत्रीय कार्यकारी संचालक एनटीपीसी, जगदीश चंद्र शास्त्री - कार्यकारी संचालक एनटीपीसी, सोलापूर, श्रीमती वंदना चतुर्वेदी (आर. एच. ओ. एच. आर.) डब्ल्यूआर-१- एनटीपीसी मुख्यालय मुंबई आजि श्री जितेंद्र कुमार उपम हाव्यवस्थापक, डब्ल्यूआर-१- एनटीपीसी मुख्यालय मुंबई यांच्या शुभहस्ते झाले. या कार्यक्रमास एनटीपीसीचे अनेक पदाधिकारी व सोलापूर शहरातील अनेक मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक ॲडव्होकेट नितीन हबीब यांनी केले. डॉक्टर शिरीष कुम ठेकर ह्यांनी रुग्णालयाच्या नूतनीकरणाचा प्रवास उलगडून सांगितला.



आपल्या मनोगतात श्रीमती वंदना चतुर्वेदी म्हणाल्या की जुन्या रुग्णालयाला परत सरु करून त्याच उंचीवर नेणे हे अत्यंत कठीण काम आहे आणि सध्याचे सध्याचे रुग्णालयाचे संचालक मंडळ हे कार्य उत्तम रित्या करीत आहे. आम्ही दिलेल्या निधीचे उत्कृष्ट प्रकारे नियोजन होत आहे हे पाहून आनंद झाला. अनेक वर्षे बंद असलेल्या रुग्णालयात आत मध्ये शिरताना कल्पनाही आली नाही की इतके अद्यायावत रुग्णालय कार्यान्वित झाले आहे असे श्री जगदीश चंद्र शास्त्री आपल्या मनोगतात म्हणाले. रिजनल डायरेक्टर श्री ई. सत्य फानी कुमार म्हणाले की एनटीपीसी च्या सीएसआर निधीतून वाडिया रुग्णालय नूतनीकरणासाठी रक्कम देण्यात आली आणि या रकमेद्वारे एनटीपीसी ब्रँड समाजा पर्यंत पोहोचेल. ह्या कार्यक्रमात वाडिया रुग्णालायच्या सेवाव्रतींद्वारे इमारतीच्या नूतनीकरणासाठी काम केलेल्या कंत्राटदारांचा च कामगारांचा सत्कार करण्यात आला. सदर कार्यक्रमास शिरीष गोडबोले, डॉक्टर सुनील घाटे, डॉक्टर सुनील मेहता, डॉक्टर राजेंद्र अग्रवाल, सीए राजगोपाल मिनियार, संजय पटेल, डॉक्टर संदीप भागवत, सीए सुनील इंगळे, सीए राजेश पटवर्धन, राजेंद्र काटवे, रंगनाथ बंकापूर, श्रीनिवास मोहोळकर व इतर मान्यवर उपस्थित होते. आभार प्रदर्शन डॉक्टर राजेंद्र घुली ह्यांनी केले तर सूत्रसंचालन श्रीमती मंजुषा गाडगीळ ह्यांनी केले.

# मजुरी, कच्च्या मालामुळे साखर हाराच्या दरात वाढ



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ मार्च-**

मजुरी व कच्च्या मालामुळे यंदा साखरेच्या दरात ३० टक्के वाढ झाल्याचे सांगण्यात आले. हिंदू आणि मराठी नववर्षाच्या स्वागतासाठी साजरा होणाऱ्या गुढीपाडव्याच्या पार्श्वभूमीवर गुढीला चढवण्यासाठी लागणाऱ्या साखरेच्या हारांची निर्मिती शहरात वेगाने सुरु झाली आहे. सोलापूरमधील भोई गल्ली, साखरपेठ आणि मार्केट यार्ड परिसरात हार तयार करण्याची लगबग दिसून येत आहे.

१९ मार्च रोजी साजऱ्या होणाऱ्या गुढीपाडव्याच्या तयारीसाठी कारागीर आणि व्यापाऱ्यांची धावपळ सुरु आहे. जावई हार आणि खारीक-खोबऱ्याचा हारांची बाजारात क्रेझ असल्याचे दिसून येते. साखरेच्या हारांची ठोक विक्री सुमारे ११० रुपये, किरकोळ विक्री १४० ते १६० रुपये दरम्यान होत आहे. आकाराचे हार ३०० ते ७०० रुपये दराने विकले जात आहेत.

### जावई हारही महागला

गुढीपाडव्यानिमित्त जावयाला घरी बोलावून त्याच्या गळ्यात मोठा साखरेचा हार घालण्याची परंपरा आहे. या विशेष हाराला 'जावई हार' म्हटले जाते. साधारण पाच ते सहा किलो वजनाचे हे हार खास नक्षीकामासह तयार केले जातात. या हारांची किंमत ३०० ते ७०० रुपये दरम्यान आहे.

### हारांची मागणी मोठ्या प्रमाणात

कच्च्या मालाच्या किमती वाढल्या मुळे साखरेच्या हारांच्या दरात यंदा ३० ते ४० टक्क्यांची वाढ झाली आहे. तरीही गुढीपाडव्यामुळे बाजारात हारांची मागणी मोठ्या प्रमाणात आहे, असे हार निर्माते व विक्रेते बंडू शिंदे यांनी सांगितले.

### ग्रामीण भागातील ग्राहक लवकर खरेदी करतात

साखरेच्या हारांबरोबर खारीक-खोबऱ्याच्या हारालाही ग्रामीण भागातील ग्राहकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. ग्रामीण भागातील ग्राहक लवकरच खरेदी करत असतो. त्यामुळे साखरेचे हार लवकर तयार करून बाजारपेठेत विक्रीसाठी तयार करून ठेवले जातात, असे हार निर्माते व विक्रेते नाना भिसे यांनी सांगितले.

# सोलापूरसाठी चार व पाच दिवसाआड पाणीपुरवठा

**सोलापूर :** उन्हामुळे अतिरिक्त पंपिंग कमी होऊन पाणी उपसा कमी होत असल्याने शहरातील पाणी पुरवठयावर परिणाम होवून हद्दवाढ भागातील पाणी पुरवठा विस्कळीत होत आहे. यामुळे शहर व हद्दवाढ भागातील पाणीपुरवठा चार व पाच दिवसाआड करण्यात येणार आहे, अशी माहिती महापालिका सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे यांनी दिली.

उजनी धरणातून थेट पाईप लाईनद्वारे पाकणी जलशुध्दीकरण केंद्र व हिप्परगा तलाव येथून भवानीपेठ जलशुध्दीकरण येथून पाणीपुरवठा करण्यात येत आहे. सध्या उन्हाळा सुरु असून उन्हाची तीव्रता वाढल्यामुळे पाण्याच्या मागणीमध्ये वाढ झालेली आहे. उन्हामुळे विद्युत पुरवठा कमी जास्त होवून पंप ट्रीप होत असल्याने त्याचा परिणाम पाणी उपशावर होत आहे, असेही त्यांनी सांगितले.



# पद्मशाली शिक्षण संस्थेच्यावतीने महापौरांसह नूतन नगरसेवकांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ मार्च-**

येथील पद्मशाली शिक्षण संस्थेच्या वतीने महापौर विनायक कोंड्याल यांच्यासह पद्मशाली समाजातील नूतन नगरसेवकांचा संस्थेचे अध्यक्ष ॲड.श्रीनिवास क्यातम, सचिव दशरथ गोप यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

पद्मशाली शिक्षण संस्थेचे सचिव दशरथ गोप म्हणाले, बरेच नगरसेवक संस्थेच्या विविध शाखेत शिकलेले आहेत. समाजाच्या प्रगतीसाठी जे काही करता येईल ते करावे. रोजगाराचा प्रश्न सोडवण्यासाठी नवीन उद्योग सोलापुरात कसे येतील? यासाठी प्रयत्न करावा. महापौर विनायक कोंड्याल यांच्यासह नगरसेवक प्रथमेश कोठे, मेघनाथ येमूल, व्यंकटेश कोंडी, डॉ.अजय पोन्नम, सत्यनारायण गुर्रम, प्रशांत पल्ली, विजय चिप्पा, ज्ञानेश्वर म्याकल, सिध्देश्वर कमटम, शेखर इगे, सतीश सिरसिल्ला, नगरसेविका उज्ज्वला दासरी, स्वाती बडगू, दीपिका यलदंडी, कविता गज्जम, अर्चना वडनाल आदींचा यथोचित सत्कार करण्यात आला. याप्रसंगी प्रा.श्रीनिवास कोंडी, मल्लिकार्जून सरगम, दिनेश यन्नम, नागनाथ गंजी, श्रीधर चिट्याल, व्यंकटेश आकेन, संगीता इंदापुरे, मधुकर कट्टा, विजयकुमार गुल्लापल्ली, प्रभाकर आरकाल, नागनाथ श्रीरामदास, श्रीनिवास गड्डम, अंबादास गज्जम, अरविंद कुचन, श्रीनिवास इप्पाकायल, जयंत आकेन, अभिज भानप आदी उपस्थित होते.

# स्टार प्रवाह परिवार पुरस्कार सोहळ्यात कलाकारांच्या गुरुजनांचा विशेष सन्मान

## गुरुंच्या भेटीने भावूक झाले कलाकार

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि.१३ मार्च-**

यंदाचा स्टार प्रवाह परिवार पुरस्कार सोहळा अनेक अर्थांनी खास आणि संस्मरणीय ठरला. वर्षभर प्रेक्षकांचं मन जिंकणाऱ्या कलाकारांचा गौरव करणारा हा सोहळा म्हणजे केवळ पुरस्कारांचं व्यासपीठ नसून एकमेकांच्या यशाचा आनंद साजरा करणाऱ्या कुटुंबाचा सोहळा आहे. यंदाच्या सोहळ्यातील एक खास क्षण सर्वांच्या मनात कायमचा कोरला गेला. कलाकारांच्या यशाचा गौरव करणाऱ्या या मंचावर यंदा त्यांच्या यशामागे उभ्या असलेल्या शिक्षकांनाही मानाचा मुजरा करण्यात आला.



कलाकारांना घडवणाऱ्या, त्यांच्या आयुष्यात मार्गदर्शक ठरलेल्या शिक्षकांचा विशेष सन्मान या मंचावर करण्यात आला. ज्ञानाची खरी ज्योत ही जोतीरावांनी आणि सावित्रीबाईंनी पेटवली. त्याची पुढे मशाल झाली आणि ती अखंड धगधगत राहिली. आज या सावित्रीबाईंचा वारसा चालवण्याचं काम अनेक शिक्षिका करतायत. मी सावित्रीबाई जोतीराव फुले मालिकेच्या निमित्ताने सावित्रीबाईंचा वारसा चालवणाऱ्या सगळ्या सावित्रीच्या लेकींना सन्मान चिन्ह देऊन गौरवण्यात आलं.

मधुराणी गोखले, सुप्रिया पाठारे, शशांक केतकर, अमित भानुशाली, जुई गडकरी, शर्वरी जोग, मृणाल दुसानिस, अभिषेक रहाळकर, समृद्धी केळकर, एतशा संझगिरी, प्रतिक्षा मुणगेकर, माधवी निमकर, सुमीत पुसावळे, विशाल निकम, कृतिका देव, आकाश नलावडे, यशोमन आपटे आणि इंद्रनील कामत या कलाकारांच्या शिक्षिका याप्रसंगी उपस्थित होत्या. गुरुजनांना पुन्हा भेटण्याचा क्षण कलाकारांसाठी अत्यंत भावनिक होता. कलाकारांनी आपल्या शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त करत त्यांच्या आठवणींना उजाळा दिला.

गुरु-शिष्य नात्याचा हा सोहळा पाहताना उपस्थित प्रेक्षकांनाही तो क्षण तितकाच भावूक करुन गेला. कलाकारांच्या यशामागे उभ्या असलेल्या शिक्षकांना दिलेला हा सन्मान खऱ्या अर्थाने स्टार प्रवाह परिवार पुरस्कार सोहळ्याला अधिक अर्थपूर्ण बनवून गेला. तेव्हा पाहायला विसरु नका स्टार प्रवाह परिवार पुरस्कार सोहळा १५ मार्चला सायंकाळी ७ वाजता फक्त स्टार प्रवाहवर.





सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख...

# अविश्वासाचा निरर्थक प्रयोग

विरोधी पक्षांनी लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांच्याविरुद्ध मांडलेला अविश्वास प्रस्ताव अपेक्षेप्रमाणे फेटाळला गेला. अविश्वास प्रस्ताव फेटाळला जाणार याची विरोधी पक्षांना कल्पना नव्हती, असे नाही. पण हात दाखवून अवलक्षण करून घेण्याची खोड विरोधी पक्षांना जडली असेल तर त्याला कोण काय करणार? ओम बिर्ला यांच्याविरुद्ध मांडण्यात आलेला अविश्वास प्रस्ताव अनावश्यक तसेच खोडसाळपणाचा होता. त्याची काहीही गरज नव्हती. पण विनाशकाले विपरीत बुद्धी या उक्तीप्रमाणे विरोधी पक्षांनी, विशेषत: काँग्रेसच्या सदस्यांनी बिर्ला यांच्याविरुद्ध अविश्वास प्रस्ताव सादर करीत आपले हसे करून घेतले, असे या प्रस्तावावर झालेली भाषणे ऐकून वाटायला लागले.

संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू आणि गृहमंत्री अमित शाह यांच्यासह भाजपाच्या अनेक सदस्यांनी आपल्या घणाघाती भाषणात राहुल गांधी आणि काँग्रेस पक्षाच्या भूमिकेचे वाभाडे काढले. कुठून आपण बिर्ला यांच्याविरुद्ध अविश्वास आणला, असे चेहरे राहुल गांधी आणि अन्य काँग्रेस सदस्यांचे झाले होते. किरेन रिजिजू आणि अमित शाह यांनी काँग्रेसचे पुरते वस्त्रहरण करून टाकले. अविश्वास प्रस्तावावर भाषण करताना विरोधी पक्षांच्या अनेक सदस्यांनी बिर्ला यांचे लोकसभेतील सर्वच सदस्यांशी, विशेषत: विरोधी पक्षांच्या सदस्यांशी व्यक्तिगत जिव्हाळ्याचे संबंध असल्याचा निर्वाळा दिला. एकप्रकारे काँग्रेसच्या सदस्यांनी अविश्वास प्रस्ताव सादर करताना सभापती म्हणून बिर्ला यांच्याविरुद्ध जे आरोप केले, त्यांची हवा परस्पर काढून टाकली गेली.

लोकसभेच्या कामकाजाचे संचालन करणे, ही सभापती म्हणून बिर्ला यांची जबाबदारी आहे. लोकसभेच्या कामकाजाचे संचालन बिर्ला यांना मनमानी पद्धतीने करता येत नाही. संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या कामकाजाचे संचालन करण्याचे नियम आणि परंपरा आहेत. काही पायंडे- संकेत आहेत. त्यानुसारच सभागृहांच्या कामकाजाचे संचालन करावे लागते. सभागृहात गोंधळ घालणाऱ्या सदस्यांना वेळप्रसंगी रागावावे लागते, समज द्यावी लागते. वारंवार सांगूनही सदस्य ऐकत नसतील, घोषणाबाजी करीत असतील, तर नाईलाजाने सभागृहाचे कामकाज स्थगितही करावे लागते. काही वेळा असंसदीय आणि नियमबाह्य वर्तन करणाऱ्या सदस्यांना निलंबितही करावे लागते. निलंबनाचा कालावधी हा त्या सदस्याच्या गोंधळाच्या तीव्रतेवर अवलबूंन असतो. अनेकवेळा विरोधी पक्ष सदस्यांचे सभागृहातील वर्तन पाहून वर्गातील नाठाळ आणि उनाड विद्यार्थ्यांची आठवण येते. वर्गात गोंधळ घालणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांना गुरुजी छडीने मारू शकतात. महाविद्यालयात गोंधळ घालणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षकांना छडीने मारता येत नाही. ओम बिर्ला यांची स्थिती अनेकदा महाविद्यालयातील शिक्षकासारखी असते. नाईलाजाने त्यांना शाब्दिक मार द्यावा लागतो. विरोधी पक्षांतील उनाड आणि नाठाळ सदस्यांवर त्याचा फारसा परिणाम होत नाही. राज्यसभेत निवडून येणारे प्रतिनिधी थेट लोकांमधून निवडून येत नसतात, तर अप्रत्यक्ष पद्धतीने निवडून येत असतात. पण लोकसभेत निवडून येणाऱ्या प्रतिनिधींची स्थिती तशी नसते. दहा ते वीस लाख मतदारांचे प्रतिनिधित्व हे सदस्य करत असतात. लोकशाहीच्या सर्वोच्च मंदिरात आपले प्रश्न आणि समस्या मांडण्यासाठी जनतेने या लोकांना निवडून दिले असते, पण हे सदस्य ते काम करण्याऐवजी पक्षनेतृत्वाला खुश करण्यासाठी सभागृहात गोंधळ घालत असतात. मात्र, असे वागून आपण आपल्या मतदारसंघातील जनतेची फसवणूक करतो, त्यांचा विश्वासघात करतो, याची जाणीव त्यांना राहत नाही.

भाजपा २०१४ पासून सत्तेत आहे, त्याआधी प्रदीर्घ काळ या पक्षाला विरोधी बाकांवर बसावे लागले. भाजपाचे सदस्यही विरोधी पक्षांत असताना सभागृहात गोंधळ घालत होते, घोषणाबाजी करत होते. पण आपल्या कृतीने आपल्या मतदारसंघातील जनतेला मान खाली घालावी लागेल, अशी कृती त्यांनी केली नाही. त्या तुलनेत राहुल गांधी यांनी विरोधी पक्षनेतेपदाचे पार अवमूल्यन करून टाकले आहे. त्यांच्या आधी अनेकांनी विरोधी पक्षनेतेपद भूषवले, ते त्या पदाची प्रतिष्ठा आणि आब राखून. राहुल गांधी यांची सभागृहातील कृती ही अनेकवेळा अनियंत्रित आणि बेजबाबदारपणाची असते. सभागृहात बसले असताना डोळा मारणे, आपली जागा सोडून सत्ता पक्षाच्या बाजूला जाणे, पंतप्रधानांची गळाभेट घेणे असे पोरकट आणि आचरट चाळे राहुल गांधीच करू शकतात. घटनेने आपल्याला अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिले असले तरी त्याचा दुरुपयोग राहुल गांधी यांनी आतापर्यंत जेवढा केला, तेवढा खचीतच दुसऱ्या कोणी केला असेल. त्यांचे सभागृहातील वर्तन आता साऱ्यांना सरावाचे झाले आहे. नको ते बोलून आणि आवाज वाढवून ते स्वतःकडे लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न करतात खरे; पण त्यांच्या वर्तन वैशिष्ट्यांची ओळख असलेले विरोधी पक्षांतील सदस्य आणि राहुल गांधींच्या काँग्रेस पक्षातील सदस्यही त्यांना फारशा गांभीर्याने घेत नाहीत. आम्ही कोणते पाप केले म्हणून असा नेता आमच्या पदरी पडला, असे त्यांना वाटत असावे. त्याचीच पुढची पायरी म्हणजे पदरी पडले पवित्र झाले, अशी स्वत:ची ते समजूत करून घेत असतील.

मला सभागृहात बोलू दिले जात नाही, असे रडगाणे राहुल गांधी अखंड गात असतात. पण आपल्याला बोलू का दिले जात नाही, याचे आत्मपरीक्षण करण्याची मात्र त्यांची तयारी नसते. असे आत्मपरीक्षण केले असते, तर आपल्या प्रश्नाचे उत्तरही त्यांना सहजपणे मिळाले असते. आतापर्यंत अनेक मान्यवरांनी विरोधी पक्षनेतेपद भूषवले, पण त्यांच्यावर कधीच असे रडगाणे गाण्याची वेळ आली नाही. मला सभागृहात बोलण्यासाठी कोणाच्या परवानगीची गरज नाही, असे राहुल गांधी म्हणत असतात. याचा अर्थ असा की, पाचव्यांदा लोकसभेत निवडून आल्यानंतरही राहुल गांधींना संसदीय नियम काय असतात, लोकसभेचे कामकाज कसे चालते, हे समजलेले नाही. लोकसभेत कामकाज संचालनाचे सर्वोच्च अधिकार लोकसभेच्या सभापतींचे असतात. संसदभवन परिसराचा राजाही लोकसभेचा सभापतीच असतो. त्यांनी परवानगी दिली नाही तर विरोधी पक्षनेताच काय, पण सभागृहाचे नेते असलेले पंतप्रधानही बोलू शकत नाहीत, एवढे सामान्य ज्ञान विरोधी पक्ष नेते असलेल्या राहुल गांधींना असायला पाहिजे. त्यामुळेच राहुल गांधींना संसदीय नियम शिकविण्याची आवश्यकता असल्याचे भाजपा नेते आणि माजी केंद्रीय मंत्री रविशंकर प्रसाद यांनी म्हटले आहे, जे अतिशय योग्य म्हणावे लागेल. अजूनही वेळ गेली नाही, राहुल गांधी यांनी संसदीय नियमांची बाराखडी शिकून घ्यावी. संसदेचे ग्रंथालय पालथे घालून जुन्या काळचे विरोधी पक्षनेते कसे आणि काय बोलत होते, याचे वाचन करावे. अर्थात, त्यासाठी त्यांना सवड मिळायला हवी. कारण अनेकदा ते भारतात काही महत्त्वाचे सुरू असताना विदेशात असतात. आपल्या काँग्रेस पक्षातही राहुल गांधी स्वत:बद्दल फार चांगली भावना निर्माण करू शकलेले नाहीत. त्यांना काँग्रेसजन ऐकतात, कारण ते गांधी आहेत. ते सोनिया गांधी यांचे पुत्र आहेत. त्या घराण्याचे नसते तर राहुल गांधी इथवर देखील आले नसते. राहुल गांधी यांच्यापेक्षा प्रियांका वढेरा या जास्त चांगल्या विरोधी पक्षनेत्या ठरल्या असत्या, असे किरेन रिजिजू यांनी उपरोधाने म्हटले असले तरी ते सत्य बोलून गेले आहेत. राहुल गांधींना सद्‌बद्धी यावी, अशी प्रार्थना काँग्रेसचे सदस्य दिवसरात्र करत असतील, आपणही त्यात सहभागी व्हायला हरकत नाही. कारण राहुल गांधींना ज्या दिवशी सद्‌बुद्धी येईल, तो दिवस काँग्रेस पक्षासाठी लाखमोलाचा ठरणार आहे. संसदीय लोकशाहीच्या चांगल्या भविष्यासाठी राज्यकर्ते कर्तबगार हवेत, तसेच विरोधी पक्षनेता हा अतिशय बुद्धिमान व संयमी असला पाहिजे. अविश्वास प्रस्तावाच्या निरर्थक प्रयोगातून काँग्रेसने स्वत:चे हसे करून घेतले. राहुल गांधींचे त्याहून जास्त हसे झाले, हे त्यांना काँग्रेसजनांनी कधी तरी सांगितले पाहिजे.

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# मुंबई साखळी बॉम्बस्फोट; जखमा अजूनही ताज्या

मुंबईच्या इतिहासातील १२ मार्च १९९३ हा काळा दिवस आहे. या दिवसाच्या जखमा आजही मुंबईकरांच्या आणि संपूर्ण देशाच्या मनात आहेत. आता भीषण घटनेला ३३ वर्षे उलटली आहेत, तरीही त्या साखळी बॉम्बस्फोटांची आठवण आजही अंगावर शहारे आणते. दुपारी १.३० च्या सुमारास मुंबई शेअर बाजाराच्या इमारतीत पहिला स्फोट झाला आणि त्यानंतर पुढच्या दोन तासांत मुंबईच्या विविध भागांत, ज्यात एअर इंडिया इमारत, झवेरी बाजार, प्लाझा सिनेमा, माहिम कॉजवे आणि वरळी येथील सी-रॉक हॉटेल अशा १२ महत्त्वाच्या ठिकाणी बॉम्बस्फोट झालेत. या स्फोटांनी केवळ मुंबईच नव्हे, तर संपूर्ण जगाला हादरवून सोडले. आरडीएक्स या अत्यंत विध्वंसक स्फोटकाचा भारतात पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या प्रमाणावर वापर करण्यात आला होता, ज्यामुळे या हलल्याची भीषणता अधिकच वाढली. या अमानुष हल्ल्यात २५७ निष्पाप नागरिकांचा बळी गेला, ७०० हून अधिक लोक कायमचे अपंग झाले आणि हजारो कुटुंबांचे आयुष्य उद्ध्वस्त झाले. या हल्ल्याने मुंबईच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनावर खोलवर परिणाम केला, ज्यातून सावरण्यासाठी शहराला अनेक वर्षे लागली.

या संपूर्ण कटाचा मुख्य सूत्रधार होता दाऊद इब्राहिम कासकर. एक मराठी मुसलमान... मनसे प्रमुख मराठी मुसलमानांची नेहमीच भलावण करतात. तर त्यांना या खुंखार मराठी मुसलमानाच्या नावाची आठवण करून द्यायला हवी. दाऊदचा जन्म मुंबईत झाला. पण जिथे जन्माला आला, तिथल्याच भूमीसोबत त्याने गद्दारी केली. आपल्याच शहराला आणि देशाला रक्ताच्या थारोळ्यात पाडण्याचे अक्षम्य पाप केले. दाऊद आणि त्याचा साथीदार टायगर मेमन यांनी पाकिस्तानच्या आयएसआय या गुप्तचर संस्थेच्या मदतीने हा कट रचला होता. या कटामागे केवळ सूडाची भावना नव्हती, तर भारताला अस्थिर करण्याची आणि मुंबईच्या आर्थिक राजधानीला लक्ष्य करून देशाची अर्थव्यवस्था खिळखिळी करण्याची व्यापक योजना होती. धक्कादायक बाब म्हणजे, या स्फोटांसाठी लागणारी स्फोटके आणि शस्त्रास्त्रे भारतात आणण्यासाठी आणि ती विविध ठिकाणी पेरण्यासाठी अनेक स्थानिक गुन्हेगारांनी मदत केली होती. हे गुन्हेगार भारतीय नागरिक होते, त्यांनी याच देशाचे अन्न खाल्ले होते, येथील मातीच्या कुशीत ते वाढले होते, पण त्यांची निष्ठा मात्र पाकिस्तानसोबत होती. धर्मांधता आणि जिहादी मनोवृत्तीमुळे आंधळे झालेल्या या नराधमांनी आपल्याच मायभूमीशी गद्दारी केली. अशा देशद्रोही कृत्यांसाठी त्यांना कधीही माफ केले जाऊ शकत नाही आणि त्यांची जागा केवळ इतिहासाच्या काळ्या पानातच नव्हे, तर नरकाच्या खोल गर्तेत असायला हवी.

दहशतवाद हा केवळ गोळ्या आणि बॉम्बपुरता मर्यादित नसतो, तर तो एका विषारी विचारधारेतून जन्म घेतो. जिहादी मनोवृत्ती ही अशीच एक घातक विचारधारा आहे, जी तरुणांच्या मनात आपल्याच देशाविरुद्ध द्वेष पेरते आणि त्यांना हिंसेच्या मार्गावर ढकलते. या मनोवृत्तीमुळे व्यक्ती आपल्या राष्ट्रीय अस्मितेपेक्षा एका हिंसक विचारधारेला श्रेष्ठ मानू लागते. भारताबाहेर राहणारे दहशतवादी आका आणि भारतात राहणारे त्यांचे हस्तक यांच्या समन्वयामुळे देश वारंवार संकटात सापडतो.

या स्लीपर सेल्सच्या माध्यमातून शांततापूर्ण वातावरणात विष कालवण्याचे काम केले जाते, जे देशाच्या अंतर्गत सुरक्षेसाठी अत्यंत धोकादायक आहे. ही जिहादी प्रवृत्ती केवळ सीमेवरच नाही, तर आता शहरांमधील सुशिक्षित वर्गातही व्हाईट कॉलर जिहादच्या स्वरूपात शिरकाव करत आहे. आता दिल्लीत जिहादी डॉक्टरांनी केलेला स्फोट ताजाच आहे. हे लोक कायद्याचा आणि प्रशासकीय यंत्रणेचा वापर करून देशाला आतून पोखरण्याचा प्रयत्न करतात. अशा अदृश्य शत्रूंना ओळखणे आणि त्यांचा नायनाट करणे हे आपल्या सर्वांपुढील मोठे आव्हान आहे.

१९९३ च्या स्फोटांनंतर भारताने अनेकवेळा दहशतवादाचा सामना केला आहे. २००१ मध्ये भारतीय संसदेवर झालेला हल्ला हा थेट भारतीय लोकशाहीच्या मंदिरावर केलेला आघात होता, ज्याने आपल्या लोकशाही मूल्यांना आव्हान दिले. २००६ मध्ये मुंबई लोकल ट्रेनमध्ये झालेल्या साखळी स्फोटांनी पुन्हा एकदा मुंबईला लक्ष्य केले, ज्यात १८९ निष्पाप प्रवाशांचा बळी गेला. २६/११ (२००८) चा मुंबईवरील भीषण हल्ला तर भारताच्या इतिहासातील सर्वांत क्रूर आणि सुनियोजित हल्ल्यांपैकी एक होता, ज्यात १६६ लोकांचा बळी गेला आणि मुंबईची शान असलेल्या ताज हॉटेलसारख्या प्रतिष्ठित इमारतींना लक्ष्य करण्यात आले. या हल्ल्याविषयीची माहिती व दृश्य आदित्य धर दिग्दर्शित धुरंधर या चित्रपटात दाखवण्यात आले होते. ते दृश्य पाहून प्रत्येक हिंदूच्या मुठी आवळल्या गेल्या. या हल्ल्यांमागे पाकिस्तानस्थित दहशतवादी संघटनांचा हात होता आणि त्यांना भारतातील काही फितुरांनी मदत केली होती हे स्पष्ट झाले आहे. याव्यतिरिक्त, जम्मू-काश्मीरमधील उरी (२०१६) आणि पुलवामा (२०१९) येथील हल्ल्यांनी आपल्या शूर जवानांना लक्ष्य केले, ज्यात अनेक जवान हुतात्मा झाले. हे सर्व हल्ले भारताच्या सार्वभौमत्वाला आणि अखंडतेला आव्हान देणारे होते, ज्यातून दहशतवादाचे क्रूर आणि अमानुष स्वरूप पुन्हा पुन्हा समोर आले आहे.

जे लोक धर्माच्या नावाखाली निष्पाप लोकांचे रक्त सांडवतात, त्यांना माणूस म्हणणेही चुकीचे ठरेल. दहशतवाद्यांना मदत करणारे, त्यांना आश्रय देणारे आणि मानवतावादाच्या नावाखाली त्यांचे समर्थन करणारे हे देशाचे खरे शत्रू आहेत. जेव्हा एखादा दहशतवादी मारला जातो, तेव्हा त्याच्यासाठी अश्रू ढाळणारे किंवा त्याच्या अंत्ययात्रेला गर्दी करणारे लोक हे जिहादी मनोवृत्तीचेच पाईक आहेत. अशा लोकांची लायकी केवळ आणि केवळ फासावर जाण्याची आणि गोळ्या लागून तडफडून मरण्याचीच आहे. जे लोक भारताच्या भूमीवर राहून पाकिस्तानचे गुणगान गातात किंवा भारतीय लष्करावर दगडफेक करतात, त्यांनी हे लक्षात ठेवावे की, भारत आता बदलला आहे. आता भारत केवळ निषेध नोंदवत नाही, तर घरात घुसून मारण्याची ताकदही ठेवतो. अशा देशद्रोही शक्तींना वेळीच ठेचणे हे देशाच्या सुरक्षेसाठी अत्यंत आवश्यक आहे.

३३ वर्षांपूर्वी मुंबईने जे सोसले, ते पुन्हा कधीही घडू नये, हाच प्रत्येक भारतीयाचा संकल्प असायला हवा. १९९३ च्या स्फोटातील मृतांना खरी श्रद्धांजली तेव्हाच मिळेल, जेव्हा आपण या देशाला दहशतवादमुक्त आणि गद्दारमुक्त करू. दाऊद इब्राहिमसारखे गुन्हेगार आजही पाकिस्तानच्या आश्रयाला आहेत. भारताची अखंडता, सार्वभौमत्व आणि सुरक्षा याच्याशी तडजोड करणारा कोणताही घटक हा नष्ट होण्यास पात्र आहे. आपण सर्वांनी मिळून अशा जिहादी प्रवृत्तींचा नायनाट करण्याचा विडा उचलायला हवा आणि एक सुरक्षित, समृद्ध भारताची निर्मिती करायला हवी. या लढ्यात आपण सर्व एक आहोत आणि एकजूट होऊनच आपण विजय मिळवू शकतो.

जय हिंद!


writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**अनिल उमाकांत फेकरीकर**

# रक्तगट गोंदवा स्वत:ला वाचवा!

सकाळी घरातून निघालेली व्यक्ती सायंकाळी सुखरूप परत येईल का, याची हमी कुणीही देऊ शकत नाही. एवढी वाहतूक व्यवस्था हाताबाहेर गेली आहे. या स्थितीत समजा तुम्ही अपघातग्रस्त झाला अन् तुम्हाला रक्ताची गरज भासल्यास करणार काय? त्यावेळी डॉक्टरांना प्रथमत: तुमचा रक्तगट नेमका कोणता हे तपासून घ्यावा लागेल. यात ४० मिनिटे वाया जातील. दरम्यान, रक्तगट कळल्यावर त्यानुसार रक्त मिळविण्यासाठी वेळ वाया जाईल. तिकडे सुवर्णकाळ संपल्याने तोवर तुम्ही यमाघरी जाल. हीच भीती लक्षात घेता शरीरावर रक्तगट गोंदवा अन् स्वत:सह लोकांना वाचवा अशा स्वरूपाची अभिनव संकल्पना पुण्यातील भारतीय स्वास्थ्य चिंतनचे राष्ट्रीय संयोजक डॉ. अशोक काळे यांनी मांडली आहे. त्यांनी याकरिता गेल्या ३० वर्षांपासून एक लढाच सुरू केला आहे. त्यात यश येणे पृथ्वीतलावरील प्रत्येक व्यक्तीसाठी लाभदायक ठरणार आहे. माणूस कुठलाही असो, त्याचा रक्तगट आयुष्यभर कायमच असतो. तोच धागा पकडून पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धात सहभागी सैनिकांच्या शरीरावर त्यांचा रक्तगट गोंदविण्यात आला होता. युद्ध असल्याने शेकडो सैनिक जखमी होणार होते. त्यानंतर जखमींवर उपचार करणे क्रमप्राप्त होते. तेव्हा जखमींना तातडीने सर्व उपचार मिळावेत म्हणून रक्तगट गोंदविण्याची योजना फलदायी ठरली. जखमी सैनिकांना यामुळे नवजीवन प्राप्त झाले. मग तीच संकल्पना सामान्य माणसाकरिताही लागू का केली जात नाही, असाच विचार करून डॉ. अशोक काळे या लढाईचे नेतृत्व करीत आहेत. रक्तविषयातील तज्ज्ञ डॉ. अशोक काळे समाजभान जपणारे व्यक्तिमत्त्वाचे धनी आहेत. पुणे मेडिकल कॉलेजमध्ये असताना त्यांनी अनेक अपघातग्रस्तांना तडफडून मरताना पाहिले. तेव्हाच त्यांनी यावर उपाय करण्याचा संकल्प सोडत रक्तगट गोंदवा अन् आयुष्य वाचवा याकरिता स्वत:ला झोकून दिले आहे.



वस्तुत: अपघातग्रस्तांना वाचविण्यासाठी एक तासाचा सुवर्णकाळ मानला जातो. तो सुवर्णकाळ रक्तगट तपासणीतच वाया गेल्यास अपघातग्रस्त तडफडून यमाघरी जातो. सर्व यंत्रणा तेव्हा हतबलतेने फक्त पाहात असते. समजा अपघातग्रस्ताच्या शरीरावर टॅटूऐवजी रक्तगट गोंदविलेला दिसला असता तर नक्कीच डॉक्टरांनी त्याच गटाचे रक्त त्याला देत नवजीवन मिळवून दिले असते. हीच संकल्पना लोकांमध्ये रुजावी, प्रत्येक अपघातग्रस्त बरा व्हावा अशी उदात्त भावना मनात ठेवत डॉ. अशोक काळे यांचा पुढाकार नक्कीच लोकहिताचा आहे. वर्तमानात युवक आणि युवती नको तिथे टॅटू गोंदवून घेतात. शरीर त्यांचे असल्याने ते त्यावर काहीही करू शकतात. यासंदर्भात कुणाचेही दुमत नाही. पण त्यांनी त्याशिवाय स्वत:चा रक्तगट गोंदविला तर नक्कीच त्याचा लाभ सर्वांनाच होईल. याकरिता संपूर्ण देशभरात एकवाक्यता ठरवायला हवी. त्यानुसार उजव्या कानाच्या मागे रक्तगट गोंदविण्याची पद्धत सर्वत्र लागू व्हायला हवी. उजव्या किंवा डाव्या कानामागे रक्तगट इंग्रजीत गोंदविल्याने तो कुणाच्याही सौंदर्यात कुरूपता आणणार नाही. लहानपणी नाही का आपली आई आपल्या कानामागे टिका लावून दुर्जनशक्तींपासून वाचविण्यासाठी प्रार्थना करायची. अगदी तसाच इलाज हा ठरणार आहे. भारतात २०२५ मध्ये ४ लाख ८० हजार अपघात झाले. याचा अर्थ दररोज १३१५ अपघात घडले. महाराष्ट्रात २०२५ मध्ये ४० हजारपेक्षा जास्त अपघात झाले. त्यात १५५५० लोकांचा हकनाक मृत्यू झाला. एवढे अपघात पाहता भविष्यात आपलाही अपघात कुठेही होऊ शकतो, हे सर्वांनीच लक्षात ठेवायला हवे. रस्त्यावर धावणाऱ्या यमांपासून कुणीही वाचणार नाही, एवढी दाहक परिस्थिती कायमच राहणार आहे. मग आपल्यावर तशी वेळ आल्यास करणार काय, याचा विचार करून स्वत:ला वाचविण्यासाठी तरी आज रक्तगट गोंदविणे फलदायी ठरू शकते. अपघातमुक्त भारत ही संकल्पना मांडणे सोपे आहे. पण ती संकल्पना खऱ्या अर्थाने पूर्णत्वास जाणे कठीण आहे. कारण रस्त्यावर वाहन चालविणारा अनेक चुका वारंवार करीत आहे. मोबाईलवर बोलू नका, असे सांगितल्यावरही चालक त्याचा सर्रास वापर करतात. शिवाय दोषी चालकांना फाशी होत नसल्याने भविष्यात अपघातांची संख्या वाढतच जाणार आहे. ते कटू वास्तव पाहता त्या गोंधळात स्वत:ला वाचवून आपले कुटुंबीय सुरक्षित ठेवायचे झाल्यास आजच उजव्या कानामागे आपला रक्तगट गोंदवून घ्या. हातावर, पायावर आणि नको त्या जागेवर भलते सलते चित्र टॅटूच्या रूपात गोंदविण्यापेक्षा रक्तगट इंग्रजीत टाकणे नक्कीच फलदायी ठरेल. शेवटी, आपला जीव ज्याला प्यारा असेल त्याने यावर अंमल करावा, हीच माफक अपेक्षा.

९८८१७१७८५९

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# डिजिटल फसवणूक आणि तत्काळ कारवाई!

भारताच्या डिजिटल विकासाच्या प्रक्रियेत गेल्या अनेक वर्षांपासून आपण डिजिटल फसवणुकीकडे हताशपणे पाहत होतो. जितक्या वेगाने आपण डिजिटली पैसे वळवत गेलो तितक्याच वेगाने सायबर गुन्हेगार त्यामागे जात राहिले. यूपीआय, फिनटेक ॲप्स आणि इन्स्टंट पेमेंटद्वारे व्यवहार जसजसे वाढले, तसतसे फसवणुकीचे प्रमाणही वाढले. मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील डिजिटल इंडियासाठी व्यापक प्रयत्न सुरू झाले, पोलिसिंगनंतर सायबर सुरक्षिततेला केंद्र सरकारने प्राधान्य दिल्यानंतर आता राज्यांकडून सायबर गुन्ह्यांवर फक्त प्रतिक्रिया येत नाहीत तर तेदेखील ॲक्शन मोडवर आले आहेत. राज्य सरकारने ४३ कोटी रुपयांची तरतूद सायबर गुन्ह्यांवर प्रतिबंध लावण्यासाठींच्या उपाययोजनांवर केली आहे. त्यामुळे आता डिजिटल फसवणूक, सायबर गुन्ह्यांच्याबाबतीत तत्काळ कारवाई हा रामबाण उपाय ठरणार असल्याचे दिसते.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या नेतृत्वाखाली गृह मंत्रालयाने अंतर्गत भारतीय सायबर गुन्हे समन्वय केंद्र सुरू केले. त्यानंतर प्रत्येक डिजिटल गुन्हा एका सिस्टिमद्वारे या समन्वय केंद्राद्वारे हाताळला जाऊ लागला. गृह मंत्रालय वारंवार राज्ये आणि केंद्रीय तपास यंत्रणांमधल्या समन्वयावर भर देत असल्याने, सायबर गुन्ह्यांकडे केवळ आर्थिक त्रास म्हणून नव्हे तर अंतर्गत सुरक्षेचे आव्हान म्हणून पाहिले जात आहे.

याचे परिणाम आकडेवारीत दिसून येतात. २०२५-२६ मध्ये, १४ सी यंत्रणेने एक सूक्ष्म पण लक्षणीय काम केले आहे. त्यामुळे ज्या जगात नुकसान वाढत आहे, अशा जगात सायबर गुन्ह्यांचा वेग कमी झाला आहे. एफबीआयच्या इंटरनेट क्राईम कंप्लेंट सेंटरनुसार, २०२४ मध्ये जागतिक स्तरावर नोंदवलेले सायबर गुन्ह्यांमध्ये १६ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त नुकसान झाले असले तरी, भारताने घरातील फसवणुकीचा वेग रोखण्यात यश मिळवले. २०२४ मध्ये सायबर-फसवणुकीचे नोंदवलेले प्रमाण २२ हजार ८४९ कोटी रुपयांवरून २०२५ मध्ये २२ हजार ५०४ कोटी रुपयांपर्यंत कमी झाले, जे उच्च वाढीच्या डिजिटल अर्थव्यवस्थेत एक माफक घट मानली जाते.

डिजिटल अरेस्टसारखे फसवणुकीचे काही घोटाळे झाले, पण ते मानसिकदृष्ट्या हाताळणीचे होते. पीडितांना असे वाटण्यास भाग पाडले गेले की त्यांची चौकशी सुरू आहे. त्यांना धमकावून वेगळे केले गेले आणि नंतर त्यांची बचत हिरावून घेतली गेली. २०२३-२४ दरम्यान अशा गुन्ह्यांच्या नुकसानात फार वाढ झाली. २०२५ मध्ये, डिजिटल अरेस्टच्या प्रकरणांमध्ये ८६ टक्क्यांनी घट झाली आणि आर्थिक नुकसान तब्बल ६६ टक्क्यांहून अधिक घटले. हे एका रात्रीत घडले नाही. तपास यंत्रणांनी डेटा ॲनालिटिक्सचा वापर करून हॉटस्पॉट्स मॅप केले, मूळ अकाऊंट नेटवर्क नष्ट केले, बेकायदेशीर सीम बॉक्स जप्त केले आणि सीमापार दुवे ट्रॅक केले. समन्वयावर भर देण्यात आला. त्यामुळे गुप्तचर माहितीचे जलदपणे सामायिकीकरण आणि संयुक्त कारवाई शक्य झाली. हे गृह मंत्रालयाच्या धोरणात्मक प्रयत्नांचे प्रतिबिंब आहे. अमित शाह यांनी वारंवार अधोरेखित केले आहे की, सायबर गुन्हे, आता केवळ एक परिघीय आर्थिक गुन्हा राहिला नाही तर राष्ट्रीय सुरक्षेसाठी आणि भारताच्या डिजिटल पायाभूत सुविधांवरील जनतेच्या विश्वासासाठी धोका आहे.

लाखो नवीन इंटरनेट वापरकर्ते जोडणाऱ्या भारतासारख्या देशात, तांत्रिक सुरक्षा उपायांइतकेच वर्तणुकीशी संबंधित सावधगिरीदेखील महत्त्वाची आहे. त्यामुळे सार्वजनिक संदेश हा या धोरणाचा एक महत्त्वाचा भाग बनला आहे. जेव्हा पंतप्रधानांनी नागरिकांना सावध करण्यासाठी मन की बातचा वापर केला आणि थांबा, विचार करा, कृती करा हा डिजिटल व्यवहारांसाठी सुरक्षामंत्र तयार केला, तेव्हा सायबरविषयक जागरूकता पोलिसांच्या एका विशिष्ट सल्ल्यामधून राष्ट्रीय चर्चेत रूपांतरित झाली.

सुरुवातीला राष्ट्रीय सायबर गुन्हे अहवाल पोर्टलवर दाखल केलेल्या तक्रारी अनेकदा एफआयआरमध्ये रूपांतरित होत नव्हत्या. औपचारिक नोंदणी होत नसल्याने तपास थांबायचा. दिल्ली, राजस्थान आणि मध्य प्रदेशसारख्या राज्यांमध्ये ई-झीरो एफआयआर पद्धती लागू केली गेल्याने यामध्ये संरचनात्मक सुधारणा झाली. आर्थिक सायबर तक्रारींचे शून्य एफआयआरमध्ये स्वयंचलित रूपांतर झाल्यामुळे रूपांतरण दर ०.६४ टक्क्यांवरून ९ टक्क्यांपर्यंत वाढला. पोलिसांच्या भाषेत सांगायचे तर, हे डिजिटल गुन्हे मध्येच गायब होण्याऐवजी औपचारिक न्यायव्यवस्थेत प्रवेश करणाऱ्या हजारो अतिरिक्त प्रकरणांमध्ये परावर्तित झाले.

हुशार हॅकर्सद्वारे करण्यात आलेले सायबर गुन्हे तपासाकरिता अल्पकालीन असतात. भाड्याने घेतलेले, तडजोड केलेले किंवा बनावट बँक खात्यात त्यांनी उडवलेले पैसे जमा होतात. नंतर तेथून ते काढले जातात. सप्टेंबर २०२५मध्ये, अशी बनावट ४२ टक्के खाती एका आठवड्यापेक्षा जास्त काळ सक्रिय राहिली. जानेवारी २०२६पर्यंत त्यांची संख्या कमी झाली. फक्त ३ टक्के खाती इतके दिवस टिकून राहिली. अशा खात्यांमधून पैसे पुन्हा मिळवणे जिकरीचे असते. परंतु तत्पर कारवाईमुळे २४ तासांत अशा गुन्ह्यांचा तपास करण्याचे प्रमाण ३९ टक्क्यांवरून ८८ टक्क्यांपर्यंत वाढले. वेळेचे हे गणित साधणे अत्यंत महत्त्वाचे आहे. फसवणूक ही पीडिताची तक्रार आणि गुन्हेगाराने पैसे काढणे यांच्यातली शर्यत आहे. ४३ प्रमुख बँका आणि एनपीसीआय-एपीआयच्या एकत्रीकरणाद्वारे, जवळजवळ ८० टक्के व्यवहार आणि ९५ टक्के वादग्रस्त रक्कम आता रिअल टाईममध्ये परत मिळवली जाते. काही बँका जलद लीन मार्किंगमुळे फसवणुकीच्या रकमेपैकी ३५ टक्क्यांपर्यंत बचत करत असल्याचे समजते. एनसीआरपी-सीएफसीएफआरएमएस प्रणालीमध्ये एम्बेड केलेली फायनान्शियल किल चेन ओळखल्या जाणाऱ्या लाभार्थी खात्यांवर १०० टक्के लीन किंवा होल्ड सक्षम करते. त्यामुळे प्रतिसाद प्रतिबंधात बदलतो. भारताच्या दीर्घकालीन प्रशासनिक आव्हानांपैकी एक म्हणजे केंद्र आणि राज्यांमधील विखंडन. सायबर गुन्हे त्या सीमांचे पालन करत नाहीत. दिल्लीतील सायहॉक, केरळमधील सायहंट आणि गुजरातमधील मूलहंटसारख्या ऑपरेशन्सवरून असे दिसून येते की, समन्वयामुळे हजारो लोकांना सायबर गुन्ह्यांपासून वाचवण्यात आले, शेकडोंना अटक करण्यात आली आणि शेकडो कोटी संघटित नेटवर्कशी जोडले गेले. कंबोडिया, चीन, तैवान, पाकिस्तान आणि नेपाळशी सीमापार संबंध असलेले सिम बॉक्स सिंडिकेट नष्ट करण्यात आले आणि हजारो सिम ब्लॉक करण्यात आले.

### राज्यात ‘महासायबर’

डिजिटल फसवणूक, बनावट दूरध्वनी केंद्रे आणि आर्थिक गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात अत्याधुनिक ‘महासायबर’ व्यवस्था आणि सायबर तपास प्रयोगशाळांचे जाळे अधिक मजबूत करण्यावर भर दिला आहे. सायबर गुन्ह्यांवर तत्काळ कारवाई व्हावी यासाठी ‘सुवर्ण क्षण’ या संकल्पनेवर आधारित जलद प्रतिसाद, १९३० या मदत क्रमांकाचा प्रभावी वापर, शालेय अभ्यासक्रमातून सायबर सुरक्षिततेबाबत जनजागृती आणि पोलिस दलाचे आधुनिकीकरण यांसारख्या उपाययोजना राबविण्यात येत आहेत. तसेच सायबर गुन्हे रोखण्यासाठी विशेष कक्ष बळकट करून सुमारे एक हजार पोलिस कर्मचाऱ्यांना या कामासाठी सज्ज करण्यात येत आहे.

९२७०३३३८८६

### पर्यावरण आणि पशु-पक्ष्यांचे संरक्षण आवश्यक...

पर्यावरण म्हणजे आपल्या आजूबाजूचे नैसर्गिक वातावरण. हवा, पाणी, जमीन, झाडे-झुडपे, पशु-पक्षी आणि माणूस हे सर्व पर्यावरणाचे महत्त्वाचे घटक आहेत. पर्यावरण आणि पशु-पक्षी यांचा एकमेकांशी खूप जवळचा संबंध आहे. निसर्गाचा समतोल राखण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतात. मानवाच्या जीवनासाठी पर्यावरण अत्यंत महत्त्वाचे आहे. जर पर्यावरण स्वच्छ आणि संतुलित राहिले तरच पृथ्वीवरील जीवन सुरक्षित राहू शकते. त्यामुळे पर्यावरणाचे जतन आणि पशु-पक्ष्यांचे संरक्षण करणे ही आजच्या काळाची मोठी गरज आहे.

प्राचीन काळापासून माणूस, प्राणी आणि पक्षी एकत्र निसर्गात राहात आले आहेत. जंगल, नद्या, पर्वत आणि झाडे ही त्यांची नैसर्गिक घरे आहेत. पशु-पक्षी पर्यावरणातील विविध कामे करतात. काही पक्षी बिया पसरवतात, काही प्राणी जंगलाचे संतुलन राखतात. त्यामुळे निसर्गाची साखळी टिकून राहते. जंगलतोड झाल्यामुळे अनेक पक्ष्यांचे निवासस्थान नष्ट होत आहे. हवा, पाणी आणि जमिनीचे प्रदूषण वाढल्यामुळे त्यांचे जीवन धोक्यात येत आहे. यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत आहे आणि अनेक पक्षी नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत.



आजकाल वाढते प्रदूषण, जंगलतोड आणि मानवी हस्तक्षेप यामुळे अनेक पशु-पक्ष्यांचे जीवन धोक्यात आले आहे. अनेक प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. पशु-पक्षी नष्ट झाले तर पर्यावरणाचा समतोल बिघडेल. म्हणून जंगलांचे संरक्षण, झाडे लावणे आणि प्रदूषण कमी करणे ही आपली जबाबदारी आहे. प्रत्येकाने पर्यावरण आणि प्राण्यांबद्दल दयाळू व जागरूक राहिले पाहिजे. पर्यावरण आणि पशु-पक्षी हे एकमेकांवर अवलंबून आहेत. त्यांचे रक्षण केल्याशिवाय पृथ्वीवरील जीवन सुरक्षित राहू शकत नाही. म्हणूनच आपण सर्वांनी पर्यावरणाचे जतन करणे आणि त्यांचे संरक्षण करणे आवश्यक आहे. निसर्गाचे संतुलन राखण्यासाठी हीच काळाची गरज आहे. जर आपण आज काळजी घेतली तर भविष्यातील पिढ्यांना सुंदर आणि निरोगी पर्यावरण मिळेल. पर्यावरणाचे जतन आणि पशु-पक्ष्यांचे संरक्षण करणे ही आपली सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. आपण आजपासूनच छोटे-छोटे प्रयत्न केले तर पृथ्वी अधिक सुंदर, हिरवीगार आणि जीवनासाठी सुरक्षित राहील.

**श्रीकांत संभाजी मगर**/९६८९११७१६९

## वाचक पत्रे

### माहितीपूर्ण तरुण भारतचे स्वागत

आम्ही सुरुवातीपासून तरुण भारतचे वाचक आहेत कारण हे वृत्तपत्र दैनंदिन सत्य घडामोडी प्रसिद्ध करते. त्यामुळे वाचकांचा विश्वास बसला आहे. राजकारण, देश-विदेशातील घडामोडी, कला, क्रीडा, आरोग्य, मनोरंजन, विज्ञान, सामान्य ज्ञान, धार्मिक, आध्यात्मिक, अर्थविषयक, शेती, हवामान इत्यादी असे सर्व विषय या वृत्तपत्रात आहे. हे वृत्तपत्र आपला देश, धर्म आणि संस्कृती या विचारांनी पुरेपूर आहे. त्यामानाने किंमत कमी आहे. इतर दैनिक वृत्तपत्रे जाहिरातींनी भरलेली असतात. म्हणून वाचकांना तरुण भारत हे दैनिक वृत्तपत्र वाचावयास आवडते. तरुण भारतचे वाचक, विक्रेते, वार्ताहर, संपादक आणि बाकीचे कर्मचारी यांचे मनापासून आभार आणि हार्दिक शुभेच्छा.

**देविदास पाठक**/पुणे

### सिनेसृष्टीची माहितीपूर्ण सफर

गेली काही महिने तरुण भारतच्या आसमंत पुरवणीत ‘सिनेसृष्टी’ हे सदर प्रकाशित होत आहे. सिनेसृष्टीला समृद्ध करणाऱ्या अगणित व्यक्तित्वांच्या कार्यकर्तृत्वाचा वेध घेणारे हे सदर वाचताना वाचक अभावितपणे अचंबित होतो. रमेश पोफळी यांनी त्यात केलेले सिनेमातील कलाकार, संगीतकार, गायक, दिग्दर्शक आणि गाणी यातील बारकावे, त्याचे विवेचन अतिशय माहितीपूर्ण असते. बरेचदा असे वाटते की, ‘अरे, सिनेमा बघताना किंवा गाणे ऐकताना हे तर आपल्या लक्षातच आलं नाही.’ या स्तंभासाठी तरुण भारतचे अभिनंदन.

**प्रसाद दत्तात्रेय पोफळी**/९८२२५६९६४८

### ऐतिहासिक स्थळांची माहिती असावी

पुणे ही संत, समाजसुधारक आणि क्रांतिकारकांची भूमी आहे. ऐतिहासिक स्थळे, परंपरा आणि सांस्कृतिक चळवळी यावर सखोल लेख असावेत. भारतीय संस्कृतीचा गौरव जपत आधुनिकतेशी सुसंगत लेख प्रसिद्ध व्हावे, ही अपेक्षा.

**सम्राट खाडिलकर**/पुणे

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९४२२६१२२४५/८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# शोभाताई सोपल संस्थेच्यावतीने स्त्री भूषण पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१३ मार्च-**

स्व. सौ. शोभाताई सोपल बहुउद्देशीय संस्था, बार्शी यांच्यावतीने जागतिक महिला दिनानिमित्त स्त्री भुषण पुरस्कार प्रदान सोहळा आयोजित करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून सरिता किचनच्या सर्वेसर्वा सरिता पद्मन या उपस्थित होत्या. बार्शीतील विविध क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी केलेल्या महिलांना स्त्री भूषण पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.

त्यामध्ये सरिता पद्मन, शिक्षण क्षेत्रात अमृता शहा, वीरपत्नी रोहिणी काकडे, ब्रम्हकुमारी संगीतादीदी, आणि कु. सान्वी गोरे हिला महिला राजस्तरीय बुद्धिबळ स्पर्धेमध्ये उज्वल यश मिळविल्याबद्दल सन्मान करण्यात आला. तसेच महिलांच्या विविध



गुणांना वाव देण्यासाठी मेहंदी, पाककला आणि वेशभूषा या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. तसेच बार्शीचे आमदार दिलीप सोपल यांनी कार्यक्रमास भेट देवून स्व. सौ. शोभाताई सोपल बहुउद्देशीय संस्था, बार्शी संस्थेच्या सर्व पदाधिकारी, स्पर्धक तसेच आलेल्या सर्व मान्यवरांचे व प्रेक्षकांचे स्वागत करुन संस्थेच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. मेंहदी स्पर्धेसाठी एकुण ३० महिलांनी सहभाग घेतला त्यामध्ये उत्तेजनार्थ द्वितीय प्रणिता यादव, उत्तेजनार्थ प्रथम शितल गायकवाड, चौथा क्रमांक धनश्री पवार, तीसरा क्रमांक साक्षी वहील, दुसरा क्रमांक वैष्णवी जाधव व प्रथम क्रमांक मधुरा भुमकर यांना बक्षीस देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेसाठी परिक्षक म्हणुन मयुरी उबाळे आणि प्रतिक्षा देशमुख यांनी काम पाहिले.

पाककला स्पर्धेत ५२ महिलांनी सहभाग घेतला. उत्तेजनार्थ द्वितीय अनुराधा होतपेट्टी, उत्तेजनार्थ प्रथम वैशाली देशमुख, पाचवा क्रमांक प्रिया रुद्राके, चौथा क्रमांक प्रियंका साखरे, तिसरा क्रमांक शारदा रायचुरकर, दुसरा क्रमांक अंजली कुलकर्णी, प्रथम क्रमांक सिमा कापसे यांना बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

या स्पर्धेसाठी परिक्षक म्हणुन सरिता पद्मन यांनी काम पाहिले. तसेज वेशभुषा स्पर्धेसाठी २५ महिलांनी सहभाग घेतला होता. उत्तेजनार्थ द्वितीय कांचन वायचळ, उत्तेजनार्थ प्रथम संतोषी शेवते, तिसरा क्रमांक अमृता खंदारे, दुसरा क्रमांक तनुजा तुपेरे, प्रथम क्रमांक अनुराधा होतपेट्टी यांना बक्षीस देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेसाठी परिक्षक म्हणुन निलम अग्रवाल व कोमल कदम यांनी काम पाहिले.



## वटवृक्ष देवस्थानतर्फे नूतन सभापती हिप्परगी, उपसभापती कल्याणशेट्टी यांचा सत्कार

**अक्कलकोट दि १२ मार्च**

श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान समितीच्या वतीने चेअरमन तथा भाजपा नगरसेवक महेश इंगळे यांनी पंचायत समिती येथे नूतन सभापती रश्मी हिप्परगी, नुतन उपसभापती सागर कल्याणशेट्टी यांचा श्री.स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देवून यथोचित सत्कार केला.

स्वामींचा प्रसाद लाभणे हे माझ्यासाठी खुप भावनिक असल्याचे सांगून श्री स्वामी समर्थांचे आशिर्वाद, माझे मोठे बंधू आमदार सचिनदादा व महेश मालक इंगळे यांच्या राजकीय क्षेत्रातील अनुभवाचा लाभ घेऊन लोकहीताची कामे करण्यास आपण कटीबद्ध असल्याचे मनोगत उपसभापती कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केले. यावेळी आ. सचिन कल्याणशेट्टी, नूतन सभापती रश्मी हिप्परगी, प्रथमेश इंगळे, मोतीराम राठोड, शहराध्यक्ष शिवशरण जोजन, नगरसेवक अविनाश मडीखांबे, तम्मा शेळके, महेश हिंडोळे, उत्तम गायकवाड, खाजप्पा झंपले आदिसह नागरिक व प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

## अन्नछत्र मंडळाचे महाप्रसाद कार्य सुरळीत

**अक्कलकोट, दि. १३ मार्च-**



श्रीक्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात नित्यनेमाने हजारो भाविकांना महाप्रसाद दिला जातो. जागतिक युद्धजन्य परिस्थितीमुळे सध्या जरी गॅस टाक्यांची टंचाई झाली असली तरी अन्नछत्र मंडळाचे महाप्रसाद कार्य सुरळीत असल्याची माहिती सचिव श्यामराव मोरे यांनी दिली. अन्नछत्र मंडळामध्ये दररोज चपाती, भाजी, भात, आमटी, एक गोड पदार्थ असलेला महाप्रसाद २० ते २५ हजार भाविकांना दिला जातो. मंडळात ठरलेल्या वेळेनुसार महाप्रसादाचे वाटप मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले आणि कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली सुरू असल्याचे श्री. मोरे यांनी सांगितले.

### जाहीर सूचना

या जाहीर सूचनेद्वारे जनतेला आवाहन करण्यात येत आहे की परिशिष्टात नमूद मिळकतीच्या संदर्भात खालील मूळ दस्त गहाळ झाले आहेत आणि त्यासंबंधी गहाळ तक्रार अर्ज संबंधित पोलिस स्टेशनला दि. ०४/०३/२०२६ रोजी दाखल केला आहे.

उपनिबंधक सोलापूर उत्तर-२ यांच्या कार्यालयात नोंदणीकृत मूळ खरेदीखत दिनांक. ०१/०१/२००१, रोजी अ. क्र. ०६/२००१ वरील, मूळ नोंदणी पावती आणि सूची क्र. ॥.

उपनिबंधक सोलापूर उत्तर-२ यांच्या कार्यालयात नोंदणीकृत मूळ चुकदुरुस्ती दिनांक. १३/०२/२००४, रोजी अ.क्र. ५१६/२००४ वरील, मूळ नोंदणी पावती आणि सूची क्र. ॥.

आमच्याकडे उपलब्ध असलेल्या या दस्तऐवजांची प्रमाणितप्रत, गहाळ तक्रारी दाखल्याची प्रत आणि ही जाहीर सूचना, हे दुय्यम पुरावा म्हणून गृहीत धरून ती मूळ मालकी दस्त म्हणून स्वीकारली जातील. तसेच परिशिष्टात नमूद मिळकत श्री. सतीश किशोर पाटील यांच्या मालकीची आहे आणि सध्या परिशिष्टात नमूद मिळकती त्यांनी कोणत्याही बँकेकडे गहाण ठेवलेली नाही आणि श्री. सतीश किशोर पाटील, ती मिळकत एस.टी.एफ.टी. फायनान्स प्रा. लि.,कडे गहाण ठेवणार आहेत. खाली दिलेल्या परिशिष्टात नमूद मिळकतीबद्दल कोणत्याही स्वरूपाचा आक्षेप असल्यास, ही नोटीस प्रसिद्ध केल्याच्या तारखेपासून ०७ दिवसांच्या आत, खाली नमूद केलेल्या कार्यालयाच्या पत्त्यावर ते लेखी स्वरूपात कळवावेत.

**परिशिष्ट**

जिल्हा सोलापूर, तालुका - उत्तर सोलापूर, पैकी मौजे नान्नज, येथील सिटी सर्वे क्र. १९४, पैकी पूर्वेकडील १५७.११ चौ. मी. क्षेत्र, ची मिळकत.

ही जाहीर सूचना प्रसिद्ध केली दि. १२/०३/२०२६

**सही/-**
**ॲड. गणेश वसंत कटारे**
**ॲड. मंजुषा ग. कटारे (लोखंडे)**
**कार्यालय क्र. ११, पहिला मजला, स्क्वेअर-वन कॉम्प्लेक्स, १३१, सिद्धेश्वर पेठ, सोलापूर-०३**
**मोबाइल क्र. ९८६०११००११**

Classifieds

**विकणे आहे**

**चौपाड दर्शन हाईट्स येथील बिल्डींग नं. 2, RCC, I.R.K. सर्व सोईनेयुक्त 1 फ्लोर विकणे आहे.**
**9960383792**

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.



## महापालिकेच्या कामचुकार ४१ अधिकारी कर्मचाऱ्यांना दंड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ मार्च-**

नागरिकांनी नोंदवलेल्या अधिसूचित सेवा वेळेत न निकाली काढणाऱ्या आणि तक्रारी प्रलंबित ठेवणाऱ्या महापालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांवर अखेर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. ४१ अधिकारी-कर्मचाऱ्यांना एकूण १२ हजार ७०० रुपयांचा आर्थिक दंड आकारण्यात आला आहे. उपायुक्त आशिष लोकरे यांनी ही कारवाई केली आहे. महापालिकेतील घनकचरा व्यवस्थापन विभाग, जन्म मृत्यू नोंदणी विभाग, बांधकाम परवाना, विविध झोन कार्यालय, आरोग्य विभाग तसेच इतर संबंधित विभागांतील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी विविध सेवा विहित कालावधीत न दिल्याचे निदर्शनास आले होते. या प्रकरणात नागरिकांच्या तक्रारी अद्याप प्रलंबित असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली आहे. हा दंड त्यांच्या मार्च २०२६ पेड इन एप्रिलच्या वेतनातून वसूल केला जाणार आहे. ही बाब अत्यंत गंभीर असून कामकाजातील निष्काळजीपणामुळे लोकसेवेवर परिणाम होत असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

### श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि, सोलापूर

मुख्य कार्यालय : ६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर ४१३००२ फोन नं-०२१७-२६२२९३४४/२६२२९३३

**परिशिष्ट - ४ (ए), ८ (६) ची तरतूद**

**जाहिर फेरलिलाव**

**१५ दिवस विक्री सूचना सरफेसी ॲक्ट २००२ कलम ८ (६) आर/डब्लू ९(१) अन्वये**

ज्याअर्थी बँकेने आपल्या प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या माध्यमाद्वारे सिक्यूरिटायझेशन अंड रिकन्सट्रकशन ऑफ फायनान्सिअल असेट्स अंड इंफोर्समेंट ऑफ सिक्युरीटी इंटरेस्ट अक्ट २००२ (SARFASI) च्या कलम १३ (४) अंतर्गत वसुलीसाठी कर्जदार व जामीनदार यांच्या खालील तपशीलातील तारण मालमत्तेचा पुढील नमूद केलेल्या अटी व शर्तीनुसार विक्रीसाठी बंद पाकिटात (बयाणा रक्कमेसह) निविदा/प्रस्ताव मागविण्यात येत आहे.

**विक्रीच्या अटी व शर्ती:** १) निविदा ही बयाणा रकमेसाहित बंद पाकिटात प्राधिकृत अधिकारी, श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि., सोलापूर यांचे नावाने जमा करावी. २) राखीव किमतीपेक्षा कमी रक्कम आणि / किंवा कमी बयाणा रकमेची कोणताही निविदा विचारांत घेतली जाणार नाही. ३) शेड्यूलमध्ये नमूद केल्यानुसार बयाणा रकमेचा डिमांड ड्राफ्ट/पे ऑर्डर /RTGS/NEFT लिलावांत सहभागी होण्यासाठी Authorized Officer, Shri Mahavir Urban Co-op. Bank Ltd., Solapur यांच्या नावे काढलेली असावी. ४) यशस्वी खरेदीदार म्हणून जाहीर झालेल्या व्यक्तीस तसे जाहीर झाल्याबरोबर विक्री किमतीच्या २५% रक्कम (पंचवीस टक्के) त्यातून बयाणा रकमेपोटी भरलेली रक्कम वजा करून डीडी/पे ऑर्डर /RTGS/NEFT द्वारे लगेच भरावी लागेल व उर्वरित रक्कम बँकेद्वारे विक्रीची निश्चिती मिळाल्याच्या तारखेपासून १५ दिवसांत किंवा बँकेने दिलेल्या मुदतवाढीच्या तारखेच्या आंत भरावी लागेल. ५) विक्री जसे आहे, जेथे आहे व आधार विरहीत तत्वावर केली जात आहे. ६) इतर अटी व शर्ती लिलावाच्या वेळी वाचून दाखविण्यात येतील.

**शेड्युलमधील मालमत्तेची विक्री बँकेच्या प्राधिकृत अधिकाऱ्याद्वारे खालील निर्धारित तपशिलानुसार जाहिर लिलावाद्वारे केली जाईल.**

| मालमत्ता पाहणी तारीख व वेळ | निविदा सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ | निविदा उघडण्याची तारीख व वेळ | निविदा सादर करण्याचे व उघडण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|
| दि. २७/०३/२०२६ स. ११.०० ते दु. ३.०० पर्यंत | दि. ३०/०३/२०२६ स. ११.०० पर्यंत | दि. ३०/०३/२०२६ स. १२.०० पर्यंत | श्री महावीर अर्बन को-ऑप. बँक लि., सोलापूर ६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर |

| क्र. | कर्जदार व जामीनदार नाव नोटीस दिनांक व रक्कम | तारण स्थावर मालमत्तेचा तपशील | राखीव किंमत / बयाणा रक्कम |
|---|---|---|---|
| १ | दयानंद शरणबसवलिंग शिवयोगीगळू (एचयुएफ) कलम १३(२) नोटीस दि. ०१/०२/२०२२ १३(४) नोटिस दि. ०१/०६/२०२२ दि. ३१/०१/२०२२ अखेर येणेबाकी रु. ३,८७,१६,२१०/-(दि.३०/०४/२०२५ अखेर येणेबाकी. ६,७२,२२,५१५/-+ पुढील होणारे व्याज व खर्च) मा. जिल्हाधिकारी यांनी नेमलेल्या मा. मंडल अधिकारी मंद्रूप ता. दक्षिण सोलापूर यांचे मार्फत प्रत्यक्ष ताबा दि.०४/०४/२०२४ **जामीनदार-** १. दयानंद शरणबसवलिंग शिवयोगीगळू २. शिवरुद्रप्पा सिद्धाराम कल्याणी ३. श्रीमंत निंगप्पा पाच्चापुरे ४. संजय अण्णाप्पा संगोळगी ५. विश्वजित अप्पासाहेब बिराजदार ६. सदानंद शरणबसवलिंग शिवयोगीगळू | दयानंद शरणबसवलिंग शिवयोगीगळू यांचे नांवावरील जिल्हा सोलापूर पैकी ता. दक्षिण सोलापूर मौजे टाकळी हद्दीतील गट नं. ५७/१/ब यांसी क्षेत्र ०.६५.३७ आर. चौ.मी. यावरील सद्या असलेले व भविष्यात होणाऱ्या बांधकामासह यांसी चतुः सिमा पुढीलप्रमाणे :- पूर्व - सोलापूर विजयपूर रस्ता, पश्चिम - गट नं.५७/अ/१, ५७/अ/३ दक्षिण - गट नं.५७अ/३ उत्तरेस - ५७/अ/१ | ३,५०,००,०००/- / ३५,००,०००/- |

बँकेस ज्ञात असलेल्या बोजाचा तपशील - नाही
मालमत्तेबाबत कोणताही दावा कोणी केला असल्यास किंवा त्या स्वरूपाचा व मूल्याचा कोणताही अन्य ज्ञात तपशील नाही

**दिनांक १४/०३/२०२६**
**ठिकाण - सोलापूर**
(टिप- स्वैर भाषांतर तफावत पडल्यास मूळ इंग्रजी ग्राह्य)

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली, सोलापूर**

## चंदन उटी पूजा बुकिंगला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**पंढरपूर, दि. १३ मार्च-**

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती येथे आयोजित श्री विठ्ठलच्या चंदन उटी पूजेसाठी भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून सर्व पूजा अल्पावधीतच बुक झाल्या आहेत. प्रति पूजेस २१ हजार इतके देणगी शुल्क निश्चित करण्यात आले होते. प्रतिपूजेस ९ हजार इतके देणगी शुल्क निश्चित करून पूर्णपणे बुक झाल्या आहेत. चंदन उटी पुजा या भाविकांची गर्दी विचारात घेता चैत्री यात्रा व अधिकमास महिन्याचे दिवस वगळून उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. भाविकांकडून मिळालेल्या या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीच्या वतीने व्यवस्थापक संदेश भोसले यांनी भाविकांचे आभार मानले. सर्व पूजाविधी वेळापत्रकानुसार पार होणार असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

### भूमी संपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम ११(१) नुसार अधिसुचना

**क्र./एलएक्यू/एसआर/दिवेगव्हाण/१५/२०२४**
**उपविभागीय अधिकारी कार्यालय माढा विमाग, कुर्डूवाडी**
**दि.०९/०३/२०२६**

ज्या अर्थी, महाराष्ट्र शासन महसूल व वन विभागाची अधिसूचना क्र. मिस-११/२०१४/सी.आर.७७ (पार्ट-२)/ए-२ दि.११ सप्टेंबर २०१५ (यास यापुढे सदर अधिसुचना असे संबोधले जाईल) भूमी संपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा वापार करुन असेल अधिसुचीत केले आहे की सदर अधिनियमाच्या कलम ३ (झ अ) अन्वये सार्वजनिक जमिनीच्या संपादनाबाबत १०,००० हेक्टर क्षेत्राच्या मर्यादेपर्यत भूसंपादना संबंधात, अशा जिल्हयाचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी, **'समुचित शासन'** असल्याचे मानण्यात येईल.

त्या अर्थी, सदर अधिसुचने अन्वये जिल्हाधिकारी, सोलापूर हे समुचित शासन आहे. त्या अर्थी, परिशिष्ट १ मध्ये नमूद जमिन ही सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादित करण्याची आवश्यकता आहे. किंवा आवश्यकता भासू शकते तसेच सार्वजनिक प्रयोजनाबाबतचे निवेदन परिशिष्ट २ मध्ये करण्यात आले आहे. त्या अर्थी सदर कायद्याचा कलम ११ उपकलम (१) अन्वये अधिसुचीत करण्यात येते की, सार्वजनिक प्रयोजनासाठी सदर जमिन संपादनाची आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासू शकते.

त्या अर्थी, परिशिष्ट ३ मध्ये भूसंपादनामुळे विस्थापित कुटूंबासाठी प्रस्तावित जमिन संपादनाची माहिती विनिर्दिष्ट करण्यात आली आहे.

आणि त्या अर्थी, परिशिष्ट ४ मध्ये समाजिक आघात निर्धारणाबाबतची संक्षिप्त माहिती विनिर्दिष्ट करण्यात आली आहे.

आणि त्या अर्थी, परिशिष्ट ५ मध्ये सदर कायद्याच्या कलम ४३ उपकलम (१) अन्वये कामकाज पार पाडणाऱ्या प्रशासकाचा तपशिल देण्यात आला आहे.

त्या अर्थी, सदर कायदद्याच्या कलम ११ उपकलम ४ अन्वये असे जाहिर करण्यात येते की, सदरची अधिसुचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून सदर कायद्याच्या प्रकरण ४ मधील कार्यवाही पूर्ण होईल अशा वेळेपर्यंत कोणतीही व्यक्ती, प्राथमिक अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जमिनीचा कोणताही व्यवहार/हस्तांतर करणार नाही किंवा अशा जमिनीवर कोणताही बोजा निर्माण करणार नाही.

परंतु जिल्हाधिकारी अशा प्रकारे अधिसुचित केलेल्या जमिनीच्या मालकाने अर्ज केल्यावर लेखी नोंदवावयाच्या विशेष परिस्थितीमध्ये या पोटकलमाच्या अंमलबजावणीतून अशा जमिन मालकास सूट देऊ शकेल परंतु आणखी असे की, कोणत्याही व्यक्तीने, या तरतूदीचे जाणीवपुर्वक उल्लंघन केल्यामुळे तिला सोसाव्या लागलेल्या कोणत्याही नुकसानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्याद्वारे भरपाई करण्यात येणार नाही.

सदर कायद्याच्या कलम ११ चे उपकलम ५ व भूमी संपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम २००४ चे कलम ५० उपकलम ३ अन्वये जिल्हाधिकारी विहित करण्यात येईल त्याप्रमाणे भूमी अभिलेख अद्यावत करण्याचे काम हाती घेईल.

आणि ज्या अर्थी, सदर कायद्याचे कलम ३ उपकलम (ग) अन्वये जिल्हाधिकारी, सोलापूर हे समुचित शासन असल्याने उपविभागीय अधिकारी, माढा विभाग कुर्डूवाडी यांना जिल्हाधिकारी यांचेवतीने कामे पार पाडण्यासाठी प्राधिकृत करीत आहे.

**परिशिष्ट १**
**जमिनीचे वर्णन**

**गांवाचे नाव :** दिवेगव्हाण **तालुका :-** करमाळा **जि.** सोलापूर

| अ.क्र. | गट नं. | क्षेत्र (हे.आर) | अ.क्र. | गट नं. | क्षेत्र (हे. आर) |
|---|---|---|---|---|---|
| १ | ६७ पै | ०.६३ | २ | ६६ पै | १.५६ |
| ३ | ६४ पै | ०.५२ | ४ | ५५ पै | १.५८ |
| ५ | ५१ पै | ०.८८ | ६ | ५२ पै | २.०० |
| | | | | एकूण | ६.१५ |

**परिशिष्ट २**

**प्रकल्पाचे नाव :-** कुकडी डावा कालव्याच्या चिलवडी शाखा कालवा, पारेवाडी वितरिका सा.क्रं.६/१२० ते ७/३०० करिता मौजे दिवेगव्हाण ता. करमाळा जि. सोलापूर
**प्रकल्पाचे विवरण :-** कुकडी डावा कालव्याच्या चिलवडी शाखा कालवा, पारेवाडी वितरिका सा.क्रं.६/१२० ते ७/३०० करिता मौजे दिवेगव्हाण ता. करमाळा जि. सोलापूर
**सामाजिक फायदे:** जलसिंचन
(सामाजिक, आर्थिक व इतर फायदे)

**परिशिष्ट ३**
**पुनर्वसन विषयक बाबीचे विवरण**

**गांवाचे नाव:** दिवेगव्हाण **तालुका :-** करमाळा **जि.** सोलापूर

| अ.क्रं | स.नं/गट नं. | क्षेत्र (हेआर) |
|---|---|---|
| | लागू नाही. | - |

**परिशिष्ट ४**
**सामाजिक आघात निर्धारण अहवालाचा गोषवारा**
**अनुसूची - चार**

(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अधिकाऱ्याने दिलेला) मा. अवर सचिव, महाराष्ट्र शासन यांचेकडील क्रमांक संकीर्ण-२०२५ प्र.क्र.४७/अ-३, दिनांक १६ सप्टेंबर २०२५ अन्वये सदर प्रकल्पाचे काम संपादन मडंळाने ताबा घेऊन पूर्ण झाले असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे प्रकल्प पूर्ण झाला असल्याने विधी व न्याय विभागाने अन्य प्रकरणी दिलेल्या अभिप्रायानुसार भूसंपादन अधिनियम, २०१३ मधील कलम १० (क) नुसार सदर प्रस्तावास पूर्वलक्षी प्रभावाने ड्खअ सूट देता येऊ शकत नाही.

**परिशिष्ट ५**
**प्रशासक नियुक्तीचे विवरण**

**१) प्रशासकाचे पदनाम :-** लागू नाही
**२) प्रशासकाचा कार्यालयीन पत्ता :-** लागू नाही
**३) ज्या अधिसुचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती केली ते नमूद करावे** - लागू नाही

सदर अधिसुचनेद्वारे ज्या जमिनीची सार्वजनिक प्रयोजनाची आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासण्याचा संभव असल्याचे कायद्याच्या कलम ११ चे उपकलम १ खाली अधिसुचित करण्यात आले आहे. प्रारंभिक अधिसुचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसाच्या आत उपविभागीय अधिकारी, माढा विभाग कुडूवाडी यांचे कार्यालयात आक्षेप नोंदविता येईल.

**नोट - प्रस्तुत जमिनीचा नकाशा पाहणीसाठी उपविभागीय अधिकारी माढा विभाग, कुडूवाडी यांचे कार्यालयात उपलब्ध आहे.**

**स्थळ:-** कुर्डूवाडी
**दिनांक :-** ०९/०३/२०२६

**सही/-**
**(जयश्री आव्हाड)**
**उपविभागीय अधिकारी**
**माढा विभाग कुर्डूवाडी**

**जिमाका/सो/जाहि/३८८/२०२५-२६**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# इटलीला नमवून भारत अंतिम फेरीत

● एफआयएच महिला हॉकी विश्वचषक पात्रता ● मनीषा चौहानचा विजयी गोल ● अंतिम गाठ इंग्लंडशी



इटलीच्या खेळाडूला हुलकावणी देत आगेकूच करताना भारतीय महिला हॉकीपटू

**हैदराबाद, १३ मार्च**

एफआयएच महिला हॉकी विश्वचषक पात्रता फेरी स्पर्धेत जीएमसी बालयोगी हॉकी मैदानावर खेळल्या गेलेल्या अटीतटीच्या दुसऱ्या उपांत्य फेरीत मनीषा चौहानने तिसऱ्या चरणात ४० व्या मिनिटाला केलेल्या महत्त्वपूर्ण एकमेव गोलच्या जोरावर भारतीय महिला हॉकी संघाने इटलीवर १-० ने रोमहर्षक विजय नोंदविला आणि स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक मारली. याबरोबरच महिला हॉकी विश्वचषकासाठी आपली पात्रता सिद्ध केली.

इटलीच्या फिओरेलीने पाच मीटर नियमाचे उल्लंघन केल्यामुळे भारताला एक पेनॉल्टी कॉर्नर मिळाला. वैष्णवी फाळकेने केलेला इंजक्शन पास मनीषापर्यंत पोहोचला आणि तिने मारलेला अप्रतिम ड्रॅगफ्लिक गोलरक्षक व इटलीच्या दोन बचावपटूंना स्पर्श करून थेट जाळ्यामध्ये विसावला. अखेर भारताला या सामन्यात पहिले यश मिळाले. मनिषाकाचा हाच गोल भारतासाठी विजयी गोल ठरला. भारताला आणखी मोठ्या गोलसंख्येने विजय मिळविता आला असता, परंतु मिळालेल्या पाचही पेनॉल्टी कॉर्नर वाया घालविल्या. इटलीला एक पेनॉल्टी कॉर्नर मिळाली, परंतु ते त्याचा फायदा घेऊ शकले नाहीत. (वृत्तसंस्था)

### इंग्लंडची स्कॉटलंडवर २-० ने मात

स्पर्धेच्या प्रारंभापासून इंग्लंडने आपली विजयी घोडदौड कायम राखली असून शुक्रवारी खेळल्या गेलेल्या पहिल्या उपांत्य सामन्यात इंग्लंडने स्कॉटलंडवर सरळ २-० गोलने विजय नोंदवून स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक मारली. सामन्याच्या २४ व्या मिनिटाला बिघम लॉटीने इंग्लंडसाठी पहिला गोल नोंदविला, तर चार मिनिटांनी म्हणजे २८ व्या मिनिटाला बॉर्न डार्सीने इंग्लंडच्या खात्यात दुसऱ्या गोलची भर घातली. या सामन्यादरम्यान स्कॉटलंडला पाच पेनॉल्टी कॉर्नरची संधी मिळाली, परंतु त्यांना एकाही संधीचा फायदा उचलता आला नाही. इंग्लंडला मिळालेल्या दोन पेनॉल्टी कॉर्नरला गोलमध्ये रूपांतर करण्यात अपयश आले, अन्यथा त्यांना आणखी मोठ्या गोलफरकाने विजय नोंदविता आला असता.

### अंतिम सामना आज

आता विजेतेपदासाठी भारत व इंग्लंड यांच्यादरम्यान शनिवारी अंतिम सामना खेळला जाणार आहे. हैदराबाद आणि सॅण्टियागो या दोन्ही ठिकाणी अनुक्रमे पहिले, दुसरे आणि तिसरे स्थान पटकावणाऱ्या संघांना २०२६ च्या महिला हॉकी विश्वचषकासाठी थेट पात्रता मिळेल. या विश्वचषकाचे संयुक्त यजमानपद १५ ते ३० ऑगस्ट या कालावधीत बेल्जियम आणि नेदरलॅण्ड हे देश भूषवतील.

या दोन्ही स्पर्धांमध्ये चौथे स्थान पटकावणाऱ्या संघांपैकी, सर्वोत्तम मानांकन असलेला संघही या जागतिक हॉकी महाकुंभासाठी पात्र ठरेल.

भारताने यापूर्वी आठ वेळा महिला हॉकी विश्वचषकासाठी पात्रता मिळवली असून, १९७४ मध्ये या स्पर्धेच्या पहिल्याच आवृत्तीत त्यांनी आपली सर्वोत्तम कामगिरी म्हणजेच चौथे स्थान नोंदवली होती. स्पेनमध्ये पार पडलेल्या २०२२ च्या महिला हॉकी विश्वचषकात भारताने नववे स्थान पटकावले होते.



मानाच्या गदेचे पूजनप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, खा. मुरलीधर मोहोळ व इतर

# महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेच्या बोधचिन्हाचे अनावरण

**मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते मानाच्या गदेचे पूजन | १८ ते २२ मार्च दरम्यान वाघोली, पुणे येथे स्पर्धा**

**मुंबई, १३ मार्च**

वर्षा या शासकीय निवासस्थानी ६८ व्या 'महाराष्ट्र केसरी २०२५-२६' कुस्ती स्पर्धेच्या अधिकृत बोधचिन्हाचे (लोगो) अनावरण व मानाच्या गदेचे पूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उत्साहात झाले.

महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्या मान्यतेने रामकृष्ण सातव पाटील यांच्या वतीने या भव्य स्पर्धेचे आयोजन १८ मार्च ते २२ मार्च २०२६ या कालावधीत वाघोली, पुणे या ठिकाणी करण्यात आले आहे. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पर्धेच्या नियोजनाची सविस्तर माहिती घेत आयोजक रामकृष्ण सातव पाटील यांच्या प्रयत्नांचे कौतुक केले व स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी शुभेच्छा दिल्या.

सदर स्पर्धेच्या समारोप समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहण्याचे निमंत्रण आयोजक रामकृष्ण सातव पाटील यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना दिले असून त्यांनी ते स्वीकारले आहे. यंदाच्या महाराष्ट्र केसरी विजेत्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मानाची गदा आणि फॉर्च्युनर गाडी देऊन गौरविण्यात येणार आहे.

या कार्यक्रमास केंद्रीय राज्यमंत्री व महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे उपाध्यक्ष मुरलीधर मोहोळ, महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे सरचिटणीस पै. योगेश दोडके, पुणे जिल्हा कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष मेघराज कटके, नगरसेवक अनिल सातव पाटील तसेच कृष्णा बुचडे, नटराज सातव पाटील, सुनील (चाचा) जाधवराव, राहुल सातव, केतन जाधव, सागर सातव, महेश माने, मुकेश सातव, संदीप वारे, मयूर सातव आदी मान्यवर उपस्थित होते. (वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### कुलदीप-वंशिका आज विवाह बंधनात अडकणार



**लखनौ** : भारतीय क्रिकेट संघाचा स्टार फिरकीपटू- चायनामॅन कुलदीप यादव शनिवार, १४ मार्च रोजी मसुरी येथे वंशिका सिंग चड्ढा हिच्यासोबत विवाहबंधनात अडकणार आहे. मसुरी येथील ऐतिहासिक आयटीसी सॅवॉय हॉटेलमध्ये सुरू असलेल्या तीन दिवसीय विवाह सोहळ्यांची सुरुवात गुरुवारी मेंदीच्या विधीने झाली आहे. शुक्रवारी हळद आणि संगीत कार्यक्रम होत आहे. डावखुरा फिरकी गोलंदाज कुलदीपने भारताच्या २०२६ च्या टी-२० विश्वचषक मोहिमेत महत्त्वाची भूमिका बजावली आणि आता त्याच्या आयुष्यात एक अत्यंत वैयक्तिक आणि खास प्रसंग उभा आहे. या जोडप्याचा साखरपुडा ४ जून २०२५ रोजी झाला होता; परंतु क्रिकेटच्या व्यस्त वेळापत्रकामुळे लग्नाची तारीख पुढे ढकलावी लागली होती. २८ मार्च रोजी २०२६ च्या आयपीएल स्पर्धेला सुरुवात होणार असल्याने, दोन स्पर्धांमधील हा छोटासा कालावधी लग्नासाठी अगदी योग्य ठरला. १७ मार्च रोजी हे जोडपे लखनौ येथे एका भव्य स्वागतसमारंभाचे आयोजन करणार आहे. या स्वागतसमारंभाला मान्यवरांची मोठी उपस्थिती लाभण्याची अपेक्षा आहे.

### ऑस्ट्रेलियन गोल्फमध्ये दीक्षा, वाणीची आगेकूच

**सिडनी** : दीक्षा डागर, वाणी कपूर आणि अवनी प्रशांतने महिला ऑस्ट्रेलियन ओपन गोल्फ स्पर्धेतील मध्यावधी कट पार केला, तर अन्य दोन भारतीय खेळाडू - हिताशी बक्षी आणि प्रणवी उर्सला शुक्रवारी या स्पर्धेतून बाहेर पडावे लागले. गत आठवड्यात सर्वोत्तम कामगिरी करणारी भारतीय खेळाडू ठरलेल्या दीक्षाने या फेरीतही २-ओव्हर ७४ असा स्कोअर नोंदवला. वाणीने आपल्या पहिल्या फेरीतील ७२ गुणांच्या स्कोअरमध्ये दुसऱ्या फेरीतील २-ओव्हर ७४ गुणांची भर घातली. या दोन्ही खेळाडू ३१ व्या स्थानावर संयुक्तपणे विराजमान झाल्या. मागील दोन स्पर्धांमध्ये कट पार करण्यात अपयशी ठरलेल्या अवनीने पहिल्या दिवशी ७७ गुण नोंदवले होते; त्यानंतर दुसऱ्या दिवशी ७२ गुणांची भर घातली. एकूण ६७ खेळाडूंनी कट पार केला असून, अवनी ६० व्या स्थानावर संयुक्तपणे विराजमान झाली आहे. हिताशी (७७-७४) आणि प्रणवीला (७८-७५) मात्र कट पार करण्यात अपयश आले.

### साखरपुड्यानंतर पृथ्वी शॉने घेतले महाकालचे दर्शन



**उज्जैन** : भारतीय क्रिकेटपटू पृथ्वी शॉ आणि त्याची होणारी पत्नी (वाग्दत्त वधू) आकृती अग्रवाल यांनी शुक्रवारी उज्जैन येथील श्री महाकालेश्वर मंदिरात जाऊन पूजा-अर्चा केली आणि पहाटेच्या भस्म आरतीमध्ये सहभाग घेतला. मला खूपच अद्भूत वाटले. भस्म आरतीसाठी मी येथे पहिल्यांदाच आलो आहे. मी याबद्दल खूप काही ऐकले होते. मला येथे प्रचंड सकारात्मकता जाणवली. दर्शन खरोखरच खूप छान झाले, सर्वांचे आभार, असे पृथ्वी शॉ म्हणाला. आपला साखरपुडा आणि भारताचा टी-२० विश्वचषक विजय या दोन्ही महत्त्वाच्या घडामोडींनंतर, क्रिकेटपटू पृथ्वी शॉ आणि त्याची होणारी पत्नी आकृती अग्रवाल यांनी उज्जैन येथील श्री महाकालेश्वर मंदिरात जाऊन आशीर्वाद घेतले. भविष्यातही असे आणखी विश्वचषक येत राहतील. आपला देश वेगाने प्रगती करत आहे.

### अल्टिमेट टेबल टेनिस स्पर्धा जुलैमध्ये गोव्यात होणार

**नवी दिल्ली** : फ्रॅन्चायझी-आधारित अल्टिमेट टेबल टेनिस (यूटीटी) स्पर्धेचे सातवे पर्व जुलै महिन्यात गोव्यातील श्यामा प्रसाद मुखर्जी इनडोअर स्टेडियम येथे आयोजित केले जाईल, अशी माहिती आयोजकांनी शुक्रवारी दिली. टेबल टेनिस फेडरेशन ऑफ इंडियाच्या (टीटीएफआय) अधिपत्याखाली आणि इलेव्हन स्पोर्ट्स प्रायव्हेट लिमिटेडद्वारे आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धेने, २०१७ मध्ये सुरुवात झाल्यापासून देशातील सर्वात प्रमुख क्रीडा उपक्रमांपैकी एक म्हणून आपले स्थान निर्माण केले आहे, असे आयोजकांनी एका निवेदनात म्हटले आहे. अल्टिमेट टेबल टेनिस ही स्पर्धा भारतातील टेबल टेनिस क्षेत्राच्या विकासाचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ बनली आहे. गेल्या काही वर्षांत, तळागाळातील प्रशिक्षण कार्यक्रमांपासून ते आंतरराष्ट्रीय स्पर्धांपर्यंतक्रीडा क्षेत्राच्या प्रत्येक स्तरावर खेळाचा दर्जा उंचावलेला आम्ही पाहिला आहे,

# भारतीय मुष्टियोद्ध्यांची पाच पदके निश्चित



**बँकॉक, १३ मार्च** - येथे आयोजित जागतिक मुष्टियुद्ध फ्युचर्स चषक स्पर्धेत भारतीय युवा मुष्टियुद्ध संघाने उपांत्यपूर्व फेरीत मिळवलेल्या प्रभावी विजयांसह देशासाठी पाच पदके निश्चित केली आहे. गुंजन (४८ किलो), जॉयश्री देवी (५४ किलो), अंबेकर मीतेई (५० किलो), चंद्रिका पुजारी (५१ किलो) व राधामणी लोंगजामने (५७ किलो) उपांत्य फेरीत धडक मारली. या कामगिरीबरोबरच या स्पर्धेत भारतासाठी पाच पदके निश्चित केली आहेत. गुंजनने अझरबैजानच्या गुलार हुसेनोनोव्हावर ५-0 अशा एकमताने निर्णय देत दणदणीत विजय मिळवला. जॉयश्रीने आपल्या खेळाचे वर्चस्व सिद्ध करत, जपानच्या युरा कानोरूला पहिल्याच फेरीत पराभूत केले. पुरुषांच्या ५0 किलो वजनी गटात जपानच्या अकिरा उएकुबोचा ४-१ ने पराभव करत आंबेकर यानेही पुढील फेरीत मजल मारली. आणखी दोन भारतीय मुष्टीयोद्ध्यांनी आगेकूच केली; यामध्ये चंद्रिका पुजारी (५१ किलो) हिने दुसऱ्या फेरीतच (रेफरीने सामना थांबवणे) द्वारे स्पेनच्या अँड्रिया बुएल्गा गार्सियाचा पराभव केला, तर राधामणी लोंगजाम (५७ किलो) हिने इंग्लंडच्या सिओभान हेलीवर ४-१ ने विजय नोंदवला. साहिल दुहान (६0 किलो) याला मात्र आपल्या लढतीत फ्रान्सच्या डेव्हिड हारुत्युन्यानकडून १-४ ने पराभव पत्करावा लागला.



# खेळाडूंसह ६० मान्यवरांचा सन्मान

**कन्या फाऊंडेशनचा उपक्रम**

**सोलापूर, दि. १३ मार्च-**

पारंपारिक शिवकालीन मैदानी खेळांचा वारसा जपणाऱ्या ३५ खेळाडूंसह समाजात विविध क्षेत्रात काम करणाऱ्या ६0 मान्यवरांचा आदर्श पुरस्कारने सन्मानीत करण्यात आले.

जुना विडी घरकुल येथील कै. प्रकाश तुकाराम सोमा सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात योंगमुडो, दांडपट्टा, लाठी-काठी या खेळात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या प्रशिक्षक, मार्गदर्शक यांच्यासह ३५हून अधिक महिला खेळाडूंचा आदर्श-सर्वोत्कृष्ट खेळाडू, आदर्श प्रशिक्षक, मार्गदर्शक तसेच समाजात विविध क्षेत्रात समाजोपयोगी, विधायक कार्य करणाऱ्या २५हून अधिक असे ६0 मान्यवरांचा सन्मानचिन्ह, सन्मानपत्र व आदर्श पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. रुद्रशक्ती गुरुकुल शिवकालीन मर्दानी व क्रीडा प्रशिक्षण केंद्र, विडी घरकुल येथील महिला खेळाडूंना हा पुरस्कार कन्या फाऊंडेशनने धनश्री विविध विकास संस्था, रुद्रशक्ती गुरुकुल प्रशिक्षण केंद्र आणि योंगमुडो असोसिएशन यांच्या विद्यमाने आयोजित केला होता.

कन्या फाऊंडेशनच्या प्रमुख योगिता मठपती, धनश्री विविध विकास संस्थेचे अध्यक्ष नीलकंठ स्वामी, दैनिक तरुण भारतचे माजी संपादक विजयकुमार पिसे, योंगमुडो असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे सरचिटणीस नागेश शेट्टीकर, रुद्रशक्ती गुरुकुल शिवकालीन मर्दानी व क्रीडा प्रशिक्षण केंद्राच्या अध्यक्षा संगिता फुलारी, उपाध्यक्षा रोहिणी भुसारे, सचिवा संजना मिस्कीन, समाजसेवक हरीश सोमा, मीनाक्षी सोमा, मुख्य प्रशिक्षक विवेक मिस्कीन, साक्षी कानगुडे, पूजा शेट्टीकर, बसवराज मठपती, रोटरी क्लब ऑफ अक्कलकोटचे अध्यक्ष जी.एस.पाटील,भारती विद्यापीठ समाजकार्य विभागाचे माजी संचालक डॉ. प्रा. जयश्री मेहता, प्रा. रोहिणी पावडशेट्टी, बॉडी बिल्डींग असोसिएशनचे सचिव प्रमोद काटे, गोरख गडसिंग आदींच्या उपस्थितीत याचे वितरण झाले.

**या मान्यवरांचा झाला सन्मान :** मीनाक्षी हरीष सोमा, हरीष प्रकाश सोमा, विवेक विजय मिस्कीन, संगिता योगिनाथ फुलारी, रोहिणी तुकाराम भुसारे, संजना विवेक मिस्कीन, नागेश शशिकांत शेट्टीकर, जी.एस.पाटील, सोनाक्षी मोहन माडे, पूजा नागेश शेट्टीकर, भावना अजय गड्डम, स्वप्नाली नृसिंह जमादार, दर्शनी संतोष सोमा,श्रद्धा दीपक इप्पनपल्ली, गौरी गिरीराज माळी, वेदश्री अमरनाथ गुड्डूर, प्रवलिका मोहन कामुर्ती, जानवी मल्लिकार्जुन म्हेत्रे, बिंदूप्रिया भास्कर कुने,वैभवी शिवानंद आळगुडगी, तेजल अंबादास रच्चा, मान्यता देविदास रोहिटे, संध्या सोमण्णा पुजारी, श्रद्धा तानाजी सरवदे, ममता नागनाथ अलशेट्टी, आदिती नंदकुमार नल्ला, पल्लवी सिद्राम बिनगुंडी, भविष्या सतीश सिंदम, आराध्या बसवराज मसरेड्डी, नव्या राजेश कुस्मा, कोमल कृष्णा मनीकोंडा, श्रावणी सुनील गवळी, साक्षी शशिकांत कानगुंडे, मोनिका नागेश कसबे, ममता चंद्रशेखर मंडल, सुरेश कागे, सुनिता सुरेश कोरे, डॉ. जयश्री मोहनदास मेहता, रोहिणी गणेश पावडशेट्टी, प्रमोद बलभीम काटे, गोरख गडसिंग, दीपक अशोक गुंजे, अब्दुल्ला अलिसाब चौधरी, निलेश बाबूराव गायकवाड, विजयकुमार पिसे, मुक्ताजी शहाजी कांबळे, कृष्णपरमेश्वर सिद्धप्पा सुतार, गौरीशंकर बनसिद्ध नारायणे, सचिन धुळाजी जाधवर,अलका विष्णू कांबळे, स्नेहल दादासाहेब खराटे, अंजली शिवाजी नागणे, सीमा सुनील जाधव, मेनका रवींद्र चव्हाण, शिल्पा नागराज यावगल, लक्ष्मी राजेश भिमर्थी, सीमा श्रीकांत कोरोलीकार, रेश्मा अमित सावंत.



# खेळामुळे शारीरिक व मानसिक तंदुरुस्ती वाढते

**पोलिस निरीक्षक मोहन पवार यांचे प्रतिपादन**

**शिवदारे महाविद्यालयात क्रीडा शिबिराचे उद्घाटन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ मार्च-**

खेळामुळे शारीरिक व मानसिक तंदुरुस्ती वाढते. शिस्त आणि संघभावना विकसित होते तसेच विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच क्रीडा क्षेत्रातही सक्रिय सहभाग घ्यावा, असे प्रतिपादन पोलिस निरीक्षक मोहन पवार केले. व्ही. जी. शिवदारे कॉलेजमध्ये पीएम उषाअंतर्गत क्रीडा शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रा भीमाशंकर शेटे होते. प्रास्ताविकात उपप्राचार्य प्रा. एम. बी. पाटील यांनी शिबिराचे उद्दिष्ट स्पष्ट केले. यावेळी प्रशासकीय अधिकारी डॉ. डी. एस. सुत्रावे, प्राचार्य डॉ. ए. बी. वळसंगे, प्रा. डॉ. योगेश थोरात, डॉ डी एम बिराजदार आदी उपस्थित होते. प्रा. डॉ. एम. बी. कांबळे यांनी आभार मानले.

# पुणे, सातारा व नाशिकला विजेतेपद; राज्य अजिंक्यपद धनुर्विद्या स्पर्धा





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ मार्च-** राज्य अजिंक्यपद धनुर्विद्या स्पर्धेत रिकर्व्ह प्रकारात १० वर्षांखालील मुलांच्या गटात नाशिकने व मुलींच्या गटात पुण्याने विजेतेपद पटकाविले. मिश्र गटात नाशिकने बाजी मारली. कंपाउंड प्रकारात मुलांच्या गटात साताराने व मुलींच्या गटात पुण्याने विजेतेपदाचा मान मिळविला. मिश्र दुहेरीतही पुण्याने बाजी मारली. नेहरूनगर येथील शासकीय मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत राज्यातून ४०० खेळाडूंनी भाग घेतला आहे. या स्पर्धेची पारितोषिके जिल्हा संघटनेचे सचिव हरिदास रणदिवे, राज्य सहसचिव सोनल बुंदिले मॅडम, अशोक जंगले, रमेश शिरसठ, दीपक चिकणे, विठ्ठल माळी, सागर तकतोडे, सागर सुर्वे, किशोर खिलारे यांच्या हस्ते देण्यात आली. **दहा वर्षाखालील गटाचे अंतिम निकाल (प्रथम तीन)**

**रिकर्व्ह राउंड :** सांघिक : मुले : नाशिक, सातारा, पिंपरी चिंचवड. मुली : पुणे, सातारा, अहिल्यानगर. मिश्र : नाशिक, पिंपरी चिंचवड, सातारा. वैयक्तिक : मुले : साईराज चव्हाण (सातारा), शार्विल तांबे (पिंपरी चिंचवड), भाग्येश पवार (नाशिक). मुली : शार्वया गावडे (पुणे), आरोही पैकार (पुणे), गौरी क्षीरसागर (सोलापूर). वैयक्तिक : शिवराज चव्हाण (सातारा), शर्विल तांबे (पिंपरी चिंचवड), शौर्य निकम (नाशिक). **कंपाउंड राउंड :** सांघिक : मुले : सातारा, पुणे, सोलापूर. सांघिक : पुणे, सोलापूर, नाशिक. मिश्र : पुणे, सोलापूर, नागपूर. वैयक्तिक : मुले : प्रज्वल दाभाडे, अभिमन्यू जगदाळे, सुयश गडदे (तिघे पुणे). वैयक्तिक : अभिमन्यू जगदाळे, राजवीर चव्हाण, प्रज्वल दाभाडे. मुली : मोरया सूर्यवंशी, अन्वी मालवकर (नागपूर), श्रेया हिवारकर. वैयक्तिक : श्रेया हिवरकर, मोरया सूर्यवंशी, सानवी गाढवे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### अकलूज येथे श्री राजे बागसवार पीर देवस्थान उरूस

**अकलुज, दि. १३ मार्च -**

अकलूज (ता. माळशिरस) येथील विजय चौकातील श्री राजे बागसवार पीर देवस्थान अकलूज उरूस कार्यक्रमास दिमाखात सुरवात झाल्याची माहिती पूजारी सुनिल लावंड यांनी दिली. १८६० पासून आज तगायत हिंदू-मुस्लिम एकतेचा संदेश देणारे पीर देवस्थान यांचा उरूस चालू आहे. यंदा गुरुवारी चूना रंगरोगोटी करणे, शुक्रवारी संदल, शनिवार झेंडा-पालखी, रविवार पाकळणी असे कार्यक्रम आयोजित केले आहेत. यावेळी बाळासाहेब लावंड, अमोल लावंड, इरफान शेख, मन्सूर पठाण, गुलाब तांबोळी, रामचंद्र लावंड, शिवाजी लावंड, अमोल लावंड उपस्थित होते. ज्या भाविकांना उरूस कार्यक्रम महाप्रसादासाठी अन्नदान करावयाचे आहे त्यांनी पुजारी सुनिल लावंड (९३७३३१७२१७ /९५०३९६४२९७) यांचेशी संपर्क करावा. भाविक भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे अहवान केले आहे.

### सांगोल्यातील दक्षता हॉस्पिटलमध्ये मूत्ररोग शिबिराचे आयोजन

**सांगोला, दि.१३ मार्च -**

सांगोला शहरातील जय भवानी चौक येथे असणाऱ्या दक्षता मल्टीस्पेशलिटी हॉस्पिटल येथे सांगली येथील मूत्ररोग तज्ञ डॉ.आदींन चोपडे यांचे स.१० ते सायं.५ वा.पर्यंत दि.११ मार्च ते ११ एप्रिल असे १ महिना पूर्णपणे मोफत मूत्ररोग- निदान, उपचार, शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन केले आहे. या शिबिरामध्ये मूत्ररोग, मुतखडा, प्रोस्टेट ग्रंथीची सूज, मूत्राशयाचे- आजार व खडे, किडनीचे- आजार, सूज, खडे, मूत्रवाहिनी मधील खडे, लघवी संबंधितील आजार यावर मोफत तपासण्या केल्या जाणार आहेत. ज्या रुग्णांना मूत्ररोग संबंधातील शस्त्रक्रियेचा सल्ला दिला आहे, त्यांच्यावर होणारी शस्त्रक्रिया केशरी, पिवळे, पांढऱ्या रेशन कार्ड धारकांना महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री आयुष्यमान भारत योजना यांच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. तरी सोलापूर जिल्ह्यातील सांगोला, मंगळवेढा, पंढरपूर व सांगली जिल्ह्यातील आटपाडी, जत तालुक्यातील गरजू रुग्णांनी मो.नं.९१४५१२४५७९ संपर्क साधून या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन दक्षता मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलच्या वतीने करण्यात आले आहे.

### महिला दिनानिमित्त टायगर ग्रुपतर्फे संघर्ष कन्यांचा सत्कार

**अक्कलकोट, दि. १३ मार्च-**

जागतिक महिला दिनानिमित्त टायगर ग्रुपतर्फे नारी सन्मान व संघर्ष कन्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संघर्षकन्या ॲड. फारिया टिनवाला व रागिणी जाधव यांचा सत्कार आयोजक अंजली शिरसाट यांच्या हस्ते करण्यात आला. ॲड.टिनवाला यांनी महिलांचे अधिकार याबद्दल कायदेशीर माहिती देऊन आपले मनोगत व्यक्त केले. महिलांसाठी होम मिनिस्टर, संगित खुर्ची, डान्स व विविध खेळांचे आयोजन केले होते. या खेळात विजयी झालेल्यांना टायगर ग्रुपतर्फे आकर्षक बक्षिसे देण्यात आली. नगरसेविका सुनंदाताई स्वामी, माजी नगरसेविका अरूणा पवार आदी उपस्थित होते. आयोजक अंजली शिरसाट यांनी उपस्थित महिलांचे आभार मानले. सलग तिसऱ्या वर्षी महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याबद्दल समाधान व्यक्त केले. नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभल्याचे त्यांनी सांगितले.

## निधन वृत्त...

### यमुनाबाई शिंदे



**मंगळवेढा, दि. १३ मार्च-**

रोहिदास गल्ली येथील यमुनाबाई महादेव शिंदे(वय-७०) यांचे शुक्रवार दि.१३ मार्च रोजी दुपारी ३ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, चार मुली, सुन, नातू असा परिवार आहे. वायरमन दतात्रय शिंदे यांच्या त्या मातोश्री होत.

### अजित कवठेकर



**सोलापूर, दि.१३ मार्च-**

सतत १७ वर्षे सरपंच राहिलेले रातंजन (ता. बार्शी) येथील भाजपाच्या किसान आघाडीचे माजी जिल्हाध्यक्ष, जुळे सोलापूरच्या चंदननगरच्या रेणूका रेसिडन्सीचे रहिवाशी अजित गोपाळ कवठेकर (वय-७३) यांचे शुक्रवारी पहाटे पुणे येथे अल्पशा आजाराने निधन झाले. पुणे येथील वैकुंठ स्मशानभूमीत त्यांच्या पार्थीवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून, मुलगी, जावई, नातवंडे, एक भाऊ, दोन बहिणी असा परिवार आहे. ज्ञान प्रबोधिनीच्या माजी मुख्याध्यापिका चित्रा कवठेकर यांचे ते पती होत. दै. तरुण भारतचे मुख्य जनसपर्क अधिकारी नितीन कवठेकर यांचे ते बंधू होत. पुणे येथील न्यायाधिश निखिल गोसावी यांचे ते सासरे होत. आमदार सुभाष देशमुख यांचे ते अत्यंत निकटवर्ती होते.

### दत्तात्रय उकरंडे



**सोलापूर, दि.१३ मार्च-**

येथील चाटी गल्ली येथील एकेकाळचे प्रसिद्ध व्यापारी दत्तात्रय पांडुरंग उकरंडे (वय-७२) यांचे दि. १२ मार्च रोजी अल्पशा आजाराने भवानी पेठ येथे निधन झाले. साड्यांचे व्यापारी सी.व्ही. अंकाराम यांचे ते भागीदार होते. स्व.पांडुरंग उकरंडे यांचे ज्येष्ठ चिरंजीव तर स्व. गोपीनाथराव मुंडे यांचे प्रथम सचिव भानुदास उकरंडे यांचे ते ज्येष्ठ बंधू होते.

# थकीत ऊस बिलासाठी किसान सभेचे प्रादेशिक साखर कार्यालयासमोर धरणे आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि.१३ मार्च-**

थकीत ऊसबिलासाठी अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने जिल्हाध्यक्ष सुभाष तावकर यांच्या नेतृत्वाखाली ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी प्रादेशिक सहसंचालक साखर कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले.



जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे मागील व चालू वर्षाचे ऊस बिल विविध साखर कारखान्यांकडे थकीत आहे. मागील हंगामात गाळप झालेल्या ऊसाचे बिल अनेक कारखान्यांकडे अद्यापदेखील थकीत आहेत. साखर कारखान्यास ऊस पुरवठा करणारे शेतकरी वारंवार थकीत बिलांची मागणी करून देखील आजतागायत मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांचे ऊस बिल कारखानदाराकडे थकीत आहेत. ते वेळेवर मिळत नाही. ऊस उत्पादक शेतकऱ्यांची परिस्थिती गंभीर होत चालली आहे. शेतीचा वाढता खर्च, कर्जफेड, खत-बियाणे, औषधे, मजुरी, मुलांच्या शिक्षणाचा खर्च तसेच कुटुंबाचा उदरनिर्वाह या सर्व जबाबदाऱ्या पार पाडताना कसरत करावी लागत आहे. अशा परिस्थितीत कारखान्याकडून ऊस बिल देण्यास होत असलेला विलंब शेतकऱ्यांना गंभीर आर्थिक अडचणीत टाकणारा आहे. यामुळे शेतकरी आणि शेती दोन्ही संकटात सापडले आहेत. या बाबी सहसंचालक यांच्यासमोर मांडण्यात आल्या.

या आंदोलनास सीटूचे महासचिव ॲड. एम. एच. शेख, जिल्हा सचिव युसुफ शेख, किसान सभा जिल्हा सचिव कॉ. सुलेमान शेख, युवा महासंघाचे सचिव अनिल वासम यांनी मार्गदर्शन केले. जिल्हा सहसचिव दत्ता चव्हाण यांनी प्रास्ताविक केले. यावेळी कार्याध्यक्ष स्वामीनाथन शिरगुरे, राजेंद्र स्वामी, कॉ. जावेद आवटे, दयानंद फताटे, चिदानंद बगले, सिकंदर मकानदार, तुकाराम माळेवाडी, पैगंबर नदाफ, मळसिध्द माशाळे, अरुण शिंदे, मल्लिनाथ माकने, नागपा कुरणे आदींची उपस्थिती होती.

**धरणे आंदोलनातील मागण्या**

सर्व ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे थकीत ऊस बिल तात्काळ अदा करावे. तसेच विलंबाबद्दल व्याजासह रक्कम शेतकऱ्यांना देण्यात यावी. शासनाच्या नियमानुसार १४ दिवसांच्या आत एफआरपी प्रमाणे ऊस बिल देण्याची काटेकोर अंमलबजावणी करावी. ज्या कारखान्यांकडून शेतकऱ्यांचे बिल थकीत आहे त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी. वरील मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घेण्यात यावा. अन्यथा अखिल भारतीय किसान सभेकडून शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी तीव्र आंदोलन करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

## यशवंतरावांच्या कार्यामुळे मुक्त विद्यापीठास प्रतिष्ठा

**डॉ.राजेंद्रसिंह लोखंडे यांचे प्रतिपादन**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.१३ मार्च-**

कृषी, औद्योगिक, शैक्षणिक व सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन राज्य सरकारने यशवंतराव चव्हाण त्यांच्या नावाने मुक्त विद्यापीठाची स्थापना केली. त्यांच्या नावामुळेच विद्यापीठास प्रतिष्ठा प्राप्त झाली असे मत डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे यांनी व्यक्त केले.

मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालय अंतर्गत यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या वतीने स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांना जयंती निमित्त अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी शरणय्या मसुती, बसवराज कामाठी, विकास तळवार, जयश्री बिराजदार, सरोजिनी हारकुड, रवींद्र कालीबत्ते, कल्पना स्वामी उपस्थित होते. शरणय्या मसुती यांनी आभार मानले.

## 'उत्तर'च्या सभापतीपदी बोराडे तर उपसभापती भोसले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ मार्च-**

पंचायत समिती उत्तर सोलापूरच्या सभापतीपदी मार्डी गणातून भाजपाकडून विजयी झालेल्या तेजस्विनी अमोल बोराडे यांची तर उपसभापतीपदी नान्नज पंचायत समिती सदस्य सुनील भोसले यांची निवड करण्यात आली.



या निवडीवेळी निवडणूक निर्णय अधिकारी सदाशिव पडदुणे, गटविकास अधिकारी राजाराम भोंग यांच्यासह भाजप कार्यकारणी सदस्य शहाजी पवार, जिल्हा परिषद सदस्य इंद्रजित पवार, सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक अविनाश मार्तंडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या निवडीनंतर भाजपा पदाधिकारी-कार्यकर्त्यांनी जल्लोष केला. यावेळी पंचायत समिती सदस्य सुनीता बारसकर, ऋतुजा बंडगर, सुनील भोसले, लक्ष्मी शिलवंत, धनाजी भोसले यांच्यासह श्रीमंत बंडगर, काशिनाथ कदम, युवराज पवार, कमलाकर माने, संभाजी दडे, अझहर शेख, गणेश पवार, सुनील जाधव, अमोल बोराडे, प्रभाकर फुलसागर, किसन पाटोळे, बाळासाहेब पाटील, संभाजी पाटील, अविनाश सिरसट, कैलास कांबळे, अर्जुन जाधव, चिमण जहागीरदार, इनायत जहागीरदार, बाबुराव भोरे, पिंटू कापसे, अंबादास कांबळे, शहाजी गायकवाड उपस्थित होते.

## ग्रामीण रुग्णालयातील कनिष्ठ लिपिकाची कायम असते दांडी

**कर्मचाऱ्यांवर 'दादागिरी' करतात अशी तक्रार; वरिष्ठांचे मात्र दुर्लक्ष**

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. १३ मार्च -**

मंद्रूप ग्रामीण रूग्णालयातील कनिष्ठ लिपिक महेबूब सुभेदार कार्यालयाला दांडी मारून ग्रामीण रूग्णालयामधील कर्मचाऱ्यावर दादागिरी करीत असल्याची तक्रार केल्यानंतरही वरिष्ठ अधिकारी मुग गिळून गप्प आहेत. प्रशासनाच्या ढिसाळ कारभाराविरोधात काम बंद आंदोलन करण्याचा इशारा कर्मचाऱ्यांनी दिला आहे.





मंद्रूप ग्रामीण रूग्णालयात महेबूब सुभेदार हे कनिष्ठ लिपिक म्हणून कार्यरत आहेत. मात्र वरिष्ठ अधिकाऱ्यांना 'मॅनेज' करून ते कार्यालयाला दांडी मारत असल्याची चर्चा आहे. कनिष्ठ लिपिक असूनही अधिकारी व कर्मचाऱ्यांवर दादागिरी होत असल्याबाबत सांगण्यात आले. कर्मचाऱ्यांना त्रास देण्यासाठी त्यांचे वेतन थांबविणे, वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे कर्मचाऱ्यांची तक्रार करून कर्मचाऱ्यांना त्रास देणे व १५ दिवस ते महिनाभर कार्यालयाकडे पाठ फिरविणे अशा तक्रारी कर्मचाऱ्यामधून सांगण्यात येते. शिवाय समर्थकांच्या माध्यमातून कार्यालयात दबदबा निर्माण करण्याचाही प्रकार सुरू आहे. स्वतः कनिष्ठ लिपिक कार्यालयात नसताना अनेक वर्षांपासून वेतन घेण्याचा प्रकार सुरु आहे. मात्र रुग्णालयात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे वेतन थांबवून नाहक त्रास देण्याचा प्रकार सुरू असताना वरिष्ठ अधिकारी कारवाई करण्याऐवजी मूग गिळून गप्प असल्याने कर्मचाऱ्यांमधून संताप व्यक्त करण्यात येत आहे. कनिष्ठ लिपिकांबद्दल वरिष्ठ कार्यालयात अनेक तक्रारी व चौकशी अर्ज आहेत. मात्र त्यांची चौकशी करण्याऐवजी काम न करणाऱ्या व कार्यालयाला दांडी मारणाऱ्या लिपिकाला विनाझंझट वेतन देण्यात येत असल्याने वरिष्ठांच्या संगनमताने नियमबाह्य कामकाज सुरू असल्याची चर्चा सुरू आहे. कर्मचाऱ्यांना नाहक त्रास देऊन वेतन थांबविणाऱ्या व दादागिरी करणाऱ्या लिपिकावर कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे.



## सुळेवाडी येथे शासकीय योजना शिबीरात विविध कीटचे वाटप

**माजी आमदार रामभाऊ सातपुते वाढदिवसानिमित्त आयोजन**

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि.१३ मार्च-**

माळशिरसचे माजी आमदार रामभाऊ सातपुते यांच्या वाढदिवसानिमित्त सुळेवाडी येथे विविध शासकीय योजनांच्या शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये आयुष्मान भारत कार्ड, वयोवंदना कार्ड, नोंदणीकृत बांधकाम कामगारांना सुरक्षा किटचे वाटप, शेतकऱ्यांसाठी महाविस्तार ॲपची नोंदणी, मतदान नोंदणी व मतदार कार्ड वाटप, मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतील वंचित महिलांच्या अडी अडचणी सोडविणे तसेच जिल्ह्य परिषद शाळेतील विदयारथयांना खाऊचे वाटप यावेळी करण्यात आले.

या शिबीराचे आयोजन युवा नेते विक्रम सुळे यांच्या संकल्पनेतून हया कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास नम्रता पुकळे, शिवराज पुकळे, नाथा सोलंकर, विजय सुळे, महादेव सुळे उपस्थित होते.

## सांगोल्यात लोकमंगल बँकेतर्फे कर्तृत्ववान महिलांचा गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १३ मार्च-**

लोकमंगल बँक, शाखा सांगोला यांच्यावतीने जि.प.सदस्य शोभा खटकाळे, प.स.सदस्या राणी पाटील, उत्कर्ष प्रशालेच्या मुख्याध्यापिका विश्रांती बनसोडे, उपमुख्याध्यापिका स्वराली कुलकर्णी, उद्योजिका मेहरूण आबादीराजे, बाळूबाई मिसाळ, कोमल चांडोले, वैशाली मिसाळ, शुभांगी पतंगे या कर्तुत्ववान महिलांचा संचालक विजय कुलकर्णी यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाखा सल्लागार गिरीष नष्टे व ॲड. गजानन भाकरे उपस्थित होते. याप्रसंगी शाखा व्यवस्थापक शिवाजी देरकर यांनी बँकेच्या विविध कर्ज योजनांची तसेच ॲड.गजानन भाकरे यांनी लोकमंगल परिवाराच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. यावेळी शोभा खटकाळे, स्वराली कुलकर्णी, शुभांगी पतंगे यांनी मनोगत व्यक्त केले. आभार ज्योती गुळमिरे यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुहास वालीकर, अजय महामुनी, विजय स्वामी यांनी परिश्रम घेतले.

## बार्शीत संभाजी ब्रिगेडने बांधली सिलेंडरची 'तिरडी'

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १३ मार्च-**

देशभरात सध्या घरगुती गॅस सिलेंडरचा प्रचंड तुटवडा निर्माण झाला असून, यामुळे सर्वसामान्यांचे स्वयंपाकघर कोलमडले आहे. या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी आज बार्शी येथे संभाजी ब्रिगेडच्यावतीने जिल्हाध्यक्ष आनंद काशीद यांच्या नेतृत्वाखाली आक्रमक आंदोलन करण्यात आले.





यावेळी गॅस सिलेंडरची बार्शी तहसील कार्यालय प्रतिकात्मक 'अंत्ययात्रा' काढत कार्यकर्त्यांनी सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली आणि नायब तहसीलदार बदे यांना मागण्यांचे निवेदन सादर केले.

काही दिवसांपूर्वीच शासनाकडून गॅस आणि इंधन तुटवडा होणार नाही, असे सांगण्यात आले होते. मात्र, प्रत्यक्षात परिस्थिती अत्यंत विदारक आहे. ४२ अंश सेल्सिअसच्या कडाक्याच्या उन्हात सामान्य नागरिक गॅस एजन्सीबाहेर तासनतास रांगा लावून उभे आहेत. एकीकडे देशाला जागतिक महासत्ता बनवण्याच्या गप्पा मारल्या जातात आणि दुसरीकडे गरीब जनतेला अन्नासाठी वणवण करावी लागते, असा संतप्त सवाल यावेळी जिल्हाध्यक्ष आनंद काशीद यांनी उपस्थित केला.

आंदोलकांनी तहसील कार्यालयावर धडक देत नायब तहसीलदार बदे यांची भेट घेतली. त्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, गॅसचे भाव गगनाला भिडले असताना आता तो वेळेवर मिळतही नाही. ही कृत्रिम टंचाई तातडीने दूर करुन गॅस पुरवठा सुरळीत करावा, अन्यथा यापेक्षाही तीव्र लढा उभारले जाईल.

यावेळी संभाजी ब्रिगेडसह शिव-शाहू-फुले-आंबेडकर चळवळ आणि शेतकरी संघटनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यात प्रामुख्याने हनुमंत करडे, विजय घाडगे, राजेंद्र डेंगाळे, अभिजित मोरे, हरिदास घाडगे यांच्यासह कार्यकर्त्यांचा समावेश होता.

## करमाळ्यातील सेल्फ फायनान्स शाळांची माहिती संकलित करा

**शिक्षक भारतीची मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर, दि.१३ मार्च -**

करमाळा तालुक्यातील सेल्फ फायनान्स शाळांमध्ये कार्यरत असलेल्या शिक्षकांची शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, टीईटी पात्र शिक्षकांची संख्या तसेच बोगस शिक्षकांची वस्तुस्थिती समोर आणण्यासाठी माहिती संकलित करण्यात यावी, अशी मागणी शिक्षक भारती संघटनेने केली आहे.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्या आदेशानुसार करमाळा तालुक्यातील सेल्फ फायनान्स शाळांची माहिती संकलित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ही माहिती संकलित करण्याची मागणी शिक्षक भारती संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुजितकुमार काटमोरे यांनी निवेदनाद्वारे केली होती.



या आदेशाच्या अनुषंगाने शिक्षक भारती करमाळा तालुका संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिनांक १२ मार्च रोजी पंचायत समिती करमाळा येथील शिक्षण विभागाचे गटशिक्षणाधिकारी नितीन कदम यांची भेट घेऊन सदर आदेशाची तातडीने अंमलबजावणी करण्याची मागणी केली. सेल्फ फायनान्स शाळांमध्ये मोठ्या प्रमाणात अप्रशिक्षित बारावी अथवा केवळ पदवीधर उमेदवारांना शिक्षक म्हणून नियुक्त केले जात असून वर्षानुवर्षे विद्यार्थी व पालकांची फसवणूक होत असल्याकडे संघटनेने लक्ष वेधले आहे. या माहिती संकलनातून अशा शाळांमधील बोगस शिक्षकांची वस्तुस्थिती पालक व समाजासमोर येणार असल्याचे संघटनेने नमूद केले.

तसेच या शाळांमध्ये कार्यरत असलेल्या पात्र व गुणवत्ताधारक शिक्षकांना शासनाच्या नियमाप्रमाणे वेतन देण्यात यावे व त्यांचे आर्थिक शोषण तात्काळ थांबविण्यात यावे, अशी मागणीही संघटनेने केली आहे. नियमबाह्य पद्धतीने शिक्षकांची नियुक्ती करणाऱ्या संस्थांवर प्रचलित कायद्यांनुसार कठोर कारवाई करण्यात यावी, अशीही मागणी यावेळी करण्यात आली. सेल्फ फायनान्स शाळांकडून सुरू असलेल्या मनमानी कारभाराविरोधात शिक्षक भारती संघटना भविष्यात कायदेशीर मार्गाने मोठा लढा उभारणार असल्याचे संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

यावेळी संघटनेचे तालुका सचिव सचिन गाडेकर, तालुका उपाध्यक्ष गोरख ढेरे, अल्पसंख्यांक आघाडी तालुकाध्यक्ष इरफान काझी उपस्थित होते.



## पिलीवच्या १० विद्यार्थ्यांचे सैनिक स्कूल परीक्षेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि १३ मार्च -**

पिलीव (ता. माळशिरस) येथील जिल्हा परिषद केंद्र शाळेतील पाचवीतील १० विद्यार्थ्यांनी सैनिक स्कूल परीक्षेत यश संपादन केले आहे.

यामध्ये यशस्वी विद्यार्थी असे (कंसात ३०० पैकी मिळवलेले गुण) : सार्थक नरुटे (२७७), अक्षर गोडसे (२६४),अभिराज देशमुख (२५१),हर्ष कोल्हे (२५०),श्रीराम काकडे (२४८),विघ्नेश तावरे (२४४),विराज गुजरे (२४३),सानिका जाधव (२३६),वेणुगोपाल आर्वे (२०१),वृषांक मेथवडे (१८४). या सर्व विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षिका सुप्रिया पांगे, मुख्याध्यापक यांचा सन्मान शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने करण्यात आला. यशस्वी विद्यार्थ्यांचे गटशिक्षणाधिकारी सुषमा महामुनी, प्रभारी केंद्र प्रमुख राजकुमार फासे यांनी अभिनंदन केले.


धाराशिव जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदी
अर्चनाताई
राणाजगजितसिंह पाटील
यांची निवड झाल्याबद्दल
लाख-लाख शुभेच्छा!
मा.श्री.निवृत्ती माळी
जि.प.नूतन सदस्य
मा.श्री.सुनील बनसोडे
जि.प.नूतन सदस्य
मा.श्री.दत्तात्रयमामा वडणे
माजी सरपंच, तामलवाडी
मा.श्री.मल्लिकार्जुन मसुते
माजी सभापती कृउबास, तुळजापूर
मा.श्री.नवनाथ सुरते
माजी सरपंच, सुरतगाव
मा.श्री.यशवंत (अण्णा) लोंढे
माजी संचालक : कृषी उत्पन्न बाजार समिती, तुळजापूर
सदस्य : तामलवाडी, ग्रामपंचायत, जि.धाराशिव
अध्यक्ष : राणा प्रतिष्ठान, तामलवाडी
सचिव : त्र्यंबकेश्वर शिक्षण संस्था, तामलवाडी
मा.श्री.विक्रमसिंह देशमुख
नूतन सभापती
पंचायत समिती, तुळजापूर
सौजन्य
राणा प्रतिष्ठान
तामलवाडी, ता.तुळजापूर, जि.धाराशिव

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## कै.व्यंकटराव देशमुख महाविद्यालयात यशवंतराव चव्हाण जयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १३ मार्च :** दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्याल बाबळगावच्या सांस्कृतिक विभागाच्या वतीने महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री, दूरदर्शी नेते आणि विचारवंत यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून व अभिवादन करून करण्यात आली.

या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी यशवंतराव चव्हाण यांच्या कार्याचा आणि त्यांच्या सर्वसमावेशक विचारांचा आढावा घेत विद्यार्थ्यांना त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले. महाराष्ट्राच्या सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय विकासात त्यांच्या योगदानाचे विशेष स्मरण करण्यात आले.

प्रमुख वक्ते प्रा. ज्ञानदेव कांबळे आपल्या भाषणात सांगितले की,यशवंतराव चव्हाण हे केवळ राजकारणी नव्हते तर दूरदृष्टीचे राष्ट्रपुरुष होते. शिक्षण, सहकार आणि सर्वसमावेशक विकासाचा त्यांनी दिलेला आदर्श आजच्या तरुण पिढीसाठी मार्गदर्शक ठरतो. विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांमधून प्रेरणा घेऊन समाजभान जपले पाहिजे. तर अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे,यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांची प्रेरणा विद्यार्थ्यांच्या मनात रुजविणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश असून त्यांच्या कार्याचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प अध्यापक आणि विद्यार्थी यांनी करावा. असे आवाहन केले.



## विविध वृत्त...

### सार्वजनीक गुढी महोत्सव समिती २०२६ च्या अध्यक्षपदी विकास कांबळे तर स्वागताध्यक्षपदी अमोल गिते

**लातूर :** लातूरच्या गंजगोलाईतील 'प्रथम मानाच्या सार्वजनीक गुढी महोत्सव' समिती २०२६ च्या अध्यक्षपदी लातूरचे नगरसेवक तथा मनपा स्थाई समिती सदस्य विकास सतिशराव कांबळे यांची निवड करण्यात आली आहे. तसेच स्वागताध्यक्षपदी अमोल गिते यांची निवड करण्यात आली आहे. सार्वजनिक गुढी महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष पंकज जैस्वाल यांनी बालाजी गवळी यांच्या अध्यक्षतेत झालेल्या बैठकीत ही निवड जाहीर केली आहे.





उर्वरीत कार्यकारीणी पुढील प्रमाणे : उपाध्यक्ष -संजय सोनकांबळे, कोषाध्यक्ष - रामेश्वर भराडीया, सचिव - नितिन पडिले, कार्यक्रम प्रमूख - रामभाऊ जवळगे, सहकोषाध्यक्ष - नारायण भूतडा, सदस्य - काकासाहेब घुटे, धनंजय पाटील, बालाजी नागरगोजे, रवि जाधव, सचिन गांगले आदी. या नूतन कार्यकारीणीचा सत्कार गुढी महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष पंकज जैस्वाल यांच्या हस्ते करणात आला. सार्वजनिक गुढी महोत्सवाचे हे ३८ वे वर्ष आहे. यंदा गुढी पाडवा सण गुरुवार १९ मार्च रोजी साजरा करण्यात येणार असून त्यानिमित विविध सामितीचे गठण आणि सार्वजनीक उपक्रमांची माहिती देण्यात येईल असे संस्थापक अध्यक्ष पंकज जैस्वाल यांनी यावेळी सांगीतले. नूतन कार्यकारीणीचे स्वागत विविध स्तरातून होत आहे.

### ग्राहक जनजागृती सेवा संस्थेच्या लातूर शहर अध्यक्षपदी वर्षा पाटील

**लातूर :** ग्राहक जनजागृती सेवा संस्था महाराष्ट्र राज्य लातूर शहर महिला जिल्ह्यध्यक्ष पदी वर्षा पाटील यांची निवड करण्यात आली आहे. या निवडीचे पत्र ग्राहक जनजागृती सेवा संस्था महाराष्ट्र राज्य अध्यक्ष अभिजीत औटे व सचिव दिपाली औटे यांच्या हस्ते देण्यात आले



वर्षा दगडु पाटील यांची ही निवड आजपर्यंत त्यांचे सामाजिक कार्य व त्यांचा लातूर शहरभर असलेला दांडगा जनसंपर्क व ग्राहक जनजागृतीपर अभियान सक्षमपणे व ग्राहक जनजागृतीपर काम करत असल्याने केली गेली आहे. ग्राहकांना न्याय देण्यासाठी या माध्यमातून लातूर शहरभर संघटन करुन व ग्राहक कसा जागरुक झाला पाहिजे व त्याची लुट केल्यास त्यास न्याय मिळवून देण्याचे काम आपणच करु शकतात, या हेतूने वर्षा पाटील यांची निवड केल्याचे अभिजीत औटे यांनी सांगितले, सदरील निवडीबद्दल ग्राहक जनजागृती सेवा संस्था महाराष्ट्र महिला प्रदेशाध्यक्षा दिपाली कवडे, कोषाध्यक्ष रतिकांत घोगरे, मराठवाडा अध्यक्ष युनूस चौधरी, छत्रपती संभाजीनगर महिला जिल्हाध्यक्षा शिल्पा चुडीवाल, लातूर ग्रामीण जिल्हाध्यक्ष बाबुराव कदम, सय्यद सलीम यांनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या आहेत.

### शासकीय योजनांच्या लाभासाठी दिव्यांग सहाय्यक पोर्टलवर नोंदणी करावी

**लातूर:** महाराष्ट्र राज्य दिव्यांग कल्याण विभागातंर्गत दिव्यांग बांधवांसाठी विविध योजना राबविण्यात येतात. यात दिव्यांगाची हेळसांड होवू नये व घरबसल्यास योजनेचा लाभ घेणे सोईचे होईल, यादृष्टीकोनातून मुंबई दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांच्या संकल्पनेतून राज्य शासनाच्यावतीने दिव्यांग सहाय्यक पोर्टल निर्मिती करण्यात आली आहे. या पोर्टलवर जिल्ह्यातील दिव्यांग बांधवांनी ऑनलाईन नोंदणी करुन शासकीय योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन लातूर जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहूलकुमार मीना यांनी केले आहे.केंद्र व राज्य शासनामार्फत दिव्यांग बांधवांना सक्षम बनविण्यासाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. या योजनेचा लाभ दिव्यांगांना सुलभ होण्याच्या दृष्टीने या पोर्टलची निर्मिती करण्यात आली आहे. दिव्यांग बांधवांच्या विविध योजना यात असून विविध विभागातील माहिती यात दर्शविण्यात आली आहे. एकाच छताखाली दिव्यांग बांधवांच्या विविध योजना यात समाविष्ट करण्यात आल्या आहेत, यात शासकीय योजनासह सेवा व लाभ यातून मिळणार आहेत. दिव्यांग विद्यार्थी शिष्यवृत्ती, साधने व उपकरणे, स्वंयरोजगारासाठी साधन सामुग्री, अर्थसहाय्य, गुणवत्ता पुरस्कार, सामाजिक सुरक्षा अंतर्गत विवाह प्रोत्साहन अनुदान, विविध शाळा व महाविद्यालयातील प्रवेश, रुग्णालयातील उपचार यासह अनेक योजनांचा या पोर्टलवर समावेश करण्यात आला आहे. दिव्यांग बांधवांनी https://divyangsahayakportal.maharashtra.gov.in या संकेस्थळावर ऑनलाईन नोंदणी करतांना युआयडी क्रमांक टाकून नोंदणी करावी व विविध योजनांचा लाभ घ्यावा असे कळविले आहे.

### शैक्षणिक कागदपत्रे हरवली आहेत

स्वप्नील संजय कदम या नावाची college of computer science and information technology Cocsit college Latur ची टीसी, बीएससी सीएस तसेच १०वी १२ वि ची मार्कसीट उमरगा ते लातूर प्रवासात हरविली आहे. सापडल्यास खालील संपर्क करणे.

मो.८७६७७५०५५२

# पोलीस दलाकडून 'आपले लातूर - सुरक्षित लातूर 'उपक्रम

## जीपीएस आधारित क्यूआर कोड स्कॅनर यंत्रणा कार्यान्वित : पोलीस अधीक्षक अमोल तांबे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर , दि. १३ मार्च :** लातूर शहरातील नागरिकांची सुरक्षितता अधिक बळकट करण्यासाठी तसेच गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी लातूर जिल्हा पोलीस दलाच्या वतीने विविध आधुनिक आणि तांत्रिक उपाययोजना राबविण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून आपले लातूर - सुरक्षित लातूर या उपक्रमांतर्गत शहरामध्ये जीपीएस आधारित क्यूआर कोड स्कॅनर यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे,अशी माहिती पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत दिली.



लातूर शहरातील नागरिकांच्या जीवित व मालमत्तेच्या सुरक्षेच्या दृष्टीने पोलीस गस्त अधिक परिणामकारक करण्याचा हेतू या यंत्रणेच्या माध्यमातून साध्य होणार आहे. शहरातील गुन्हेगारीला आळा घालणे, संवेदनशील ठिकाणी पोलीसांची उपस्थिती वाढवणे तसेच पोलीस गस्त व्यवस्थेचे अधिक प्रभावी नियोजन करणे या उद्देशाने ही प्रणाली सुरू करण्यात आली आहे. या उपक्रमांतर्गत लातूर शहरातील सुमारे ३१८ संवेदनशील व महत्त्वाच्या ठिकाणी जीपीएस आधारित क्यूआर कोड बसविण्यात आले आहेत. संबंधित ठिकाणी चार्ली पेट्रोलिंग पथक, दामिनी पथक तसेच वाहतूक शाखेचे पोलीस नियमित भेट देणार असून तेथे बसविण्यात आलेले क्यूआर कोड ई-पोलीस ॲपच्या माध्यमातून स्कॅन करणार आहेत. क्यूआर कोड स्कॅन केल्यानंतर संबंधित पोलीस कर्मचारी त्या ठिकाणी उपस्थित असल्याचा सेल्फी फोटो ॲपमध्ये अपलोड करणार आहेत.

या संपूर्ण प्रक्रियेमुळे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना संबंधित ठिकाणी पोलीसांनी दिलेल्या भेटीची अचूक वेळ, लोकेशन व फोटोसह माहिती तत्काळ उपलब्ध होणार आहे. त्यामुळे शहरातील संवेदनशील ठिकाणी पोलीसांची गस्त नियमितपणे होत आहे की नाही, यावर प्रभावी नियंत्रण ठेवणे शक्य होणार असून पोलीस गस्त अधिक शिस्तबद्ध व परिणामकारक होण्यास मोठी मदत होणार आहे. या नव्या प्रणालीअंतर्गत प्रत्येक १२ तासांच्या कालावधीत शहरातील किमान ३१८ संवेदनशील ठिकाणांना पोलीसांकडून भेट दिली जाणार असून त्यामुळे शहरात सतत पोलीस उपस्थिती राहून गुन्हेगारीला आळा बसण्यास मदत होणार आहे. या उपक्रमामुळे नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना अधिक दृढ होणार असून शहरातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस प्रशासनाला मोठे बळ मिळणार आहे.

शहरात बसविण्यात आलेले क्यूआर कोड असामाजिक प्रवृत्तीच्या व्यक्तींनी फाडणे, खराब करणे किंवा त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण केल्यास त्याबाबत आजूबाजूच्या नागरिकांनी तात्काळ पोलीसांना माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे. तसेच नागरिकांकडून मिळणाऱ्या सूचनांच्या आधारे आवश्यक त्या ठिकाणी भविष्यात आणखी क्यूआर कोड स्कॅनर बसविण्याचाही विचार करण्यात येणार आहे.

सदर उपक्रमाची अंमलबजावणी अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, लातूर व श्री. मंगेश चव्हाण, अपर पोलीस अधीक्षक, लातूर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे. या कामकाजात समीरसिंह साळवे, उपविभागीय पोलीस अधिकारी (लातूर शहर) तसेच पोलीस अंमलदार पांडुरंग सगरे यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

### महाराष्ट्राच्या जडणघडणीत यशवंतरावांचा सिंहाचा वाटा : डॉ. कुंभार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १३ मार्च :** नव महाराष्ट्राचे शिल्पकार, महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या ११३ व्या जयंतीनिमित्त यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान विभागीय केंद्र लातूर व यशवंतराव चव्हाण लोकविकास प्रतिष्ठान लातूरच्या वतीने विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांनी यशवंतवांच्या जीवनावर प्रकाश टाकताना त्यांची महाराष्ट्राच्या जडणघडणीतील भूमिका सोदाहरण विषद केली. यावेळी लोक्कास प्रतिष्ठानचे सचिव प्राचार्य डॉ. नागनाथ मोटे, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे लातूर विभागीय सदस्य विद्याधर कांदे-पाटील, सौ. सुनिता आरळीकर, विक्रम कदम, ॲड. वसंतराव उगिले, ॲड. सुधाकर आरसुडे. ॲड. शेखर विले, पंकज जैस्वाल, पृथ्वीराज गोरे, जितेंद्र तोडकर, प्रवीण सांळुके व मनपाच्या महिला कर्मचारी उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे आभार विक्रम कदम यांनी मानले.

## दयानंद कला महाविद्यालयाच्या संगीत विभागात बारावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

### उदात्त ध्येय ठेवून यश संपादन करा : अर्चना मैंदर्गी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १३ मार्च :** दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद कला महाविद्यालयाच्या संगीत विभागात बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले. प्राचार्य डॉ. शिवराजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे होते. मंचावर पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित, विभागप्रमुख डॉ. देवेंद्र कुलकर्णी, प्रा. सूरज साबळे व प्रा. हरी कुंभार उपस्थित होते.




कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी व नायब तहसीलदार अर्चना मैंदर्गी उपस्थित होत्या. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी उदात्त ध्येय ठेवून कठोर परिश्रम करण्याचे आवाहन केले. आवडीचे क्षेत्र निवडून त्यात सातत्याने प्रयत्न करावेत, संतुलित आहार घ्यावा तसेच स्क्रीन टाईम मर्यादित ठेवावा, असे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय भाषणात डॉ. दिलीप नागरगोजे यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक वातावरणात करिअर निवडताना स्वतःच्या मनाचा विचार करण्याचा सल्ला दिला. यावेळी डॉ. संदीपान जगदाळे यांनी संगीत विभागात वर्षभर राबविण्यात आलेल्या उपक्रमांची माहिती दिली, तर विभागप्रमुख डॉ. देवेंद्र कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैभव सुळ यानी केले. प्रास्ताविक त्रिगुणी बावस्कर हिने केले, तर पाहुण्यांचा परिचय समीक्षा साखरे हिने करून दिला. आभारप्रदर्शन साक्षी गंडले हिने केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी सूरदास शिनगारे व प्रसाद सारगे यांनी शारदा स्तवन सादर केले.

यावेळी राष्ट्रीय कला उत्सवात भारतात प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल कुमारी सायली टाक हिचा तसेच इतर विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सोहम गायकवाड, रितेश गायकवाड, ओंकार पौळ, ओंकार तेलघाने, कु. राणी गडेराव, कु. गौरी भूमकर, कु. रेवती घाडगे, कु. गायत्री पवार, कु. पल्लवी वाघमारे, कु. राजेश्र्वरी खारवणे व कु. हबीबा शेख यांनी परिश्रम घेतले.

## विद्यार्थी शालेय शिक्षणाबरोबरच कला कौशल्यात निपुण व्हावीत- शिक्षण विस्तार अधिकारी निवृत्ती जाधव



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १३ मार्च :** विद्यार्थ्यांनी शालेय शिक्षणाबरोबरच विविध अंगी कला- कौशल्य आत्मसात करून त्यात निपूण व्हावे ,असे प्रतिपादन बाभळगाव बीटचे शिक्षण विस्तार अधिकारी निवृत्ती जाधव यांनी केले.

लातूर तालुक्यातील मळवटी येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मळवटी व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सकपाळ नगर यांचे वतीने आयोजित वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते .

या कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा परिषद सदस्या राजश्री देशमुख यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी गावचे सरपंच गोविंद गरड हे होते.

तर विचार मंचावर कासारखेडा केंद्राचे केंद्रप्रमुख हिरालाल पाटील, केंद्रीय मुख्याध्यापक बिभिषन जाधव, शिक्षक नेते शिवाजीराव साखरे, गौतम टाकळीकर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बालाजी भंडे, अध्यक्षा राणी एडके, माया सूर्यवंशी, जनार्दन गायकवाड, गणेश जाधव, विलास टेकाळे, बालाजी सुरवसे आदींची उपस्थिती होती.

पुढे बोलताना जाधव म्हणाले की, माहिती तंत्रज्ञानाच्या जोरावर जग झपाट्याने बदलत असून, ज्ञानाच्या कक्षाही व्यापक होत आहेत याचा कुशलतेने व सकारात्मक पद्धतीने वापर करून, विद्यार्थ्यांनी आपली प्रगती साधावी, असेही ते शेवटी म्हणाले. शालेय विद्यार्थ्यांनी वैविध्यपूर्ण पद्धतीने नृत्य व नाटिका यांचा कलाविष्कार सादर करून दाद मिळवली तर अंगणवाडीतील चिमुकल्यांनी सादर केलेल्या नृत्याविष्काराने उपस्थितांची मन जिंकली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गोपीचंद बर्डे व कांचन कलवले यांनी तर प्रास्ताविक शिवलिंग पवार यांनी केली. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी किशोर शिंदे, श्रीकांत कराड, भारत रणदिवे, फातेमा पठाण, शितल सोनवणे, गणपती केंद्रे, मुरलीधर चव्हाण, उमाकांत कांबळे, शुभम भोसले, सुरज माळी, रेखा कांबळे, प्रवीण कसबे, पवन ठाकूर, महादेवी जाधव, राजपाल जाधव, दगडू गरड, लक्ष्मण सावळे आदींनी सहकार्य केले.

# लातूर जिल्ह्यात बांबू विकास आणि सामाजिक सुरक्षा प्रकल्पाची होतेय प्रभावी अंमलबजावणी; ६ लाखांहून अधिक रोपांची लागवड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १३ मार्च :** राज्यातील शेतकऱ्यांना पर्यावरणपूरक आणि शाश्र्वत उत्पन्नाचा पर्याय उपलब्ध करून देण्यासाठी, तसेच त्यांना हवामान बदलाच्या संकटातून सावरण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बांबू आधारित कृषी-वनीकरणावर भर देण्याचा निर्णय घेतला आहे. या अनुषंगाने राज्य शासनाने महाराष्ट्र बांबू उद्योग धोरणही जाहीर केले आहे. हवामान बदलामुळे शेतीमध्ये निर्माण होणारी अनिश्र्चितता दूर करण्यासाठी बांबू हे एक प्रभावी पीक ठरत आहे. बांबू लागवडीला प्रोत्साहन देण्यासाठी लातूर जिल्ह्यात 'बांबू विकास आणि सामाजिक सुरक्षा' प्रकल्प राबविला जात आहे. लातूर जिल्ह्यात लोदगा येथील फिनिक्स फाउंडेशन आणि गोदरेज ग्रोव्हेट यांच्या संयुक्त विद्यमाने २०२३ पासून या प्रकल्पाची प्रभावी अंमलबजावणी होत आहे.



या प्रकल्पांतर्गत शेतकऱ्यांना केवळ बांबू लागवडीचे प्रशिक्षणच दिले जात नाही, तर त्यांच्या कौशल्य विकासावरही भर दिला जात आहे. लातूर जिल्ह्यात राज्य कृषि मूल्य आयोगाचे अध्यक्ष तथा मुख्यमंत्री पर्यावरण व शाश्र्वत विकास टास्क फोर्सचे प्रमुख पाशा पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रकल्प राबविला जात आहे. जिल्ह्यातील सर्व १० तालुक्यांमध्ये २०२३ ते २०२५ या कालावधीत सुमारे ६ लाख ११ हजार ७२९ बांबू रोपांची लागवड पूर्ण झाली आहे. आतापर्यंत एकूण २ हजार ८५२ शेतकऱ्यांनी या मोहिमेत नोंदणी केली असून, त्यापैकी १ हजार ९५३ शेतकऱ्यांनी शासकीय अनुदानासाठी अर्ज सादर केले आहेत. या प्रकल्पासाठी शासनाकडून सुमारे ९० कोटी २७ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

#### पर्यावरणपूरक आणि किफायतशीर शेती

बांबू हे कमी पाण्यावर येणारे पीक असून, उसाच्या तुलनेत याला अत्यंत कमी पाणी आणि रासायनिक खतांची गरज भासते. बांबूची झाडे इतर वृक्षांच्या तुलनेत ३० ते ३५ टक्के अधिक ऑक्सिजन उत्सर्जित करतात आणि मोठ्या प्रमाणात कार्बन शोषून घेतात. औष्णिक विद्युत प्रकल्पांमध्ये कोळशाला पर्याय म्हणून बांबूचा वापर होत असल्याने देशाच्या स्वच्छ ऊर्जा मोहिमेला (ग्रीन एनर्जी) यामुळे चालना मिळत आहे.

#### प्रशिक्षण आणि अंमलबजावणीवर भर

औसा तालुक्यातील लोदगा येथे बांबू रोपवाटिका आणि अत्याधुनिक प्रशिक्षण केंद्र कार्यरत आहे. या प्रकल्पांतर्गत गाव आणि तालुक पातळीवर समन्वयक नियुक्त करण्यात आले आहेत. हे समन्वयक प्रत्यक्ष शेतशिवारात जाऊन शेतकऱ्यांना जमिनीची निवड, खड्डा खोदणे, ठिबक सिंचन आणि खत व्यवस्थापनाचे तांत्रिक मार्गदर्शन करत आहेत. यात प्रामुख्याने 'तुल्डा 'मानवेल' यांसारख्या प्रगत जातींच्या ऊतक संवर्धन (टिश्यू कल्चर) तंत्रावर भर दिला जात आहे.

#### शेतकऱ्यांचा सहभाग वाढविण्यासाठी जनजागृती

शेतकऱ्यांचा सहभाग वाढवण्यासाठी 'मोबिलायझेशन व्हॅन', ध्वनिक्षेपक आणि लघुपटांच्या माध्यमातून गावोगावी बांबू शेतीचे महत्त्व पटवून दिले जात आहे. विशेष ग्रामसभा, प्रात्यक्षिक प्लॉट (डेमो प्लॉटस) आणि महिला बचत गटांना बांबूपासून शोभेच्या वस्तू बनवण्याचे प्रशिक्षण देऊन ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देण्याचे काम सुरू आहे. बांबूपासून इंधन विटा, फर्निचर, हस्तकला, कागद आणि कापड यांसह १८०० पेक्षा अधिक वस्तूंची निर्मिती शक्य असल्याने, हा प्रकल्प लातूरच्या ग्रामीण भागासाठी विकासाची नवी दिशा ठरत आहे.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# आयुष्य अत्यंत्य मौल्यवान आहे

## ह.भ.प. विशाल महाराज खोले



तभा वृत्तसेवा

औसा दि. १३ मार्च – भगवंताने प्रत्येक युगात आयुष्याचे वेगळे गणित करुन ठेवले आहे.त्याचे नियंत्रण माणसाच्या हातात नाही. त्यामुळे मिळालेले आयुष्य सत्संगाच्या सानिध्यातून सत्कर्म, भजन,किर्तनआणि समाजाच्या हितासाठी वापरावे.मिळालेले आयुष्य अत्यंत्य मौल्यवान असल्याचे मत हभप विशाल महाराज खोले यांनी व्यक्त केले.क्रिएटिव्ह फाऊंडेशनच्या वतीने औसा येथील उटगे मैदानावर किर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते.

विशाल महाराज म्हणाले,आजच्या काळात व्यसनाधीनतेचे प्रमाण वाढत चालले आहे. व्यसनामुळे माणसाचे आरोग्य, विचार आणि आयुष्यावर वाईट परिणाम होत आहे. त्यामुळे तरुणांनी व्यसनापासून दूर राहून चांगल्या मार्गाचा स्वीकार करणे आवश्यक आहे. तसेच मुलींनीही आपल्या आई-वडिलांची आणि समाजाची प्रतिष्ठा जपेल असे वर्तन करावे, असे आवाहन त्यांनी केले.

सत्ता आणि पद मिळाल्यानंतर अनेक जण देवधर्म विसरतात.अशी अनेक उदाहरण समाजात अनेक ठिकाणी दिसून येतात. परंतु आयुष्य देणारा या जगातील खरा वैद्य एकच असून तो म्हणजे पंढरपूरचा विठ्ठल आहे. म्हणून प्रत्येकाने भक्ती, सदाचार आणि समाजसेवा हाच मार्ग स्वीकारला पाहिजे, असे मत विशाल महाराज यांनी यावेळी व्यक्त केले.

आमदार अभिमन्यू पवार, ॲडव्होकेट परीक्षित पवार, राजेंद्रगिरी महाराज यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.औसा शहरासह परिसरातील भाविकांनी उपस्थित राहून कीर्तनाचा लाभ घेतला.कीर्तनाच्या माध्यमातून दिलेल्या आध्यात्मिक आणि सामाजिक संदेशामुळे उपस्थित भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

# उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे यांच्या हस्ते अभिषेकाने उदागिर बाबा महाराज उत्सवास प्रारंभ



**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. १३ मार्च :** श्री सदगुरु उदागिर बाबा महाराज यांचा उत्सव उपविभागिय अधिकारी सुशांत शिंदे यांच्या हस्ते रुद्रअभिषेक व विनापुजन, ज्ञानेश्वरी ग्रंथाचे पुजनाने प्रारंभ झाला.

उदगीरचे आद्यदैवत श्री सदगुरु उदागिरी बाबा महाराज यांचा उत्सव सोहळा उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे यांच्या हस्ते उदागीर बाबा महाराज यांचू समाधिस वेदमंत्रोच्चारात रुद्राभिषेक संपन्न झाले व ज्ञानेश्वरी पारायण ग्रंथाची पुजा करुन विना पुजनाने हरिनाम सप्ताहाचा शुभारंभ झाला.

दररोज पहाटे ४ ते ६ उदागिर महाराज महारुद्र पुजा ७ ते १० सामुहिक श्रीज्ञानेश्र्वरी पारायण, १२ ते २ तुकाराम गाथा भजन, २ ते ४ महिला भजन, ४ ते ६ प्रवचन, ६ ते ९ हरिपाठ, रात्री ९ ते ११ किर्तन व जागर आदि कार्यक्रम होणार आहेत. तर प्रवचन व किर्तन यात ११ मार्च रोजी ह.भ.प. रामकिशन महाराज शिरोळकर यांचे प्रवचन तर ह.भ.प. एकनाथ महाराज श्रीडोळे यांचे किर्तन, गुरुवार दि.१२ रोजी ह.भ.प. मुकुंद महाराज नागलगाव यांचे प्रवचन तर ह.भ.प. केशव महाराज बेडकुंदेकर यांचे किर्तन, शुक्रवार दि. १३ मार्च रोजी सुरेश पाटील नेत्रगावकर यांचे प्रवचन व किर्तन, शनिवार दि.१४ रोजी ह.भ.प. उद्धवमहाराज हैबतपुरे यांचे प्रवचन आहे.

तर ह.भ.प. संदिप महाराज होळीकर यांचे किर्तन रविवार दि. १५ मार्च रोजी ह.भ.प. दामोदर महाराज गिरी हांदीखेर यांचे प्रवचन तर ह.भ.प. प्रशांत महाराज क्षीरसागर यळमघाट यांचे किर्तन, सोमवार दि. १६ मार्च रोजी ह.भ.प. रघुवीर महाराज हेळंबकर यांचे प्रवचन व किर्तन, मंगळवार दि. १७ रोजी ह.भ.प. ज्ञानोबा कारभारी बोंबळीकर यांचे प्रवचन व किर्तन होणार आहे बुधवार दि.१८ मार्च रोजी सकाळी १० ते १२ ह.भ.प. गोरखगीर महाराज धोंडीहिप्परगेकर यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. गुरुवार दि १८ मार्च रोजी मध्यरात्री बारा वाजता उदागीर बाबा मंदिर ट्रस्टच्या वतीने महापुजा होणार असुन यानंतर भक्तांना दर्शनाचा लाभ घेता येणार आहे. गुरुवार दि.१९ मार्च २०२६ रोजी गुडी पाडव्यानिमित्त प्रतिवर्षा प्रमाने श्री सदगुरु उदागिर बाबा उत्सवानिमित्त सकाळी ९ ते ३ या वेळेत भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. गुडी पाडव्या निमित्य सकाळी ९ वाजता भक्ती संगीत कार्यक्रम संपन्न होणार आहे. सदगुरु उदागिर बाबा महाराज उत्सवात भाविक भक्तांनी सहभागी होवून दर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री उदागिर बाबा मठ संस्थान,किल्ला उदगीर चे मठाधिश ह.भ.प. जयेशगिर गुरु सतिषगिर महाराज यांनी केले.

# निलंग्यातील ४५ हजार नागरिकांना मिळणार ५ लाखांचे आरोग्य कवच!

**आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या पुढाकाराने आयुष्यमान भारत कार्ड मोहिमेला गती**



**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि. १३ मार्च :** पंतप्रधान आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत निलंगा विधानसभा मतदारसंघाचे आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या विशेष पुढाकाराने निलंगा शहरातील ४५ हजार नागरिकांना आता 'आयुष्यमान कार्ड' मिळणार आहे. या कार्डमुळे नागरिकांना ५ लाख रुपयांपर्यंतचा मोफत आरोग्य विमा उपलब्ध होणार असून, अनेक गरजू रुग्णांना या माध्यमातून खऱ्या अर्थाने जीवनदान मिळणार आहे.

निलंगा नगरपालिकेचे नगराध्यक्ष संजयराज हलगरकर व तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रदीप कुमार जाधव यांच्या नियोजनातून शहरातील ८ हजार कुटुंबांतील ४५ हजार नागरिकांना या योजनेचा लाभ मिळवून दिला जाणार आहे. या भव्य नोंदणी मोहिमेसाठी निलंगा नगरपालिका प्रशासन पूर्णपणे सरसावले असून, शहर व ग्रामीण भागातील १०५ आशा कार्यकर्त्यांमार्फत नागरिकांचे अर्ज ऑनलाईन भरून घेण्याचे काम युद्धपातळीवर सुरू करण्यात आले आहे.

**११ प्रभागांत मोहीम; नगरसेवकांचा पुढाकार**

निलंगा शहरातील ११ प्रभागांमधील २३ नगरसेवक आपापल्या प्रभागातील नागरिकांची नोंदणी करून घेण्यासाठी सक्रीय झाले आहेत. शहरात ही नोंदणी मोहीम सलग एक आठवडा चालणार आहे. यामध्ये महिला, पुरुष आणि लहान मुला-मुलींचा समावेश असून, या सर्वांना ५ लाखांपर्यंतच्या मोफत उपचारांची सुविधा मिळणार आहे. नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी नगरपालिकेने उचललेल्या या पावलाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

या मोहिमेच्या नियोजनावेळी नगरसेवक ईश्वर पाटील, स्वच्छता व दिवाबत्ती सभापती सुधा वाघमारे, महिला व बालकल्याण सभापती मीनाक्षी देशपांडे, नगरसेवक रमेश कांबळे, सचिन गायकवाड यांच्यासह नगरपालिकेचे विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# श्रीराम विद्यालयात यशवंतराव चव्हाण जयंती साजरी



**तभा वृत्तसेवा**

**रेणापूर, दि. १३ मार्च :** १२ मार्च रोजी श्रीराम प्राथमिक माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय येथे महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांची जयंती साजरी करण्यात आली .

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य सिद्धेश्र्वर मामडगे हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून श्रीराम प्राथमिक विद्यामंदिरचे मुख्याध्यापक सतीश मोरे, पर्यवेक्षक अनिल कुटवाड,क्रीडा विभाग प्रमुख विवेक भातीकरे,सांस्कृतिक विभाग प्रमुख अमृतेश्वर स्वामी,सुरेखा बस्तापुरे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अमृतेश्वर स्वामी यांनी केले. या प्रसंगी बोलतना प्राचार्य सिद्धेश्वर मामडगे म्हणाले की यशवंतराव चव्हाण यांचे महाराष्ट्राला प्रगतिशील बनविण्याच्या दृष्टीने त्यांनी दिलेले योगदान महत्त्वाचे असल्याचे सांगितले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनिता वेल्हाळे यांनी केले तर सुरेखा बस्तापूरे यांनी आभार मानले.

## संक्षिप्त...

### पं.स च्या सभापतीपदी वनमाला मरलापल्ले तर उपसभापती पदी बापुसाहेब भोसले





**उदगीर :** उदगीर पंचायत समितीच्या सभापती व उपसभापती पदाची बिनविरोध निवड झाली असुन सभापती पदी श्रीमती वनमाला तात्यारेड्डी मरलापल्ले यांची तर उपसभापती पदी बापुसाहेब उध्दव भोसले यांची बिनविरोध निवड झाली आहे.उदगीर पं. स. च्या सभापती व उपसभापती पदी सोमवार दि. ०९ मार्च रोजी पंचायत समितीच्या सभागृहात पिठासन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे यांच्या उपस्थितीत सभापती पदासाठी गुडसुर गणातून राष्ट्रवादी (अजीत पवार गट ) पक्षाच्या विजयी झालेल्या श्रीमती वनमाला तात्यारेड्डी मरलापल्ले व हंडरगुळी गणातून विजयी झालेले भाजपचे बापुसाहेब उध्दव भोसले यांचा एकमेव उमेदवारी अर्ज दाखल झाल्याने निवडी झाल्या. बिनविरोध पंचायत समितीमध्ये राष्ट्रवादी भाजपाचे युतीची सत्ता आली असुन यावेळी पंचायत समितीचे सदस्य नागेंद्र बिरादार, कोमल कमलाकर फुले, सुरेखा सर्जेराव पाटील, सरमंगला मनोहर बिरादार, धनराज धर्मपाल नादरगे, केवडे शिल्ला शक्ती, सुनिता भास्कर प्रकाश राठोड, विमल भिवाजी चिखले, मधुकर जाधव, बालाजी केरबा अंधारे, काशिबाई बळीराम सोनकांबळे, चंद्रकांत गोविंद कांबळे यांच्यासह एकुण १४जन उपस्थित होते.

### माजी खासदार डॉ. जे. एम. वाघमारे सरांच्या निधनानिमित्त शोकसभा



**रेणापूर :** येथील शिवाजी महाविद्यालयात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरू, ज्येष्ठ विचारवंत व माजी खासदार डॉ. जे. एम. वाघमारे सर यांच्या निधनानिमित्त मंगळवार दि १० मार्च रोजी शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी प्राचार्य डॉ सतीश यादव यांनी माजी खासदार डॉ. वाघमारे यांच्या शैक्षणिक, सामाजिक व वैचारिक कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख करत त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. त्यांच्या कार्यामुळे मराठवाडा भागातील शिक्षण क्षेत्राला मोठी दिशा मिळाल्याचे यावेळी सांगितले.

या शोकसभेस उपप्राचार्य डॉ रमाकांत घाडगे, डॉ प्रकाश शिंदे, डॉ गणेश नागरगोजे, प्रा . महादेव जाधव यांच्यासह शिवाजी कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी दोन मिनिटे मौन पाळून दिवंगत आत्म्यास श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

# गॅस दरवाढीच्या विरोधात महाविकास आघाडीचे आंदोलन

**शिरूर अनंतपाळ तहसील कार्यालयासमोर काँग्रेस व महाविकास आघाडीचा निषेध**



**तभा वृत्तसेवा**

**शिरूर अनंतपाळ, दि. १३ मार्च :** केंद्र सरकारने घरगुती व व्यावसायिक गॅस सिलेंडरच्या दरात केलेल्या वाढीच्या विरोधात तसेच गॅस बुकिंगच्या मुदतीत वाढ केल्याच्या निषेधार्थ काँग्रेस पक्ष व महाविकास आघाडीच्या वतीने शिरूर अनंतपाळ तहसील कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आले.

प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, आमदार अमित देशमुख व खासदार डॉ. शिवाजी काळगे यांच्या सूचनेनुसार शिरूर अनंतपाळ शहर व तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने हे आंदोलन करण्यात आले. यावेळी तहसीलदारांना निवेदन देऊन जनतेच्या भावना महामहिम राष्ट्रपतींपर्यंत पोहोचवाव्यात, अशी मागणी करण्यात आली.

केंद्र सरकारने केलेल्या गॅस दरवाढीमुळे सामान्य जनतेमध्ये तीव्र नाराजी पसरली असून आधीच नापिकी व शेतमालाला कमी भाव मिळत असल्यामुळे शेतकरी व सर्वसामान्य नागरिक आर्थिक अडचणीत सापडले आहेत. अशा परिस्थितीत गॅस दरवाढ आणि बुकिंगची मुदत वाढवणे हे जनतेवर अन्याय करणारे असल्याची भावना आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली.

या दरवाढीमुळे प्रत्येक कुटुंबावर विपरीत परिणाम होणार असून 'अच्छे दिन'चे स्वप्न दाखवणाऱ्या शासनाने जनतेचा विश्र्वासघात केल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार पक्ष) चे प्रदेश सचिव महादेव आवाळे यांनी केला. तसेच सरकारने तात्काळ गॅस दरवाढ मागे घ्यावी, अन्यथा काँग्रेस पक्षाच्या वतीने यापेक्षा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा तालुकाध्यक्ष आबासाहेब पाटील यांनी दिला.

या निवेदनावर काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष आबासाहेब पाटील, जिल्हा परिषद सदस्य माणिक गायकवाड, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार पक्ष) चे प्रदेश सचिव महादेव आवाळे, चेअरमन रामकिशन गड्डीमे, संजय बिराजदार, शहराध्यक्ष अशोक कोरे, नगरसेवक सुधीर लखनगावे, अकबर तांबोळी, बाबुराव तोरणे, गुरूनाथ अचवले, व्यंकट कल्ले, मारोती वाघमारे, महेश भिंगोले, नागनाथ सोनकांबळे, हनुमंत चांमले यांच्यासह काँग्रेस व महाविकास आघाडीचे अनेक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रा. गणेश बिरादार राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित



**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. १३ मार्च :** येथील श्री हावगीस्वामी कनिष्ठ महाविद्यालयातील प्रा. गणेश बिरादार यांना त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याची दखल घेऊन स्विफ्टन लिफ्ट एज्युकेशन मीडिया ग्रुपच्या वतीने राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. दि. १ मार्च रोजी औंध, पुणे येथे झालेल्या पंडित भीमसेन जोशी सभागृहामध्ये इंडियन आर्मीच्या लेफ्टनंट कमांडर शीतलजी गायकवाड, येवले अमृततुल्यचे संस्थापक संचालक नवनाथ येवले, चाकण फेडरेशन इंडस्ट्रीज चे मुख्य कार्यकारी दिलीप बतवाल, भाजपा महिला प्रदेश अध्यक्षा नेहा गोरे, भाजपा पुणे शहर सरचिटणीस प्रियांका शेंडगे, स्विफ्टन लिफ्ट चे संस्थापक निलेश साबे इत्यादी मान्यवरांच्या हस्ते सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला.

प्रा. गणेश बिरादार हे मागील दहा वर्षापासून श्री हावगीस्वामी कनिष्ठ महाविद्यालयामध्ये हिंदी विषयाचे अध्यापक म्हणून कार्यरत आहेत. एक अभ्यासू विद्यार्थी प्रिय प्राध्यापक म्हणून त्यांची ओळख आहे. ग्रामीण भागातून आलेल्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी ते अत्यंत संवेदनशील असून अशा विद्यार्थ्यांना नेहमीच मदत करत आलेले आहेत. स्वतःच्या यु ट्यूब चॅनलच्या माध्यमातून समाज प्रबोधन करण्याचेही काम ते करतात. महाविद्यालयातल्या शाळा गुणवत्ता मूल्यांकन व आश्र्वासन आराखडा विभागाचे ते चेअरमन म्हणून कार्यरत आहेत. अलीकडेच त्यांच्या नेतृत्वात महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे नी कनिष्ठ महाविद्यालयास बाह्य मूल्यांकनात अ+ दर्जा बहाल केला आहे. बारावी बोर्ड परीक्षेचे केंद्रप्रमुख म्हणूनही त्यांनी काम पाहिले आहे. *युवा क्रांती के शोले* या एकपात्री एकांकिकेतून लोकसंख्या नियंत्रण,बेटी बढाओ बेटी पढाओ, स्त्रीभ्रूणहत्या, महिला सबलीकरण इत्यादीसाठी जाणीव जागृती निर्माण करीत असतात.

प्रा.गणेश बिरादार यांना राष्ट्रीय स्तरावरचा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल भारत लिबरल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष उमेश पाटील देवणीकर,उपाध्यक्ष राजकुमार हरकरे,रवींद्र हसरगुंडे, सचिव डॉ.सौ. मनीषाताई वडीयार, सहसचिव सुबोध आंबेसंगे, कोषाध्यक्ष संगमेश्र्वर जिरगे, सर्व कार्यकारणी सदस्य महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. अप्पाराव काळगापुरे, उपप्राचार्य डॉ. नामदेव येमेकर, कनिष्ठ महाविद्यालयाचे परीक्षक प्रा.महेश बोळेगावे, एच एस व्ही सी विभागाचे पर्यवेक्षक प्रा.सुजित गायकवाड, ग्रंथपाल प्रा अजित रंगदळ, कार्यालयीन अधीक्षक ऋषिकेश पाटील, स्टाफ सचिव प्रा वसंत पवार, महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले. त्यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल समाजातील सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# स्वराज्य गणेश मंडळ जिल्ह्यात द्वितीय पुरस्काराने सन्मानित

**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर, दि. १३ मार्च :** समाजप्रबोधनाचे एक व्यासपीठ म्हणून काम करणारे अहमदपूर तालुक्यातील स्वराज्य मित्र मंडळ संचलित, स्वराज्य सार्वजनिक गणेश मंडळ, राजूर (अहमदपूर ) यांनी आपले कार्य मंडळाच्या माध्यमातून गेली १७ वर्ष केलेल्या निस्वार्थ सामाजिक सेवेची दखल आता राज्य स्तरावर घेतली गेली असून, 'महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा २०२५' मध्ये या मंडळाने लातूर जिल्ह्यात द्वितीय क्रमांक पटकावला आहे.

लातूरच्या जिल्हाधिकारी माननीय वर्षा ठाकूर-घुगे यांच्या शुभहस्ते हा सन्मान प्रदान करण्यात आला. यावेळी मंडळाला प्रशस्तीपत्र आणि ४० हजार रुपयांचा धनादेश देऊन गौरविण्यात आले.

स्वराज्य गणेश मंडळाने यंदाच्या उत्सवात केवळ देखावे उभे केले नाहीत, तर समाजाच्या वास्तवावर प्रकाश टाकला. शेतकऱ्यांच्या व्यथांचे देखावे, खांद्याला 'जू' लावून नांगर ओढणाऱ्या शेतकऱ्याचा जिवंत देखावा सादर करून मंडळाने बळीराजाच्या कष्टाचे दर्शन घडवले. परंपरा आणि कलेचा जागर: आधुनिकतेच्या युगात 'कांधरा नृत्य' या लोककलेचे सादरीकरण करून उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फेडले.

डीजेला फाटा, विठूनामाचा गजर: कानठळ्या बसवणाऱ्या डीजे संस्कृतीला फाटा देत, टाळ-मृदंगाच्या आणि 'ज्ञानबा-तुकाराम'च्या जयघोषात शिस्तबद्ध मिरवणूक काढत मंडळाने एक नवा आदर्श घालून दिला.

पर्यावरण आणि आरोग्य रक्षण: पर्यावरणपूरक गणेश मूर्तीची स्थापना, व्यसनमुक्ती अभियान आणि शैक्षणिक तणाव कमी करण्यासाठी केलेले प्रबोधन यामुळे हे मंडळ खऱ्या अर्थाने 'उत्कृष्ट' ठरले.त्या मुळे या मंडळाचा शासकीय दरबारी सन्मान तर झाला



व अहमदपूरकरां साठी तो अभिमाचा ठरला.

जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या या हृदयस्पर्शी सोहळ्यावेळी मंडळाने अभिमानाने हा सन्मान स्वीकारला. या यशाबद्दल स्वराज्य मित्र परिवाराचे आणि सर्व सदस्यांचे संपूर्ण तालुक्यातून कौतुक होत आहे .

या प्रसंगी पुरस्कार स्वीकारताना स्वराज्य सार्वजनिक गणेश मंडळाचे संस्थापक अध्यक्ष संतोष मजगे, त्या वर्षीचे अध्यक्ष शिवराज चोतवे, सन्माननीय सदस्य नरसीमलु पामुलावार, राजू जाधव, रमेश जाधव, राहुल भालेराव, महेश जाधव, बालाजी कांबळे, राहुल भोसले, फय्यूम शेख, मारुती हेमनर, विनायक नागरगोजे, संकेत गिरी, सतीश बिलापट्टे, देवा उराडे, महेश मोरे, संदीप पांचाळ, राम गंगथडे, आशिष होनराव, गजानन सोमवंशी,विलास पाटील, दत्ता परांडे, दीपक मजगे, ऋषी पामुलावार, पंकज गंगथडे, बालाजी कानवटे, सुधाकर शेट्टी, धर्मराज चावरे, बालाजी पाटील जवळगेकर, बालाजी चावरे, श्वेत पाटील, अक्षय देशमुख, राहुल गुनाले, ज्ञानोबा चाटे, सतिश मलशेट्टे, माणिक कदम, रामन्ना लिंबाळे, अंगद बालवाड, चंद्रकांत मिरजगावे,विशाल लहाने, अभिजीत कदम, ईश्वर तपसाळकर, धनु बोराडे, आकाश महाजन, जगदीश कावळे, सुरेंद्र गिरी, बालाजी मामिलवाड,नितीन गढवे, सुरेश सोनकांबळे, सुनील देशमुख, सागर महाजन, बालाजी लुंगारे, सुदर्शन हालसे, प्रसन्न गोरे ,गणेश तोडकर, पिंटू येवणगे, तानाजी भुताळे, दयानंद बडे, विशाल राठोड, शिवानंद कावर, बालाजी साठे, गणेश मुसळे,नागेश स्वामी,बालाजी मुसने,परमेश्र्वर हामने,बालाजी तोगरे, इत्यादी मंडळाचे पदाधिकारी व तसेच जिल्हाधिकारी कार्यालय लातूर येतील अधिकारी, कर्मचारी ,तथा पत्रकार बांधव उपस्थित होते.

# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## बाभळगाव येथे जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.१३ मार्च -**

येथील पौर्णिमा महिला बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने बाभळगाव येथे जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या अध्यक्षा बाबई चव्हाण होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्त्या रेणुका लिंबोळे, नागेश चव्हाण व तुळसाबाई बनसोडे उपस्थित



होते. यावेळी बोलताना बाबई चव्हाण म्हणाल्या की, आज संपूर्ण जगात महिलांना आदराचे स्थान प्राप्त झाले असून स्त्री सक्षम झाली आहे. महिलांसाठी असलेल्या विविध योजनांची माहिती देत त्यांचा लाभ घेऊन महिलांनी अधिक सक्षम व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी तुळसाबाई बनसोडे, अंबिका पवार, आप्पाराव बनसोडे, नरसिंग जगताप, समाधान बनसोडे, केराबाई लोंढे, प्रतिमा थोरात, भारतबाई चौगुले, सीताराम पवार, सुजाता गायकवाड आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमानंतर उपस्थित महिलांना संस्थेच्या वतीने भेटवस्तू देण्यात आल्या.



### संक्षिप्त वृत्त...



#### नागूर जि.प. शाळेत बक्षीसांचे वितरण

**लोहारा, दि.१३ मार्च -**

लोहारा तालुक्यातील नागूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत प्रजासत्ताक दिन, विज्ञान दिन, स्वयंशासन दिन तसेच मराठी भाषा दिनानिमित्त आयोजित विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण उत्साहात पार पडले. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे, त्यांचा आत्मविश्वास वाढावा तसेच त्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा या उद्देशाने बक्षिसांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाला शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष महादेव इंगळे व उपाध्यक्ष अमजद तांबोळी यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून संतोष चंदनशिवे, पवन चंदनशिवे उपस्थित होते. यावेळी मुख्याध्यापक के.डी. भोसले, बोधनापोड, चंदनशिव, सूर्यवंशी, लोंढे, श्रीचामे, भंडारे व एस.एम. काळे आदी शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एस.एम. भंडारे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सूर्यवंशी एस. यांनी मानले.




#### न.प. शाळेत यशवंतराव चव्हाण जयंती साजरी

**तुळजापूर, दि.१३ मार्च -**

नगर परिषद प्राथमिक शाळा क्र.३ तुळजापूर खुर्द येथे आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार, महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी नगरसेविका मंजुषा देशमाने, दिनेश क्षीरसागर, किरण सुरवसे यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी शिक्षण विभागप्रमुख अशोक शेंडगे, मुख्याध्यापक तुकाराम मोटे, निर्मला कुलकर्णी, सतीश यादव, जालिंदर राऊत, शरद कोळगे, दत्ता मेढे, वैशाली गोमारे, पुष्पा काळे, अतुल काकडे, अनिल राठोड, रंजीत नाईकवाडे, कल्पना व्हटकर, शेख इ. उपस्थित होते.



#### चित्रकार दिग्विजय कुंभार यांचा गौरव

**तुळजापूर, दि.१३ मार्च -**

उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने आयोजित ६५ वे महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शन जहांगीर आर्ट गॅलरी, काळा घोडा, मुंबई येथे पार पडले. या उद्घाटन सोहळ्याला राज्याचे मंत्री चंद्रकांत पाटील आणि विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. या राज्यस्तरीय प्रदर्शनात तुळजापूर येथील चित्रकार दिग्विजय कुंभार यांनी रेखा व रंगकला या विभागात सहभाग नोंदवून आपल्या कलाकृतींचे सादरीकरण केले. त्यांच्या या सहभागाबद्दल कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने त्यांना सहभाग प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.



#### उज्वला पाटील यांचा सत्कार

**वाशी, दि.१३ मार्च -**

बोरी (ता.वाशी) येथील जि.प. शाळेला तसेच गरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून दिल्याबद्दल बोरी ग्रा.पं. सदस्या उज्वला पाटील यांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. पाटील यांनी शाळेसाठी २ कपाट, २ टेबल, १० खुर्च्या, २० बेंच तसेच २५ ताट व २५ ग्लास असा साहित्य पुरवठा केला. याशिवाय विद्यार्थ्यांना वैयक्तिक बक्षिसेही देण्यात आली. भाजपचे नेते मा.आ. सुजितसिंह ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना वह्या व पेनचे वाटप करण्यात आले. त्यांच्या या स्तुत्य उपक्रमाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक अंभुरे, पटेल व चव्हाण यांनी पाटील यांचा शाळेत सत्कार केला. यावेळी गावातील पालक व महिला उपस्थित होते.



#### वैष्णवीची इन्स्पायर अवॉर्डसाठी निवड

**तुळजापूर, दि.१३ मार्च -**

तालुक्यातील आपसिंगा येथील नरेंद्र आर्य विद्यालयातील विद्यार्थिनी वैष्णवी कोल्हे हिच्या विज्ञान प्रयोगाची इन्स्पायर अवॉर्ड मानांकन २०२५-२६ साठी निवड झाली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थिनीची या प्रतिष्ठित मानांकनासाठी निवड झाल्याने परिसरात तिचे कौतुक होत आहे. वैष्णवी कोल्हे हिने विद्यालयातील अटल टिंकरिंग लॅबच्या समन्वयक अनुष्का मसलेकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा विज्ञान प्रयोग सादर केला.

## हिंदूंनी संघटित राहण्याची गरज : निलेश गद्रे

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ मार्च -**

हिंदूंनी जातीभेद बाजूला ठेवून संघटित राहण्याची गरज असून इतिहासात एकत्रित शक्तीचा अभाव असल्याने हिंदू समाजाला दीर्घकाळ गुलामगिरीचा सामना करावा लागल्याचे नमूद करत सामाजिक ऐक्य ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन सामाजिक समरसता मंचाचे क्षेत्र समन्वयक निलेश गद्रे यांनी केले.

धाराशिव तालुक्यातील उपळा (मा.) येथे आयोजित विराट हिंदू संमेलनात ते बोलत होते. यावेळी वारकरी परंपरेतील प्रवचनकार हभप. ज्ञानेश्वर माऊली महाराज एकंबीकर यांनी वारकरी संप्रदायाने समाजात एकात्मतेची भावना दृढ करण्यासाठी केलेल्या कार्याचा उल्लेख केला. विविध संतांनी धर्म व समाजरक्षणासाठी दिलेल्या त्यागाची उदाहरणे देत हिंदूंनी परस्परांतील भेद विसरून एकत्र राहावे, असे आवाहन केले.




संमेलनाच्या निमित्ताने सकाळपासून विविध धार्मिक व सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर महादेवाला गावातील विविध समाजघटकांतील २१ जोडप्यांच्या हस्ते अभिषेक करण्यात आला. त्यानंतर काढण्यात आलेल्या ग्रामदिंडीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. याच पार्श्वभूमीवर हर घर भगवा अभियान राबवून गावातील अनेक घरांवर भगवा ध्वज फडकविण्यात आला.

धार्मिक विधी, ग्रामदिंडी आणि हर घर भगवा उपक्रमांच्या माध्यमातून दिवसभर गावात एकात्मतेचे वातावरण निर्माण झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. सकल हिंदू समाजाच्या वतीने आयोजित हे विराट हिंदू संमेलन आयोजित करण्यात आले होते. यात उपळा, शिंगोली, वरुडा, कुमाळवाडी व खताळवाडी या पंचक्रोशीतील नागरिकांचा मोठ्या संख्येने सहभाग या वेळी दिसून आला.

या संमेलनाच्या आयोजनासाठी हिंदू संमेलन समितीचे अध्यक्ष महेश पडवळ, सचिव डॉ कळमकर, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर घोगरे, कोषाध्यक्ष काका घोगरे, निखिल गाढवे (वरुडा), औदुंबर पडवळ (शिंगोली), प्रसाद रणखांब (कुमाळवाडी), तसेच समितीतील १५० कार्यकर्त्यांसह श्रीसिद्धेश्वर हिंदू संमेलन समितीच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रम यशस्वी पार पडल्याबद्दल आयोजकांनी नागरिकांचे आभार मानले.

## हरभरा खरेदीसाठी ई-पीक पाहणीची अट रद्द करा : डॉ. प्रतापसिंह पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ मार्च -**

राज्यातील शेतकऱ्यांना ऑनलाइन हरभरा खरेदी प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी ई-पीक पाहणीची अट तात्काळ रद्द करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) धाराशिव जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह वेदप्रकाश पाटील यांनी जिल्हाधिकारी व राज्याच्या कृषी मंत्र्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.



महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर हरभरा पिकाची लागवड केली जाते. शासनाने हरभरा खरेदी प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने सुरू केली असली तरी नोंदणीसाठी ई-पीक पाहणी बंधनकारक केल्यामुळे अनेक शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे डॉ. पाटील यांनी नमूद केले आहे. ग्रामीण भागातील अनेक शेतकऱ्यांकडे स्मार्टफोन, इंटरनेट सुविधा किंवा तांत्रिक ज्ञानाचा अभाव असल्याने वेळेत ई-पीक पाहणी नोंदविता येत नाही. त्यामुळे अनेक शेतकरी ऑनलाइन हरभरा खरेदी नोंदणीपासून वंचित राहत असून हमीभाव खरेदी योजनेचा लाभ घेण्यात अडथळे निर्माण होत आहेत. परिणामी शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

या पार्श्वभूमीवर ऑनलाइन हरभरा खरेदीसाठी असलेली ई-पीक पाहणीची अट तात्काळ रद्द करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी केली आहे.

## 'बळीराजा पाणंद रस्ते' समितीच्या सह-अध्यक्षपदी शरण पाटील

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१३ मार्च -**

शेतकऱ्यांच्या हितासाठी राज्य शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या 'मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते' योजनेच्या अंमलबजावणीला गती देण्यासाठी मतदारसंघनिहाय समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्या अनुषंगाने उमरगा-लोहारा मतदारसंघासाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीच्या सह-अध्यक्षपदी युवा नेते शरण बसवराज पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना त्यांच्या शेतापर्यंत जाण्यासाठी तसेच शेतीमाल बाजारपेठेत नेण्यासाठी सुलभ रस्ते उपलब्ध करून देण्यावर शासनाने विशेष भर दिला आहे. अनेक ग्रामीण भागांत पाणंद रस्त्यांचा अभाव असल्याने विशेषतः पावसाळ्यात शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. ही समस्या दूर करण्यासाठी पाणंद रस्त्यांचे जाळे उभारण्याचा शासनाचा मानस आहे.



शरण पाटील यांनी यापूर्वीही 'शरण पाटील फाउंडेशन'च्या माध्यमातून अनेक गावांमध्ये स्वतःच्या खर्चातून पाणंद रस्त्यांची कामे करून शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत शासनाने त्यांना समितीच्या सह-अध्यक्षपदी जबाबदारी सोपवली असल्याचे सांगितले जाते.

या समितीमुळे उमरगा-लोहारा मतदारसंघातील पाणंद रस्त्यांच्या कामांना अधिक वेग मिळणार असून शेतकऱ्यांना शेतीकामे व शेतीमाल वाहतुकीसाठी मोठी सुविधा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दरम्यान, या नियुक्तीबद्दल विविध सामाजिक, राजकीय व शेतकरी संघटनांकडून शरण पाटील यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## लोकमंगल शाखेत 'सन्मान स्त्रीशक्तीचा' कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.१३ मार्च -**

लोकमंगल मल्टीस्टेट अणदूर शाखेच्या वतीने 'सन्मान स्त्रीशक्तीचा' या उपक्रमांतर्गत जागतिक महिला दिन उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी अणदूर व परिसरातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या २५ महिलांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. अर्चना कस्तुरे होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. रुपाली कानडे, कन्या प्रशालेच्या मुख्याध्यापिका देशमुख, प्रा.जाधव तसेच डॉ. अनिता मुदकन्ना उपस्थित होत्या.

यावेळी प्रा. जाधव यांनी महिलांना मार्गदर्शन करताना परिस्थितीसमोर खचून न जाता धैर्याने लढत स्वतःला सक्षम बनवावे, असे सांगितले. अध्यक्ष डॉ. अर्चना कस्तुरे व डॉ. रुपाली कानडे यांनी महिलांनी कुटुंबाची जबाबदारी सांभाळतानाच स्वतःच्या आरोग्याकडेही लक्ष देणे आवश्यक असल्याचे सांगितले.

यावेळी शाखाधिकारी प्रशांत जाधव यांनी लोकमंगल समूहाच्या विविध उपक्रमांची माहिती देत १० मे रोजी होणाऱ्या लोकमंगल सामुदायिक विवाह सोहळ्यासाठी नावनोंदणी करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमास शाखाधिकारी मारुती काळे, शिला माळी, गुंडय्या स्वामी, ऋषिकेश कुलकर्णी, सोमेश्वर स्वामी तसेच परिसरातील महिला उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या शेवटी गुंडय्या स्वामी यांनी आभार मानले.

## गॅस दरवाढीविरोधात काँग्रेसचे आंदोलन; रिकामे सिलिंडर घेऊन निषेध



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ मार्च -**

देशात सातत्याने वाढत असलेल्या घरगुती गॅस सिलिंडरच्या दरवाढीमुळे व गॅस तुटवड्यामुळे सर्वसामान्य नागरिकांचे आर्थिक कंबरडे मोडले असल्याचा आरोप करत धाराशिव जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने गुरुवार (दि.१२) रोजी आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनात काँग्रेस कार्यकर्त्यांनी रिकामे गॅस सिलिंडर डोक्यावर घेऊन तसेच रस्त्यावर चुली पेटवून केंद्र सरकारचा निषेध केला. वाढत्या गॅस दरांमुळे आणि सिलिंडरच्या तुटवड्यामुळे ग्रामीण भागातील महिलांना पुन्हा लाकूड-फाट्यावर स्वयंपाक करण्याची वेळ येत असल्याची भावना आंदोलकांनी व्यक्त केली.

यावेळी आंदोलनकर्त्यांनी केंद्र सरकारविरोधात घोषणाबाजी करत गॅस दरवाढ तात्काळ मागे घ्यावी, गॅस सिलिंडरचा तुटवडा दूर करावा आणि सर्वसामान्य नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी केली. तसेच रेल्वे प्रकल्प आणि सुरत-चेन्नई महामार्गासाठी जमीन गेलेल्या बाधित शेतकऱ्यांना योग्य मोबदला देण्याची मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली.

या आंदोलनात काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते व स्थानिक नागरिक सहभागी झाले होते.

## परंडा न.प.ची वार्षिक सर्वसाधारण सभा; विविध ठरावांना मंजुरी

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१३ मार्च -**

परंडा नगरपरिषदेची वार्षिक सर्वसाधारण सभा नगरपरिषदेच्या सभागृहात नगराध्यक्ष जाकीर सौदागर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सभेस मुख्याधिकारी मनीषा वड्डेपल्ली, कार्यालय अधीक्षक जगदीश सोंडगे, मुनीर जिकरे यांच्यासह सत्ताधारी व विरोधी नगरसेवक उपस्थित होते.



सभेत मागील सभेचे इतिवृत्त कायम करणे तसेच सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी आवश्यक साहित्य व सेवा पुरवठ्यासाठी निविदा मागविण्याबाबत चर्चा करून ठराव मंजूर करण्यात आला. भांडार, पाणीपुरवठा, बांधकाम, लेखा व इतर विभागांसाठी लागणाऱ्या साहित्य खरेदी व सेवा पुरविण्यासाठी वार्षिक निविदा काढण्याचा निर्णय घेण्यात आला.


तसेच सन २०२६-२७ या वर्षासाठी आठवडी व दैनंदिन बाजाराच्या वसुलीसाठी ई-लिलाव करण्याचा विषय सभेसमोर आला. काही नगरसेवकांनी बाजार लिलाव न करता नगरपरिषद कर्मचाऱ्यांकडून कर वसुली करण्याची सूचना केली.

मात्र यासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध नसल्याने तसे करणे शक्य नसल्याचा अभिप्राय मुख्याधिकारी मनीषा वड्डेपल्ली यांनी दिला.

त्यामुळे आठवडी व दैनंदिन बाजाराचा जाहीर ई-लिलाव शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करून नियमानुसार ठेका देण्यास बहुमताने मंजुरी देण्यात आली.

याशिवाय सेवानिवृत्त सफाई कर्मचारी महादेव दगडू ओव्हाळ यांना शासन निर्देशानुसार सेवानिवृत्ती वेतन व इतर लाभ देण्याच्या प्रस्तावालाही सभेत एकमताने मंजुरी देण्यात आली.

## उन्हाची चाहूल; उमरग्यात कुलर-फॅनच्या खरेदी व दुरुस्तीला वेग



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१३ मार्च -**

यंदा उन्हाळ्याची चाहूल नेहमीपेक्षा लवकर लागल्याने उमरगा शहरात कुलर आणि फॅनच्या खरेदी-दुरुस्तीची मागणी मोठ्या प्रमाणात वाढताना दिसत आहे. मार्च महिन्याच्या सुरुवातीलाच तापमानात वाढ जाणवू लागल्यामुळे नागरिकांनी उन्हाळ्याची तयारी सुरू केली आहे. घरातील जुने कुलर व पंखे दुरुस्त करून घेण्यासाठी तसेच नवीन कुलर-फॅन खरेदी करण्यासाठी नागरिक मोठ्या प्रमाणात इलेक्ट्रिक दुकानांकडे धाव घेत असल्याचे चित्र सध्या शहरात पाहायला मिळत आहे.

शहरातील इलेक्ट्रिक व रिपेअरिंग दुकानांमध्ये सकाळपासूनच ग्राहकांची वर्दळ वाढली असून कारागीरही दुरुस्तीच्या कामात व्यस्त असल्याचे दिसून येत आहे. साधारणपणे एप्रिल महिन्यापासून कुलर-फॅनच्या दुरुस्ती आणि विक्रीला वेग येतो. मात्र यंदा मार्च महिन्यातच उकाडा वाढल्याने नागरिकांनी आधीच तयारीला सुरुवात केली आहे.

परिणामी शहरातील अनेक दुकानांमध्ये दिवसभर ग्राहकांची ये-जा सुरू असून दुरुस्तीबरोबरच नवीन कुलर-फॅनची खरेदीही वाढत आहे. काही नागरिक जुन्या कुलरची मोटर, पाण्याचा पंप, वायरिंग किंवा कुलर पॅड बदलून घेत आहेत, तर काहीजण नवीन कुलर आणि पंखे खरेदी करण्यास प्राधान्य देत आहेत.

सध्या रिपेअरिंगच्या दुकानांमध्ये कुलरची मोटर, पंप, वायरिंग, कुलर पॅड बदलणे तसेच पंख्यांचे कॅपेसिटर, कॉइल आणि ब्लेड दुरुस्तीची कामे मोठ्या प्रमाणावर सुरू आहेत.

### कुलर वापरताना घ्यावी विशेष काळजी...

उन्हाळ्यात कुलरचा वापर वाढत असल्याने त्याचा वापर करताना काही बाबींकडे लक्ष देणे आवश्यक आहे. कुलरमध्ये पाणी भरताना किंवा साफसफाई करताना वीजपुरवठा बंद आहे याची खात्री करून घ्यावी. घाईगडबडीत पाणी टाकताना किंवा कुलर साफ करताना विद्युत धक्का लागण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. तसेच कुलरमध्ये पाणी भरताना ते वायरिंग किंवा मोटरजवळ सांडणार नाही याची दक्षता घ्यावी. पाण्यामुळे शॉर्टसर्किट होण्याचा धोका असतो. त्यामुळे कुलर योग्य ठिकाणी ठेवणे आणि पाण्याचा वापर करताना काळजी घेणे आवश्यक आहे.


### जाहीर प्रसिध्दीकरण

किरकोळ अर्ज नंबर १२६/२०२५
निशान क्र. ०५

**बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज ज्युनिअर डिव्हीजन साहेब, यांचे कोर्टात**

१. **श्रीमती पुजा विलास मोरे,** वय-३० वर्षे धंदा-घरकाम
२. **कु अपुर्वा विलास मोरे,** वय-११ वर्षे धंदा-शिक्षण
३. **कु. अनुजा विलास मोरे,** वय ९ वर्षे, धंदा शिक्षण
नं २ व ३ अपाक जनक आई अर्जदार नंबर १
द्वारा-सुनिता नवनाथ अळकुटे ह. मु वडारवाडी भिंगार, अहमदनगर
४. **जनार्धन लक्ष्मण मोरे,** वय-७८ वर्षे, धंदा काहीनाही, रा. बाजार रोड, भुम, ता. भुम जि धाराशिव, मो नं ९८६०८४८५५९
— अर्जदार

**विरूद्ध**

**कोणीही नाही.** --- **सामनेवाला**

**अर्ज- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे हेअरशिप सर्टफिकेट मिळण्यासाठी.**

**ज्याअर्थी,**

अर्जदार हे अर्जात नमुद केलेल्या पत्त्यावरील कायमचे राहणारे आहेत. अर्जदार नंबर १ हिचे पती व अर्जदार नंबर २ व ३ यांचे वडील व अर्जदार नंबर ४ यांचा मुलगा नामे विलास जनार्धन मोरे रा. बाजार रोड ता. भुम जि धाराशिव हे महाराष्ट्र राज्य विदयुत पारेषण कंपनी मर्यादीत यांचे अंतर्गत कुरुळी, ता. खेड, जि. पुणे येथे तंत्रज्ञ-२ या पदावर कायमस्वरुपी नोकरीस होते, ते दि.२१/११/२०२४ रोजी शैलजा स्पेशालिटी हॉस्पीटल, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर येथे मयत झालेले आहेत. मयत **विलास जनार्धन मोरे** यांची आई लक्ष्मीबाई जनार्धन मोरे ही दि.२६/०१/२०२२ रोजी मयत झालेली आहेत. त्यामुळे मयत **विलास जनार्धन मोरे** यांचे नावावर मृत्यूपश्चात असणारे तसेच अनुकंपा खाली अर्जदार नं. १ हिस नोकरी मिळणेसाठी महाराष्ट्र राज्य विदयुत पारेषण कंपनी मर्यादित यांचेकडे नोकरी मिळणेसाठी अर्ज केला असता त्यांनी अर्जदारांना तोंडी मयताचे वारस असल्याबाबत मे. कोर्टाकडून हेअरशिप सर्टिफिकेट आणले शिवाय मयताचे जागेवर अनुकंपा तत्त्वावर नौकरी मिळणार नाही तसेच मृत्यूपश्चात देय असणारे लाभ देता येणार नाहीत असे सांगितले आहे. त्यामुळे यातील अर्जदार नं. १ ते ४ हे मयत विलास जनार्धन मोरे यांचे हिंदू वारसा कायदयाप्रमाणे मयतास एकमेव व कायदेशीर वारस आहेत असे ठरवून हेअरशिप सर्टिफिकेट मिळावे याकरीता मे. कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे.

**त्याअर्थी,**

२००६ सदर अर्जदार नं. १ ते ४ यांचे व्यतिरीक्त मयत **विलास जनार्धन मोरे** यांचे पश्चात इतर कोणाचा वारसाहक्क हित संबंध असलेस त्यांनी सदर जाहीर प्रसिध्दी करणापासून ३० दिवसाचे आत किंवा नेमली ता.२०/०४/२०२६ रोजी सदरकामी हजर राहून आपले म्हणणे वा हरकत लेखी स्वरूपात पुराव्यानिशी दाखल करावी मुदतीत कोणाची हरकत वा म्हणणे आले नाही. तर कोणाचे काही म्हणणे नाही असे समजून यातील अर्जदारांना अर्जाप्रमाणे वारस दाखला देणेत येईल.

**कळावे हे प्रसिध्दीकरण मे. कोर्टाचे सहीशिक्क्यानिशी दिले असे. ता.१०/११/२०२५**

स्वाक्षरित /-
(वरिष्ठ लिपीक)

कोर्टाचा शिक्का

स्वाक्षरित /-
(सहाय्यक अधिक्षक)

**मा. दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर बार्शी, ता. बार्शी.**

CMYK

धाराशिव
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## उसतोडीच्या पैशाच्या वादातून तरुणाची आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ मार्च -**

तालुक्यातील उळुप येथील रणजीत सर्जेराव सानप (वय ४२) यांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी भूम पोलीस ठाण्यात एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, रणजीत सानप यांनी ११ मार्च रोजी सायंकाळी ते १२ मार्च रोजी दुपारपूर्वी रामेश्वर व बह्राणपूर शिवारातील चौघुले यांच्या शेतात गळफास घेऊन आत्महत्या केली. या प्रकरणी तानाजी पंडित सानप (वय १९, रा. उळुप ता. भूम जि. धाराशिव) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून औदुंबर उर्फ पिनू विष्णू दराडे (रा. रामेश्वर ता. भूम जि. धाराशिव) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




उसतोडीच्या उचल पैशांवरून झालेल्या वादातून आरोपीने रणजीत सानप यांना मारहाण करून त्रास दिल्याने त्यांनी आत्महत्या केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### जवाहर विद्यालयात 'गणित जत्रा' संपन्न

**अणदूर, दि.१३ मार्च -**

जवाहर विद्यालय, अणदूर येथे भारताचे उपपंतप्रधान, महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री तथा शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त 'गणित जत्रेचे' आयोजन करण्यात आले. यावेळी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव रामचंद्र आलुरे व मुख्याध्यापक गोपाळ कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले. या गणित जत्रेत पाचवी ते आठवीतील विद्यार्थ्यांनी ५५ गणितीय प्रयोग व ३० रांगोळी कलाकृतींचे सादरीकरण केले. सचिव रामचंद्र आलुरे, मुख्याध्यापक गोपाळ कुलकर्णी व श्रीशैल वाले यांनी विविध स्टॉलला भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांच्या प्रयोगांची माहिती घेतली. या गणित जत्रेसाठी परीक्षक म्हणून किरण गायकवाड, रोहित मोरे, शिवरत्न शिंदे, शितल गीते व सारिका नरसुडे यांनी काम पाहिले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पल्लवी मैत्री, पूजा कुळमेथे, प्रतिभा ऐकुंडे, रोहित मोरे, जयहिंद पवार व ठाकरू राठोड यांनी परिश्रम घेतले.



### बाभळगाव येथे महिला दिन साजरा

**इटकळ, दि.१३ मार्च -**

तुळजापूर तालुक्यातील बाभळगाव येथे पौर्णिमा महिला बहुउद्देशीय संस्था, अणदूर यांच्या वतीने ८ मार्च रोजी जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बाबई चव्हाण होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून रेणुका लिंबुळे, नागेश चव्हाण व तुळसाबाई उपस्थित होते. यावेळी अध्यक्ष बाबई चव्हाण यांनी महिलांना मार्गदर्शन करताना महिलांचे हक्क व अधिकार तसेच शासनाच्या विविध योजनांची सविस्तर माहिती दिली. महिलांनी शिक्षण, स्वावलंबन व संघटित होऊन प्रगती साधावी, असे आवाहन त्यांनी केले. या कार्यक्रमास परिसरातील अनेक महिला उपस्थित होत्या.

### नळदुर्ग पत्रकार भवनासाठी ठराव मंजूर

**नळदुर्ग, दि.१३ मार्च -**

नळदुर्ग शहरात पत्रकार भवन उभारण्यासाठी जागा देण्याचा ठराव नगरपालिकेच्या दि. १२ मार्च रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत सर्वानुमते मंजूर करण्यात आला. त्यामुळे शहरात पत्रकार भवन उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. शहरात पत्रकार भवनासाठी जागा मिळावी यासाठी नळदुर्ग शहर पत्रकार संघाच्या वतीने गेल्या १५ वर्षांपासून नगरपालिकेकडे पाठपुरावा करण्यात येत होता. नगरसेवक तानाजी जाधव व सुधीर पोतदार यांच्या पाठपुराव्यामुळे हा विषय सभेच्या अजेंड्यावर ठेवण्यात आला. सभेत चर्चा झाल्यानंतर सर्व नगरसेवकांनी एकमताने पत्रकार भवनासाठी जागा उपलब्ध करून देण्यास मंजुरी दिली. या ठरावाबद्दल संघाच्या वतीने नगराध्यक्ष बसवराज धरणे, उपनगराध्यक्ष नय्यरपाशा जहागीरदार, दत्तात्रय दासकर, मारुती खारवे यांच्यासह सर्व नगरसेवकांचे आभार मानण्यात आले.



### 'सन्मान स्त्रीशक्तीचा', २० महिलांचा गौरव

**इटकळ, दि.१३ मार्च -**

जागतिक महिला दिनानिमित्त लोकमंगल मल्टीस्टेटच्या ईटकळ शाखेच्या वतीने 'सन्मान स्त्रीशक्तीचा' या उपक्रमांतर्गत प्रेरणादायी कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी ईटकळ व परिसरातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या २० महिलांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. अंकिता सुंके जळकोटे होत्या. तर जयश्री धोंडूशा कोळी व प्रियंका कबीर मिटकरी या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. कार्यक्रमास रीजनल अधिकारी सुरवसे रतन, रोखपाल अभिषेक बिराजदार, गुंडय्या स्वामी, सोमेश्वर स्वामी तसेच महिला उपस्थित होत्या.



### परंडा येथे महिला मेळावा उत्साहात

**परंडा, दि.१३ मार्च -**

जागतिक महिला दिनानिमित्त परंडा येथे स्वयंम शिक्षण प्रयोग व एलआयसी एचएफएल प्रकल्पांतर्गत एमटेक सभागृहात महिला मेळावा उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एकात्मिक महिला व बालविकास प्रकल्प अधिकारी गणेश कुकडे होते, तर कृषी विस्तार अधिकारी सुरज बोडके यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांनी महिलांच्या सक्षमीकरणावर मार्गदर्शन केले. तसेच सेंद्रिय शेती व विविध शासकीय योजनांची माहिती देण्यात आली. या प्रसंगी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला.

# झेडपीत कमळ फुलले : महायुतीची एकजूट

## अध्यक्षपदी अर्चनाताई पाटील तर उपाध्यक्षपदी उषाताई गायकवाड





**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ मार्च -**

जिल्हा परिषद अध्यक्ष व उपाध्यक्ष पदासाठी झालेल्या निवडणुकीत महायुतीने दणदणीत विजय मिळवत सत्ता आपल्या ताब्यात घेतली. जिल्ह्याला उत्सुकता लागून राहिलेल्या अत्यंत चुरशीच्या लढतीनंतर अखेर धाराशिव जिल्हा परिषदेत तब्बल ६४ वर्षांनंतर प्रथमच कमळ फुलेले.

महायुतीने सत्ता काबीज करत इतिहास रचला आहे. भाजपचे आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या पत्नी अर्चनाताई पाटील यांची जिल्हा परिषद अध्यक्षपदी निवड झाली आहे. तर शिवसेनेचे माजी खासदार प्रा. रवींद्र गायकवाड यांच्या पत्नी उषाताई गायकवाड यांची उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. या निकालानंतर जिल्हा परिषद परिसरात महायुतीच्या कार्यकर्त्यांनी गुलाल उधळत व फटाके फोडत जल्लोष साजरा केला. जिल्हा परिषद अध्यक्ष व उपाध्यक्ष पदासाठी आज (दि.१३) विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी १० ते १२ या वेळेत उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया पार पडली.

महायुतीच्या वतीने भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी एकत्र येत उमेदवारी अर्ज दाखल केले. अध्यक्ष पदासाठी तेर जिल्हा परिषद गटाच्या सदस्या अर्चनाताई राणाजगजितसिंह पाटील यांनी तर उपाध्यक्ष पदासाठी कदेर गटातील शिवसेनेच्या उषाताई गायकवाड यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. दुसरीकडे महाविकास आघाडीनेही निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला. अध्यक्ष पदासाठी शिराढोण गटातील कांचनमाला संगवे यांनी तर



उपाध्यक्ष पदासाठी कवठा गटातील काँग्रेसचे उमेदवार महेश देशमुख यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यामुळे अध्यक्ष व उपाध्यक्ष पदासाठी महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशी थेट लढत रंगली.

दुपारी २ वाजता विशेष सभेला सुरुवात झाली. त्यानंतर उमेदवारांची घोषणा करून मतदान प्रक्रिया पार पडली. अध्यक्ष पदाच्या निवडणुकीत महायुतीच्या अर्चनाताई पाटील यांना ४५ मते मिळाली, तर महाविकास आघाडीच्या कांचनमाला संगवे यांना ९ मते मिळाली. एक सदस्य गैरहजर होता. त्यामुळे अर्चनाताई पाटील यांचा विजय निश्चित झाला. उपाध्यक्ष पदासाठीही महायुतीच्या उषाताई गायकवाड यांना ४५ मते मिळाली, तर महाविकास आघाडीचे महेश देशमुख यांना १० मते मिळाली. त्यामुळे उषाताई गायकवाड यांची उपाध्यक्षपदी निवड झाली. निकाल जाहीर होताच जिल्हा परिषद परिसरात महायुतीच्या कार्यकर्त्यांनी मोठा जल्लोष केला. गुलाल उधळत, फटाके फोडत आणि घोषणाबाजी करत कार्यकर्त्यांनी विजय साजरा केला.

धाराशिवच्या राजकारणात ही निवड ऐतिहासिक मानली जात असून जिल्हा परिषदेत प्रथमच महायुतीची सत्ता प्रस्थापित झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद परिसरात कडक पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी पोलिस प्रशासन सतर्क होते. दिवसभर जिल्हा परिषद परिसरात राजकीय हालचाली आणि कार्यकर्त्यांची मोठी गर्दी पाहायला मिळाली.

यावेळी आ. राणाजगजितसिंह पाटील, शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख राजन साळवी, मा.आ. सुजितसिंह ठाकूर, मा.खा. रविंद्र गायकवाड, मा.आ. राहुल मोटे, मा.आ. ज्ञानराज चौगुले तसेच भाजप जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी, भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अनेक प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### विजय निश्चित होता; : आ. राणाजगजितसिंह पाटील



धाराशिव जिल्हा परिषद अध्यक्ष आणि उपाध्यक्ष पदाच्या निवडणुकीत महायुतीचा विजय निश्चितच होता. जिल्हा परिषदेत आमच्याकडे स्पष्ट बहुमत असल्याने हा निकाल अपेक्षितच होता, अशी प्रतिक्रिया आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली. ते म्हणाले, महायुतीच्या माध्यमातून जिल्ह्यात विकासकामांना गती देण्याचे काम केले जाईल.जिल्हा परिषदेत स्थिर नेतृत्व मिळाल्यामुळे आता जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला नवी दिशा मिळेल. सर्व सदस्यांना सोबत घेऊन काम करत धाराशिव जिल्ह्याच्या प्रगतीसाठी प्रयत्न केले जातील, असेही त्यांनी सांगितले.

### भाजपा कार्यकर्त्यांचा विजय : सुजीतसिंह ठाकूर



जिल्हा परिषदेत प्रथमच कमळ फुलल्याने हा जिल्ह्यातील भाजपा कार्यकर्त्यांचा विजय असल्याची प्रतिक्रिया माजी आमदार सुजीतसिंह ठाकूर यांनी व्यक्त केली. ते म्हणाले, आजपर्यंत आम्ही निष्ठावंत भाजपा कार्यकर्ते म्हणून पक्षासाठी काम केले. पक्ष वाढवण्यासाठी अपार मेहनत घेतली आणि जिल्ह्यात भाजपा तळागाळापर्यंत पोहोचवली. प्रथमच जिल्हा परिषदेवर कमळ फुलले असून भगवा फडकला आहे, याचा मोठा अभिमान वाटतो. भाजपाचा अध्यक्ष प्रथमच विराजमान झाला असून हा क्षण आमच्यासाठी अत्यंत आनंदाचा आहे, असेही त्यांनी सांगितले.

### आनंदोत्सवाचा क्षण : दत्ताभाऊ कुलकर्णी



जिल्हा परिषदेत प्रथमच भाजपाचा अध्यक्ष विराजमान झाल्याने हा आनंदोत्सवाचा क्षण असल्याची प्रतिक्रिया भाजपा जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी दिली. ते म्हणाले, अनेक वर्षे पक्षाच्या कार्यकर्त्यांनी केलेल्या मेहनतीचे आज फळ मिळाले आहे. जिल्हा परिषदेत प्रथमच कमळ फुलले असून भाजपाचा अध्यक्ष निवडून आल्याने सर्व कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. महायुतीच्या माध्यमातून जिल्ह्याच्या विकासाला गती दिली जाईल, आणि विजय महायुतीच्या एकजुटीमुळे मिळाला, असेही त्यांनी सांगितले.

## दरोड्याच्या तयारीत असलेले पाच जण जेरबंद; शस्त्रांसह १.४० लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ मार्च -**

वाशी पोलिसांनी दरोड्याच्या तयारीत असलेल्या पाच जणांना अटक करत त्यांच्या ताब्यातील शस्त्रसामुग्री व दोन मोटारसायकलींसह सुमारे १ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई शेंडी शिवारात कमळेश्वर पारधी पिडीकडे जाणाऱ्या रस्त्याजवळ करण्यात आली.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी बबन रंगनाथ शिंदे, लहु आबा शिंदे, तानाजी अशोक काळे, सोनू बबन शिंदे व सुभाष शिवाजी शिंदे (सर्व रा. पारा, ता. वाशी, जि. धाराशिव) हे दि. ११ मार्च २०२६ रोजी रात्री सुमारे ११.३० ते दि. १२ मार्च रोजी १२.१० वाजण्याच्या सुमारास शेंडी शिवारातील कमळेश्वर पारधी पिडीकडे जाणाऱ्या रस्त्याजवळ दरोडा टाकण्याच्या उद्देशाने एकत्र जमले होते.

त्यावेळी त्यांच्या ताब्यात स्प्लेंडर (क्र. एमएच २५ बीडी १३१०) व मोटारसायकल (क्र. एमएच २५ एआर ६३२०) यांसह चार लोखंडी कोयते, एक तलवार तसेच कॅरीबॅगमध्ये तिखट पावडर असा एकूण सुमारे १ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल आढळून आला. याबाबत वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## अमृत २.० योजनेतील पाणीपुरवठा कामाची नगराध्यक्षांकडून पाहणी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१३ मार्च -**

अमृत २.० योजनेअंतर्गत नळदुर्ग शहरात सुरू असलेल्या नवीन पाणीपुरवठा योजनेच्या कामाची दि.१२ मार्च रोजी नगराध्यक्ष बसवराज धरणे, उपनगराध्यक्ष नय्यरपाशा जहागीरदार व पाणीपुरवठा समितीचे सभापती तानाजी जाधव यांनी पाहणी केली.

आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रयत्नातून शहरात सुमारे ४६ कोटी रुपयांच्या खर्चाची नवीन पाणीपुरवठा योजना राबविण्यात येत आहे.

या योजनेअंतर्गत प्रभाग क्र. १ मधील वसंतनगर व दुर्गानगर परिसरात 'फेज-१' लवकर सुरू करून नागरिकांना दररोज पाणीपुरवठा करण्याचे नगरपालिकेचे नियोजन आहे.



यावेळी नगराध्यक्षांसह उपनगराध्यक्ष, पाणीपुरवठा समितीचे सभापती, नगरसेवक निरंजन राठोड, नगरसेविका छमाबाई राठोड व माजी नगरसेवक किशोर नळदुर्गकर यांनी वसंतनगर येथे उभारण्यात आलेल्या नवीन पाण्याच्या टाकीची पाहणी करून सुरू असलेल्या कामाचा आढावा घेतला.

ही योजना पूर्ण झाल्यानंतर नळदुर्ग शहरातील नागरिकांना दररोज पाणीपुरवठा करण्यास मदत होणार असून सध्या भेडसावत असलेल्या पाण्याच्या समस्येतून दिलासा मिळणार असल्याचे नगराध्यक्ष बसवराज धरणे यांनी सांगितले.

## 'शालार्थ'वरील आर्थिक माहिती सार्वजनिक करण्यास विरोध

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ मार्च -**

शालार्थ प्रणालीवर कार्यरत खासगी अनुदानित शाळांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची वैयक्तिक व आर्थिक माहिती सार्वजनिक करण्याच्या शिक्षण संचालनालयाच्या निर्णयाला महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेने तीव्र विरोध दर्शवला आहे. हा निर्णय शिक्षकांच्या गोपनीयतेच्या मूलभूत अधिकारावर गदा आणणारा असल्याने त्याचा तात्काळ फेरविचार करावा, अशी मागणी परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष उमाकांत कुलकर्णी यांनी शिक्षण संचालकांना पत्राद्वारे केली आहे.



४ मार्च २०२६ रोजी शिक्षण संचालक (माध्यमिक) यांनी काढलेल्या पत्रानुसार माहिती अधिकार अधिनियमाचा आधार घेत कर्मचाऱ्यांचे एकूण वेतन, कपात व निव्वळ वेतन यासारखी वैयक्तिक माहिती शालार्थ पोर्टलवर सर्वांसाठी खुली करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. पगार ही अत्यंत वैयक्तिक बाब असून ती सार्वजनिक करणे हे संविधानातील अनुच्छेद २१ अंतर्गत असलेल्या गोपनीयतेच्या अधिकाराचे उल्लंघन ठरते, असे परिषदेने नमूद केले आहे. कर्मचाऱ्यांची आर्थिक माहिती उघड झाल्यास सायबर गुन्हेगार, खाजगी सावकार व मार्केटिंग कंपन्यांकडून कर्मचाऱ्यांना लक्ष्य केले जाण्याची शक्यता असल्याचेही पत्रात म्हटले आहे. तसेच पगार व कपातीची माहिती सार्वजनिक झाल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तुलना व इर्षा निर्माण होऊन त्याचा परिणाम शैक्षणिक गुणवत्तेवर होऊ शकतो.

त्यामुळे या निर्णयाला तात्काळ स्थगिती देऊन फेरविचार करावा, अशी मागणी उमाकांत कुलकर्णी यांनी केली आहे.

## तुळजाई रोटरी मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१३ मार्च -**

येथे आरोग्य जनजागृतीचा संदेश देण्यासाठी तुळजाई रोटरी मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. १५ मार्च रोजी रोटरी क्लब आणि विठाई हॉस्पिटल तुळजापूर यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

या उपक्रमाला अधिक व्यापक स्वरूप मिळावे यासाठी विविध संस्था, संघटना आणि नागरिकांनी सहकार्य करावे तसेच सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

समाजातील प्रत्येक घटकाने निरोगी आयुष्याच्या दिशेने एक पाऊल उचलावे, हा या उपक्रमामागील प्रमुख हेतू आहे.

तुळजापूर शहर व परिसरातील नागरिकांनी या मॅरेथॉनमध्ये सहभागी होऊन आरोग्याबाबत जागरूकता वाढविण्याच्या या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद द्यावा, असेही आयोजकांनी सांगितले आहे.

## वाहतूक नियमभंगावर कारवाई; १.१५ लाखांचा दंड वसूल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ मार्च -**




धाराशिव शहर वाहतूक शाखा व जिल्ह्यातील संबंधित पोलीस ठाण्यांच्या वतीने १२ मार्च रोजी शहरातील महत्त्वाच्या रस्त्यांवर मोटार वाहन कायदा व नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर विशेष कारवाई करण्यात आली.

या मोहिमेत एकूण १३१ वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून एकूण १ लाख १५ हजार रुपये 'तडजोड शुल्क' वसूल करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

## खिल्लार गाईला जर्सी वासरू; पशुवैद्यकीय अधिकाऱ्याविरुद्ध तक्रार


**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१३ मार्च -**

परंडा तालुक्यातील लोणी येथे खिल्लार जातीच्या गाईला जर्सी जातीचे वासरू झाल्याची घटना समोर आली असून याबाबत संबंधित पशुवैद्यकीय अधिकाऱ्याविरुद्ध तक्रार दाखल करण्यात आली आहे. चुकीचे कृत्रिम रेतन केल्यामुळे हा प्रकार घडल्याचा आरोप शेतकरी महावीर वसुदेव शिंदे यांनी केला आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, परंडा तालुक्यातील पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२, लोणी येथील तत्कालीन पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. सरपणे यांच्या विरोधात महावीर वसुदेव शिंदे (मु.पो. लोणी, ता. परंडा, जि. धाराशिव) यांनी तक्रार दिली आहे. शिंदे यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, त्यांच्या कडे खिल्लार जातीची गाय असून दि.३० मे २०२५ रोजी त्यांनी लोणी येथील पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांकडून त्या गाईचे कृत्रिम रेतन करून घेतले होते. रेतन करताना त्यांनी स्पष्टपणे खिल्लार जातीचे वीर्य वापरण्याची मागणी केली होती. त्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी पैसेही घेतल्याचा आरोप शिंदे यांनी केला आहे.

दरम्यान, दि.६ मार्च रोजी संबंधित गाय व्याली असता तिला जर्सी जातीचे वासरू जन्माला आले. खिल्लार गाईला जर्सी जातीचे वासरू होणे हे चुकीचे वीर्य वापरल्याचे किंवा तांत्रिक हलगर्जीपणाचे द्योतक असल्याचा आरोप शिंदे यांनी केला आहे. या घटनेमुळे आपले आर्थिक नुकसान झाले असून जातिवंत खिल्लार प्रजातीच्या संवर्धनालाही धक्का बसल्याचे त्यांनी तक्रारीत नमूद केले आहे. त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई करावी तसेच झालेल्या नुकसानीची भरपाई द्यावी, अशी मागणी शेतकरी महावीर शिंदे यांनी केली आहे.

सदर घटनेमुळे पशुपालकांमध्येही चर्चा



सुरू झाली असून प्रशासनाने या प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष देण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.